म. ग्रं. स. ठाणे
विषय
ग्रं. नं.
१०६५५
१०२

# अनंतफंदीकृत कविता

अथवा

# लावण्या.

भाग पहिला.

REFBK-0000460

...सहा आणे.

काव्य
१०६६

# अनंतफंदीकृत कविता,

अथवा

# लावण्या भाग पहिला.

हें पुस्तक

**शंकर तुकाराम शालिग्राम**

यांनीं तयार केलें

REFBK-0000460
REFBK-0000460

तें

**पुणें येथें**

“ चित्रशाळा ” छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

**आवृत्ति तिसरी**

---

१९०८

**किंमत सहा आणे.**

ग्रंथकर्त्यानें मालकीचा हक्क आपल्याकडे ठेविला आहे.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

——:*:——

या आवृत्तीचे वेळीं या पुस्तकांत काय फेरफार केला ? हें सांगण्याचा विचार आहे.

पहिल्या आवृत्तीचे वेळीं अनंतफंदीची कविता नवीन मिळविली असू. त्यामुळें शुद्ध करावी तितकी करतां आली नाहीं. फंदीचे चरित्रांत भवानीबोवा साधु संगमनेरकर यांचा वृत्तांत दिला नवता. फंदीशीं त्यांचा निकट संबंध असल्यावरून तो या आवृत्तीत दिला आहे. या आवृत्तीचे वेळीं " श्री माधवग्रंथ " इतिहासांतील महत्वाचा भाग समजून त्यावर टिपा देऊन शब्द-वेगवेगळे तोडून पहिल्यानदांच पुस्तकांत घेतला आहे. " श्री माधव " ग्रंथाची दुसरी एक छंदोबद्ध प्रत मिळाली ती या प्रतीहून भिन्न आहे. पहिलींत ग्रंथ ओवीबद्ध असून त्याचे सहा अध्याय आहेत, दुसरींत कांहीं आर्या कांहीं श्लोक कांहीं सवय्या व कांहीं ओव्या असे छंद असून अध्याय कमी आहेत; भावार्थ दोन्ही प्रतींचा एकच. प्रथम प्रत छापिली ती फंदीनीं लोकांस वाचण्याच्या हेतुनें लिहिली असावी. मागाहून जी प्रत आढळली ती फंदीबोवा कीर्तनांत ह्मणत असत ह्मणतात. नवीन मिळालेली प्रत या आवृत्तींत सादर केली आहे. तींत छंदोभंग होता; फंदी स्वत: लिहित नसत. ते म्हणत असतां ती प्रत लिहून ठेविली असावी. वृत्तांचा दोष होता तो दुरुस्त केला. त्यामुळें अर्थास हानी होईल असें वाटलें तेथें निरुपाय झाला.

या आवृत्तींत लावण्या फारच नामी अशा घातल्या आहेत. प्रथम आवृत्तींत वाचकांस वचन देऊन चुकलों होतों कीं, ' ही सेवा जर वाचकांस प्रिय झाल्याचें श्रवण केलें तर यांची सेवा करण्यास विसरणार नाहीं. ' हें वचन पूर्ण करण्याची सुवेळा वाचकांनीं

प्राप्त करून दिली; त्या अर्थी त्यांची सेवा करणें कर्तव्य आहे. असें समजून ह्या लावण्या जोडल्या आहेत.

पहिली आवृत्ति शिळा छापानें छापिली होती. नवीन आवृत्ति खिळे छापानें छापविली. अक्षरांचा सुबकपणा, छापण्याची व्यवस्था, सुरेख बांधणी ह्या गोष्टी वाचकांच्या लक्षात येऊन चुकल्या असतील; लेखकाच्या हयगयीमुळें टिपेच्या वगैरे ज्या चुका होत्या त्या निघून जाणें शक्य होतें.

‘ विविधज्ञानविस्तार ’ पु ९० अं • ६ यांत या पुस्तकावर अभिप्राय प्रकट झाला तो सादर करतों:– “ यांत एक ‘ श्रीमाधवग्रंथ ’ नांवाचा फार उत्तम ओवीबद्ध ग्रंथ छापला आहे. यांत श्रीमंत माधवराव नारायण भट पंडित पंत प्रधान यांनीं शके १७१७ ह्मणजे इ० स० १७९५ त अश्वीन शुद्ध द्वादशीस गणपतिरंगमहालावरून कारंज्यावर उडी टाकिली व पौर्णिमेस निवर्तले या गोष्टीपासून राव बाजी गादीवर बसले. येथपर्यंत निरनिराळ्या मुत्सद्यांचे मसलतींमुळें ज्या उलाढाली व घडामोडी झाल्या त्यांचें थोडक्यांत पण सुरस रीतीनें वर्णन केलें आहे. या ग्रंथाचे एकंदर सहा अध्याय आहेत. त्यांपैकीं पहिले पांच अध्यायांत राज्यप्रकरणी पूर्वोक्त इतिवृत्त आहे. सहावे अध्यायीं बंडप्रकरण म्हणजे पेंढाऱ्यांनीं जी देशांत धूळधाण उडवून दिली तें प्रकरण आहे. पेंढाऱ्यांच्या योगानें आपल्या देशांत जी धामधूम व दाणादाण झाली, जी लोकांची हाल अपेष्टा व त्रेधा झाली, जीवित व वित्त यांची जी हानि झाली, व एकंदर देशांत जी पुंडाळकी माजली या सर्वांचें वर्णन हुबेहुब व फार हृदयंगम झालें आहे. या वर्णनांत कदाचित् थोडीशी अतिशयोक्ति असेल, परंतु असल्यास फारशी नाहीं, व रसापकर्षक तर कोठेंच नाहीं. अनंतफंदीनें केलेल्या वर्णनांत सत्यापलाप फारसा नसावा, किंबहुना मुळींच नसावा असें सोलापुरकर रामजोशी बावाकृत होळकर दंग्याविषयीं लावणींत ह्याच

प्रकरणाचें अंशत: वर्णन आहे त्यावरून भासतें. त्याचप्रमाणें पेंढाऱ्यांनीं केलेल्या दुष्कृत्यांविषयीं इतिहासकारांनीं केलेलें वर्णन व त्याविषयींच वृद्ध-मुखीं ऐकलेली माहिती यांत व माधव ग्रंथानें सहावे अध्यायांत केलेल्या वर्णनांत फारसें अंतर नाहीं. आतां कवींचे रूढीप्रमाणें क्वचित प्रसंगीं रसपुष्ट्यर्थ अनंतफंदीनें अतिशयोक्तीचा उपयोग केला असेल तरी तो फारसा नाहीं. हा अध्याय वाचतांना अंगावर कांटा उभा राहतो. त्या वेळची ती पुंडाळकी व प्रस्तुत समयींची स्वस्थता ह्या दोन्ही स्थितींचा विचार केला असतां आम्ही फार भाग्यवान् असें भासूं लागतें. आतां असा प्रकार येथेंच झाला असें मात्र समजूं नये. लयकालांचीं हीं चिन्हेंच आहेत. आतां कोठें किंचित् कमी किंवा जास्ती येवढेंच काय तें अंतर. फ्रान्स देशांत गेल्या शतकाचे अखेरीस जी मोठी राज्यक्रांति झाली, तिचा ज्याणीं इतिहास वाचला असेल त्यांस पेंढाऱ्यांचीं दुर्धट कामें फारशीं अचाट होतीं असें वाटणार' नाहीं. × × असा हा सुंदर ग्रंथ या पूर्वी फारच थोड्यांस माहित असेल. तेव्हां हा दुर्मिळ ग्रंथ मिळवून जगास सादर केला, याबद्दल रा ० शालिग्राम हे महाराष्ट्र जनांचे स्तुतीस पात्र आहेत. कांहीं काळापूर्वी उपेक्षित जे महाराष्ट्र कवि त्यांचे ग्रंथांचें अवलोकन करून त्यांस कीर्ति मंदिरांत रसिकजनांनीं प्रतिष्ठित करावें अशा स्तुत्य उद्देशानें रं ० रा ० माधव चंद्रोबा यानीं खरे मार्मिक व विद्वान के ० परशुरामपंत तात्या गोडबोले यांचे सहाय्यानें " सर्व संग्रह " द्वारें आमचे जुन्या कवींचे बरेच ग्रंथ उदयास आणिले. या कृत्यानें आपल्या महाराष्ट्र भाषेवर व रसिक लोकांवर जे कांहीं त्यांचे उपकार झाले आहेत ते अनोनात असें कोणीही समंजस पुरुष कबूल करील. परंतु त्यांचे उपकारांची ज्या तऱ्हेनें थोडी बहुत फेड करावयाची ती महाराष्ट्रभिजनांनीं केली नाहीं म्हणून ऐकतों, व त्यामुळेंच त्यांचे मनांतून महाराष्ट्र कवींची आणखी सेवा करावयाची होती ती झाली नाहीं, असें म्हणतात. असो. त्याच प्रकारची रा ०

शालिग्राम यांची सेवा आहे तिची चहा झाल्यास हाच क्रम पुढें सुरू ठेवण्यास त्यांस उत्तेजन येईल, व त्या योगें आज लुप्त होऊं पाहणारे जे जुन्या कवींचे ग्रंथ ते सजीव दशेस येतील. तेव्हां ही अनंतफंदीची सेवा सर्व लोकांचे आदरास पात्र आहे व तिचा ते आदर करतील अशी आशा आहे. ''

लावण्याचें पुस्तक ह्मणून कोनाकोपऱ्यांतच पडायांचें; परंतु तें विद्वज्जनांचें हातीं गेलें, हा अनंतफंदीचा केलेला आदर पाहून भूषण वाटलें. तसें कोणाही पुरुषास वाटल्यावाचून राहणार नाहीं, फंदीबोवांची सेवा केल्यानें संतोष झाला, त्यांनीं या महाराष्ट्रांतील लोकांपुढें करामत प्रगट करून ठेविली होती; तिचा अनुभव या काळांतही येऊन चुकला! अनंतफंदीचे नांवावर कोणाकडे पुस्तक पाठविण्याची जरूर न लागून दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग प्राप्त झाला ही गोष्ट आश्चर्याची आहे.

---

# अनंतफंदी.

हे मूळ संगमनेरचे राहणारे असून कवित्वगुणानें ते पुण्यास नांवाजले होते. शेवटील बाजीरावाचे वेळीं ते होते. ह्यांचा जन्म शके सोळाशें सहासष्ट सालीं होऊन, शके सत्राशें एकेचाळिसांत हे कैलासवासी झाले. मरण काळीं यांचें वय पाऊणशें वर्षांचें होतें.

फंदीचें उपनांव घोलप. हे यजुर्वेदी कौन्डिण्य गोत्री ब्राह्मण. ह्यांचे वडिलांचें नांव माहित नाहीं, आईचें नांव राऊबाई. यांचे पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा व सराफीचाही होता. यांच्या कुटुंबाचें नांव म्हाळसाबाई. यांस दोन पुत्र होते. एक श्रीपतफंदी यांसच सवाईफंदी म्हणत. दुसरे बापूफंदी; हे पूर्व वयांत निवर्तले. सवाईफंदी हे शके १७९३ त कार्तिक शुद्ध पंचमीस मृत्यु पावले. सवाईफंदीच्या कुटुंबाचें नांव गंगाबाई. सवाईफंदीचा थोरल्या काळांत जन्म झाला. मृत्यु समयीं यांचें वय सुमारें पाऊणशें वर्षांचें होतें.

पूर्व वयांतील अनंतफंदीचे गुण: यांनीं जें विशेषण आपल्या नांवास जोडिलें आहे, त्यावरून हे रंगेल असून महत्वाकांक्षी होते. लोकांत प्रसिद्ध होण्यापूर्वींच यांनीं फंदी म्हणवून घेतलें. यांनीं लहानपणीं विद्याभ्यास केला किंवा नाहीं हें समजलें नाहीं, त्यांचे घरची श्रीमाधवग्रंथाची खराब अक्षरांनीं लिहिलेली प्रत पाहिली त्यावरून वरील गोष्टीचा अभाव दिसतो. तरी बहुश्रुतपणा, भाषेंतील निपुणता, वक्तृत्व आणि निस्पृहता हे गुण लहानपणींच यांचे ठायीं पूर्ण होते; हें सिद्ध करायाला पाहिजे असें नाहीं. या पुस्तकांतील लावण्या, पोवाडे वगैरे पाहून मर्मज्ञ वाचकांच्या ध्यानांत येईल. हे कीर्तन करण्यांत चतुर होते, व या कलेंत त्यांची योग्यता पहिल्या प्रतींत होती. यांची आख्या झाली ती याच गुणावरून होय. पूर्व वयांत यांनीं

ज्या लावण्या केल्या त्या उत्तान आणि विषयी जनांस अनुलक्षून केल्या आहेत, त्यांचा मासला या भागीं सादर केला. ही सेवा वाचकांस प्रिय झाल्याचें श्रवण केलें तर त्यांची सेवा करण्यास विसरूं असें नाहीं.

प्रथमत: यांस कवित्व स्फूर्ति केव्हां आणि कशी प्राप्त झाली? हें समजण्यास साधन नाहीं. यांचे लहानपणींचा वृत्तांत माहित होण्याची आशा नाहीं, पूर्वीं अशा पुरुषांचें वृत्त लिहून ठेवण्याची चाल नव्हती, अनंतफंदीचे पुत्र श्रीपतफंदी ऊर्फ सवाईफंदी हे मृत्यु पावल्यास बरेच दिवस झाले; हे बापाप्रमाणें कीर्तन करून चरितार्थ चालवीत असत. यांस कविता करण्याचा छंद होता. " फंदी मूल " हीं अक्षरें ज्या कवितेच्या शेवटीं असतात ती कविता सवाईफंदीची म्हणून उपलब्ध आहे. यांच्या कांहीं गोष्टी लोकांच्या तोंडून ऐकूं येतात, त्यावरून त्यांचे निस्पृहपणाची व चातुर्याची खात्री होते. त्यांस पुत्र दोन. वडील अनंतफंदी ऊर्फ बळवंतफंदी आणि कनिष्ठ गणपतफंदी. यांचें संगमनेरी घर अनंतफंदी पासूनच असून वरील दोघे बंधु पूर्वार्जित शेती पोती चालवून निस्पृहतेनें पूर्वजांचा बाणा बाळगून कालक्रमणा करीत आहेत. वडील भाऊ अनंतफंदी हे सुमार पंचविशीचे* सुमारांत असून यांस कविता करण्याचा छंद आहे. श्रीमंत तुकोजी महाराज होळककर यांची स्वारी जेजुरीस जाण्याकरितां इंदुराहून निघाली ती पुण्यास जाण्याची सडक संगमनेराहून जाते म्हणून संगमनेरी एक दिवस मुक्कामास उतरली. त्यावेळीं बळवंतफंदी (अनंतफंदी) तात्काल महाराजांचे भेटीस गेले. चालीप्रमाणें भेट झाल्यावर महाराजांचें गुणवर्णन ज्यांत आहे असें कवन म्हणून दाखविलें. त्यावरून मर्जी प्रसन्न होऊन पोषाक मंदील व एक शाल मिळून चार पांचशें रुपयांचा ऐवज याफंदीस दिला. हे होळकर सरकार गुण परीक्षा करणारे चांगलेच आहेत; सर्व नेटिव राजांत यांचें नाव पहिल्या प्रतींत मोडत आहे. वरील वेळीं लौकिक संपादन करून शहाणपणाचा व सत्की-

---

* शके १७७१ चे चैत्र शुद्ध नवमीस यांचा जन्म झाला.

तींची ध्वजा फडकत ठेवून महाराजांची स्वारी परत इंदुरास जाऊन पोंचली.
——वरील नातवांपासून कांहीं हकीकत मिळाली नाहीं. विशेष माहिती मिळ-ण्याची आशा नाहीं; तरी थोडी बहुत माहिती वाचकांसाठीं सादर करितों.

संगमनेरीं प्रवरातीरीं भवानीबोवा नांवाचे साधु होऊन गेले. त्यांचे वर-प्रसादेंकरूनच फंदीस कवित्व स्फूर्ति प्राप्त झाली, ती गोष्ट अशी. हे भवानी-बोवासाधू अवलिया वृत्तीचे असत. यांची समाधि संगमनेरीं आहे. अक्कलकोटचे स्वामींची तऱ्हा सांगतात तशा प्रकारची यांची असे. हे कोणास अपशब्द बोलले किंवा ताडन केलें तर त्याचें कल्याण व्हावयाचेंच असें समजत. अशा त्यांच्या गोष्टी सांगतात.

एक दरिद्री ब्राम्हण द्रव्यप्राप्तीसाठीं सप्तशृंगीचे देवळांतील देवीची आराधना करित असतां देवीनें त्यास दृष्टांत दिला कीं, तुझे प्रारब्धीं द्रव्यप्राप्ती नाहीं. तूं येथून जा. ब्राह्मणानें ती गोष्ट न मानून पुनः अराधना आरंभिली. पुनः दृष्टांत झाला कीं, प्रवरातीरीं संगमनेर आहे. तेथें भवानीबोवा साधु वास्तव्य करीत आहेत त्यांजकडे तूं जा. जें देणें तें तुला देतील. येथें राहिलास तर अपाय होईल. हें ऐकून ब्राम्हण मुकाट्यानें गडावरून खालीं उतरून, संगमनेरीं आला. तेथें भवानीबोवाचा तपास करूं लागला; परंतु ते सांपडेनात. ब्राह्मणानें दर्शनाचा निर्धार करून त्यांचे वास्तव्य स्थानीं उपोषणें आरंभिलीं. एक दिवस योग येऊन स्वारी झाडींतून बाहेर येऊन ब्राह्मणापुढें उभी राहिली. ब्राह्मणास भवानीबोवा ते हेच असें कळतांच त्यानें साष्टांग नमस्कार घालून देवीचे झालेले दृष्टांत सांगितले, आणि म्हणाला कीं, मला द्रव्य देणें तें आपले स्वाधीन आहे. या स्वारीनें ब्राह्मणाचें वृत्त ऐकून घेतलें आणि ह्मणाले, “ काय टवळी !! ( हे अपशब्द शुभ समजायाचे ) या रांडेनें मजकडे पाठविलें काय ? हा टवळीनें मला त्रास दिला ! ’ असें म्हणून ब्राह्मणास ‘ ·म्यामागें ये. मी तुला द्रव्य देतों ’ असें सांगून झपाट्यानें चालतेझाले.

ब्राह्मण मागें लागला. बरेंच दूर गेल्यावर 'पदर पसर' म्हणून सांगितलें. त्यानें पदर पसरल्यावर तेथें एके झाडाखालीं मेलेलें कुत्रें पडलें होतें तें उचलून ब्राम्हणाचे पदरांत टाकलें आणि आपण नाहींसे झाले. त्या कुत्र्याची घाण इतकी होती कीं, ब्राह्मणास ती सोसेना देखील! शेवटीं त्यानें तें कुत्रें टाकून दिलें आणि आज पर्यंत झालेल्या शिणाचा पश्चात्ताप मानला. आतां पुनः म्हणून याचे नादीं लागावयाचें नाहीं. असा निश्चय करून आंगावरील वस्त्र कुचक्या कुत्र्याच्या मांसानें भरलें होतें तें धुण्यासाठीं व एक वेळ स्नान करून ह्या विटाळापासून मोकळें व्हावें या बुद्धीनें प्रवरेवर गेला. आंगवस्त्र पाण्यांत घातलें माल! जें मांस धोतास चिकटलें होतें तें सर्व लाल सुवर्ण आहे असें दृष्टीस पडलें! जागजागीं सोन्याचे तुकडे चमकत होते ते काढून घेतले. व तसें बावनकशी कांचन पाहून यास फार सुख झालें आणि तें कुत्रें टाकले होतें तिकडे धांवत गेला. कुत्रेंबित्रें कांहीं नसून निराश झाला! प्रारब्धीं होतें तेवढें लाधलें असें समजून खंती झाला.

दुसरी गोष्ट अशी कीं, आमचे गांवचे एक गृहस्थ एके दिवशीं संगमनेरचे बाजारांतून दुसरे एका गृहस्थाशीं बोलत चालले असतां समोरून ही भवानीबोवांची अवलिया मूर्ति आली. येऊन वरील गृहस्थाचे गाल धरिले त्यांचे जे शुभ शब्द बोलावयाचे तेबोलून चालते झाले. त्या दिवसापासून वरील गृहस्थांचा अभ्युदयारंभ झाला. दुसरे जे बरोबर गृहस्थ होते त्यांस तो प्रकार झाला नसल्यामुळें त्यांचा विळा भोपळा कायम राहिला.

अशा भवानीबोवा विषयीं गोष्टी देणें म्हणजे ग्रंथ विस्तार होतो, तरी फंदीबोवाविषयीं लिहिणें आहे. तें लिहूं. फंदीबोवा लहानपणापासून खोडकर असत. घरांत कोणाचें ऐकूं नये आणि उनाड मुलांप्रमाणें हिंडत असावें; असा प्रकार नेहेमीं होता. एक दिवस आई रागें भरली. ही स्वारी

रुसून जी बाहेर गेली ती रात्रीं भवानीबोवाचे मठांत जाऊन निजली. दुसरे दिवशीं सकाळीं आई शोधित शोधित भवानीबोवाचे मठांत आली. तों स्वारी तेथें होती. मग घरीं येण्याविषयीं विनवणी द्वापारांत देवकी श्रीकृष्णाची करीत असे तशी केली. तरी ही स्वारी घरीं कांहीं केल्या येईना. मग मुलाचीं गाऱ्हाणीं भवानीबोवापाशीं सांगूं लागली. ती ह्मणाली; हा मुलगा अनिवार आहे ! कोणाचें ऐकत नाहीं. उनाड मुलें सोबतीस घेऊन त्याबरोबर धिंगामस्ती घालीत असतो ! लावण्या ऐकण्याचा भारी छंद ! रात्रीं प्रहर प्रहर रात्रपर्यंत घरीं येत नाहीं. माझें सांगणें तर खुंटलें. आतां आपण कांहीं सांगाल तर ऐकेल. हें भवानीबोवानीं ऐकून म्हणाले ' नीघ येथून ' आणखी काय त्यांच्या तऱ्हेच्या भाषेंत बोलले. आणि ' घरीं जा ' ह्मणून सांगितलें; तरी फंदीची स्वारी हालली नाहीं. मग धोंडा घेऊन फंदीच्या मागें लागून तो धोंडा फेंकून मारिला, आणि फंदीस घालवून दिलें. याच दिवसापासून अनतफंदीस कवित्व स्फूर्ति प्राप्त झाली.

पुढें त्यांनीं लावण्या बऱ्याच केल्या; त्यांतील कांहीं प्रसिद्ध आहेत. नंतर यांणीं तमाशा आरंभिला. यांचे तमाशांतील साथी एक मलकफंदी दुसरे रतनफंदी तिसरे राघवफंदी आणि चवथे हे अनंतफंदी. ' अनंतफंदीस " फंदी" नांव पडण्याचें कारण, पूर्वी संगमनेर येथें मलकफंदी म्हणून एक फकीर होता तो नेहमीं लोकांत चमत्कारिक रीतीनें वागत असे ह्मणून त्यास फंदी ह्मणत. त्या फकिराचा आणि अनंतफंदीचा स्नेह असे. यावरून यासही लोक फंदी ह्मणूं लागले. ' असा नवनीताचे नव्या आवृत्तींत लेख आहे. वर सांगितलेले चौघे फंदी तमाशा घेऊन होळकर शाईत गेले. त्यासमयीं होळकराचे राज्याची लगाम अहिल्याबाईच्या हातीं होती. हें फंदीमंडळ होळकराचे राजधानींत महेश्वरीं जाऊन दाखल झालें. विन्मुख कोणी जाऊं नये म्हणून यांचा राजवाड्यांत तमाशा झाला. अनंतफंदीचें स्वत: केलेलें कवन ऐकून तमाशा झाल्यावर अहिल्याबाईनें यांस उपदेश केला कीं, " तुम्ही ब्राम्हण असून अशा

कर्मीत कवित्व बुद्धि खर्चे करितां त्यापेक्षां हीच कविता परमार्थ साधेल अशा तऱ्हेनें कराल तर आपल्या बरोबर अन्य जनाचें हित होईल." वरील गोष्टीवरून अहिल्याबाईची परमार्थपर दृष्टि होती हें उघड दिसतें ! हा सदुपदेश ऐकून फंदोंची वृत्ति पालटली. आणि आपल्या हातीं असलेल्या डफाच्या कड्यावंर तात्काळ बुक्की मारून तें कडें फोडिलें. अहिल्याबाई होळकरीण तमाशाची बिदागी देत असतां ती न घेतां तसेच संगमनेरी आले. आणि तेव्हांपासून तमाशा करणें वर्ज केलें.

पुढें संगमनेर येथें अनंतस्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरसालप्रमाणें उत्साह होत असतां तेथील पाटलानें व इतर मंडळींनीं अनंतफंदीस तमाशा करण्यास सांगितलें. यांनीं पुष्कळ आढेवेढे घेतले, परंतु ग्रामस्थांची भिड पडली म्हणून गोष्ट कबूल करून तमाशा सुरू केला. हा तमाशाचा क्रम थोडे दिवस चालला नाहीं . तोंच अहिल्याबाईची स्वारी पुण्यास जाण्याकरितां संगमनेराहून जाऊं लागली. स्वारी ज्या रस्त्यानें जात होती त्या रस्त्यावर माणसांची गर्दी दृष्टीस पडली. ही गर्दी कशाची ? असा तपास करतांच तमाशा होत आहे म्हणून त्यांस खबर कळली. या साध्वीस तमाशाचा कंटाळा असल्यामुळें तमाशा कोण करतो ? व कोण करवितो ? वगैरे गोष्टींचा शोध करण्यास सांगून स्वारी पुढें चालती झाली. वरील प्रकारचा शोध करतांच अहिल्याबाईस अनंतफंदीचें नांव समजलें. त्या राजकारस्थानी स्त्रीस पूर्वीचे गोष्टीची आठवण होऊन फंदीचें डोकें मारावें असा इरादा करून स्वारी माघारी फिरली. अनंतफंदीस ही वार्ता समजतांच पूर्वी केलेल्या प्रतिज्ञेचें स्मरण होऊन त्यांस दिलगिरी प्राप्त झाली. ह्या कवीच्या आंगीं समयसूचकता होती तेणेंकरून संकटांतून पार पडण्याचें सामर्थ्य आलें. अनंतफंदींनीं अहिल्याबाई आपला शिरच्छेद करण्यासाठीं येतात हें ऐकून पुढील नर्तक यास खालीं बसविलें आणि मागील एक टाळकरी ठेवून बाकी सर्व साथीदार यांस जाण्यास सांगून मध्वनाथ मुनीच्य

पदावर कीर्तन आरंभिलें. तें पदः—हरी तुझी मुरली घरघेणी ॥ धृ० ॥ मुरलीनें कसें लाविलें पिसें, गोपि विंचरतां विसरली वेणी। तुझी मुरली घर-घेणी। हरी ॥ १ ॥ वृंदावनीं धीट झालों आम्हीं नीट लोक लाजेवरी सांडियलें पाणी। तुझी मुरली घरघेणी ॥ २ ॥ मध्वनाथ स्वामी भाग्यवंत आम्ही, हेची मागतसे शेवटली घेणी। तुझी मुरली घरघेणी ॥ हरी० ॥ ३ ॥ या पदावर कथा चालविली. अहिल्याबाई येऊन पाहतात तर कीर्तन चाललें आहे. हा वक्ता उत्तम आणि अहिल्याबाईस कीर्तनाची मोठी हौस ! त्या येऊन कथा ऐकण्यास बसल्यावर फंदीनीं वाक्चातुर्य आणि चतुरस्रता प्रकट करून शाबासकी मिळविली. पहिल्याच वेळीं अहिल्याबाई आणि श्रोते मंडळी संतोष पावतील असा रंग फंदीनीं भरून दिला. श्रोत्यांचीं मनें प्रसन्न करणें दुर्घट काम, पण या सभाधीटानें जुन्या हरदासाचा भास प्रकट केला ! मग याची कीर्ति आजपर्यंत चालल्याचें नवल काय ? पुण्यशील अहिल्याबाईनें फंदीस तात्काळ एक भरजरी पोषाग आणि सुवर्णाचीं कडीं इनाम दिलीं ! या साध्वीचे परोपकाराविषयीं तर डंका वाजत आहे. कीर्तन करणें हें अनंतफंदीचे मनांत नवतें, परंतु अशा दुर्धर प्रसंगांतून पार पडण्यास जी कला उपयोगी पडली, तीच फंदीनीं शेवटपर्यंत चालविली; आणि तमाशाचा नाद सोडून दिला.

कीर्तन करण्याविषयींचा अनंतफंदीचा काय लौकिक झाला ? तो काय कारणानें झाला ? आणि तो कोठपर्यंत टिकेल. हें आतां निरूपण करूं. या कवीविषयीं होनाजीबाळाची कविता आहे. ती दाखल करतों-

" फंदी अनंद कवनाचा सागर। अजिंक ज्याचा हातखंडा ॥
" चमत्कार चहूंकडे चालतो। सृष्टीवर ज्याचा झेंडा ॥ धृ० ॥
" मूळ संगमनेर ठिकाण त्याचा। कीर्ति उदय जैसा अर्की ॥
" नविन तऱ्हा नारळी डोयीला। पदर पागोत्याची फिर्की ॥
" वाचावंत संपत्ती सारखी। बहुतांचें तनमन हारकी ॥

" लांगे लुंगे कवि भेदरले । अवघ्यांवर त्याची गुर्की ॥
" समोर गातां कोणी टिकेना । मनामधीं बसली कर्की ॥
" धन ज्याचा हातचा मळ । केवळ तो रुपयांचा हांडा ॥ च० ॥ १ ॥
" फंदी आनंदी छंदी बरदी । ब्राम्हण त्यावर गुरुकृपा ॥
" सरस्वती जिव्हाग्रीं अक्षयीं । भंग नसे ज्याच्या हरपा ॥
" कवन बहुत उदरामधीं भरलें । फणस जसा मोठा कापा ॥
" भाळीं त्रिपुंडी टिळा केशरी । कस्तुरीचा वरती छापा ॥
" मोठमोठ्या राज्यांमधीं महशुर । जगजाहीर चारी तर्फा ॥
" आकट विकट कवनांच्या चाली । नित्य नव्या आक्षयीं थापा ॥
" विद्या आभिमान नाहीं जयाला । असा कवी कंचा धुंडा ॥ च० ॥ २ ॥
" नांवाचें चांदणें जगाचें । मुख्य मुख्य खासे खासे ॥
" कीर्तनरंगीं झडाघालिती । मानवला सर्वत्रांशी असे ॥
" पुढें मागें ऐसा नसे दुसरा । मृत्यु लोकीचा रहिवाशी ॥
" पहा रत्न पंधरावें माता । धन्य जन्मली हो त्याशीं ॥
" असा पुरुष चिरकाल असावा । गुणनिर्गुणपंडित राशी ॥
" होनाजीबाळ म्हणे जगावा । बहुतकाळ अयुष्य याशीं ॥
" अवीट ज्याची करणी ऐकतां । देह प्राण होतो थंडा ॥
" गुरव त्याचे संगें सोबती । कुशल कला जाणे उदंडा ॥
" चमत्कार चहूंकडे चालतो । सृष्टीवर ज्याचा झेंडा ॥
" फंदी अनंत कवनाचा ० ॥ ३ ॥ "

ह्या कवनावरून या कवीच्या हयातींतच यांची योग्यता किती वाढली होती. होनाजीबाळानें फंदीचें हें वर्णन केलें तें शब्दशः खरें आहे. फंदीचे ठिकाणीं मत्सर असता तर या वर्णनास ते पात्रच झाले नसते. वरील कवनांत ' विद्या अभिमान नाहीं जयाला ' हे शब्द पाहून तर खात्रीच होऊन चुकली. पेशवाईत गुणीजनांची चहा होती व त्यांच्या गुणाप्रमाणें

त्यांचा सत्कार होऊन इनाम मिळत असे; फंदीचाही परामर्श राजद्रव्यानेंच होता होता. यांस दुसरा व्यवसाय करण्याची जरूर पडली नाहीं. अद्याप पर्यंत राजद्रव्यानें फंदीची तिसरे पिढीची उपजीविका चालत आहे. पेशवाईत गुणी मनुष्यांस आश्रय मिळत होता ह्मणून त्या वेळच्या दातृत्वाविषयीं अभिमान वाटतो.

जोंपर्यंत कीर्तनकला आमच्या देशांत आहे; तोंपर्यंत अनंतफंदीचें नांव अबालवृद्धांचे मुखीं अबाधीत चालेल; कारण ज्या वेळीं छापण्याची सोय नवती त्यावेळीं हे कवि निपजले असून त्यांची कीर्ति आजपर्यंत टिकली हें काय थोडें झालें! अनंतफंदीची कविता तात्काळ ठसणारी आहे. यांनीं कटाव फटके आणि लावण्या केल्या. क्वचित श्लोक, आर्या, पदेंही कथेंत म्हणण्यासाठीं केलीं. ओंव्या महिपतीच्या ओंव्याच्या पद्धतीवर आहेत. यांचा ओवीबद्ध ग्रंथ सादर केला; त्याचें नांव ' माधवग्रंथ. ' हा ग्रंथ पुण्यांतील वृद्ध पुरुषां शिवाय करून कोणास माहित नसेल. ' हा ग्रंथ करण्याचे कारण सवाई माधवराव पेशवे उडी टाकून मरण पावले, त्या वेळेस पुण्याचे कारभारी मंडळींनीं बाजीराव रघुनाथ यांजकडून झालेल्या हकीकतीचें पत्र अनंतफंदीस पाठविलें आणि त्याची कविता करूं सांगितली. त्यावरून ओवीबद्ध ग्रंथ केला. ' या ग्रंथांत ग्रांटडफकृत मराठ्यांचे इतिहासापेक्षां ज्यास्त हकीकत आहे, असें वाटल्यावरून 'माधवग्रंथ' प्रसिद्ध करण्याच्या हेतूनें हें पुस्तक छापलें. या ' माधवग्रंथा ' प्रमाणें पेशव्यांचे इतिहासाचा पुष्कळ भाग यांचे कडून वर्णिला जाता तर काय मौज होती! हरदासांच्या संबंधानेंच यांचें नांव गाजेल. हें वर कथन केलेंच आहे. ग्रंथकार या संबंधाचा विचार करवत नाहीं. या देशांत कीर्तन करणाऱ्या गोसाव्यांची चहा रसिकांकडून चांगली होते. सात आठ वर्षांपूर्वीं यां शहरीं पन्हळगडकर गोसांवी आले होते त्यांची वक्तृत्व तऱ्हा प्रतिपादन करण्याची व गाण्याची तऱ्हा पाहून लोक थक्क होऊन गेले. अद्यापी त्यांची आठवण काढून माना डोलवितात. याव-

" लांगे लुंगे कवि भेदरले । अवघ्यांवर त्याची गुर्की ॥
" समोर गातां कोणी टिकेना । मनामधीं वसली कर्की ॥
" धन ज्याचा हातचा मळ । केवळ तो रुपयांचा हांडा ॥ च० ॥ १ ॥
" फंदी आनंदी छंदी वरदी । ब्राम्हण त्यावर गुरुकृपा ॥
" सरस्वती जिव्हाग्रीं अक्षयीं । भंग नसे ज्याच्या हरपा ॥
" कवन बहुत उदरामधीं भरलें । फणस जसा मोठा कापा ॥
" भाळीं त्रिपुंडी टिळा केशरी । कस्तुरीचा वरती छापा ॥
" मोठमोठ्या राज्यांमधीं महशुर । जगजाहीर चारी तर्फा ॥
" आकट विकट कवनांच्या चाली । नित्य नव्या आश्चर्य थापा ॥
" विद्या आभिमान नाहीं जयाला । असा कवी कंचा धुंडा ॥ च० ॥ २ ॥
" नांवाचें चांदणें जगाचें । मुख्य मुख्य खासे खासे ॥
" कीर्तनरंगीं झडाघालिती । मानवला सर्वत्रांशी असे ॥
" पुढें मागें ऐसा नसे दुसरा । मृत्यु लोकींचा रहिवाशी ॥
" पहा रत्न पंधरावें माता । धन्य जन्मली हो त्याशीं ॥
" असा पुरुष चिरकाल असावा । गुणनिर्गुणपंडित राशी ॥
" होनाजीबाळ म्हणे जगावा । बहुतकाळ अयुष्य याशीं ॥
" अवीट ज्याची करणी ऐकतां । देह प्राण होतो थंडा ॥
" गुरव त्याचे संगें सोबती । कुशल कला जाणे उदंडा ॥
" चमत्कार चहूंकडे चालतो । सृष्टीवर ज्याचा झेंडा ॥
" फंदी अनंत कवनाचा ० ॥ ३ ॥ "

ह्या कवनावरून या कवीच्या हयातींतच यांची योग्यता किती वाढली होती. होनाजीबाळानें फंदीचें हें वर्णन केलें तें शब्दशः खरें आहे. फंदीचे ठिकाणीं मत्सर असता तर या वर्णनास ते पात्रच झाले नसते. वरील कवनांत ' विद्या अभिमान नाहीं जयाला ' हे शब्द पाहून तर खात्रीच होऊन चुकली. पेशवाईंत गुणीजनांची चहा होती व त्यांच्या गुणाप्रमाणें

त्यांचा सत्कार होऊन इनाम मिळत असे; फंदीचाही परामर्श राजद्रव्या-नेंच होता होता. यांस दुसरा व्यवसाय करण्याची जरूर पडली नाहीं. अद्याप पर्यंत राजद्रव्यानें फंदीची तिसरे पिढीची उपजीविका चालत आहे. पेशवाईत गुणी मनुष्यांस आश्रय मिळत होता ह्मणून त्या वेळच्या दातृ-त्वाविषयीं अभिमान वाटतो.

जोंपर्यंत कीर्तनकला आमच्या देशांत आहे; तोंपर्यंत अनंतफंदीचें नांव अबालवृद्धांचे मुखीं अबाधीत चालेल; कारण ज्या वेळीं छापण्याची सोय नवती त्यावेळीं हे कवि निपजले असून त्यांची कीर्ति आजपर्यंत टिकली हें काय थोडें झालें! अनंतफंदींची कविता तात्काळ ठसणारी आहे. यांनीं कटाक फटके आणि लावण्या केल्या. क्वचित श्लोक, आर्या, पदेंही कथेंत म्हणण्या-साठीं केलीं. ओंव्या महिपतीच्या ओंव्याच्या पद्धतीवर आहेत. यांचा ओवी-बद्ध ग्रंथ सादर केला; त्याचें नांव ' माधवग्रंथ. ' हा ग्रंथ पुण्यांतील वृद्ध पुरुषां शिवाय करून कोणास माहित नसेल. ' हा ग्रंथ करण्याचे कारण सवाई माधवराव पेशवे उडी टाकून मरण पावले, त्या वेळेस पुण्याचे कार-भारी मंडळींनीं बाजीराव रघुनाथ यांजकडून झालेल्या हकीकतीचें पत्र अनं-तफंदीस पाठविलें आणि त्याची कविता करूं सांगितली. त्यावरून ओवीबद्ध ग्रंथ केला. ' या ग्रंथांत ग्रांटडफकृत मराठ्यांचे इतिहासापेक्षां ज्यास्त हकी-कत आहे, असें वाटल्यावरून 'माधवग्रंथ' प्रसिद्ध करण्याच्या हेतूनें हें पुस्तक छापलें. या ' माधवग्रंथा ' प्रमाणें पेशव्यांचे इतिहासाचा पुष्कळ भाग यांचे कडून वर्णिला जाता तर काय मौज होती! हरदासांच्या संबंधानेंच यांचें नांव गाजेल. हें वर कथन केलेंच आहे. ग्रंथकार या संबंधाचा विचार कर-वत नाहीं. या देशांत कीर्तन करणाऱ्या गोसाव्यांची चहा रसिकांकडून चांगली होते. सात आठ वर्षांपूर्वी यां शहरीं पन्हळगडकर गोसांवी आले होते त्यांची वक्तृत्व तऱ्हा प्रतिपादन करण्याची व गाण्याची तऱ्हा पाहून लोक थक्क होऊन गेले. अद्यापी त्यांची आठवण काढून माना डोलवितात. याव-

रून फंदींचें स्पष्ट वक्तृत्व व स्वतःचें कवन, तें कवन इतकें गोड कीं—पूर्वी सारंगी, सतार वाद्यांवर ख्याल, टप्पे, इत्यादि चिजा गाऊन श्रोत्यांची मनें वश करण्याची कला होती; ती यांच्या लावण्या छंदापुढें फिकी पडत चालली त्याचा लोप यांच्यां होनाजीबाळ, सगनभाऊ यांच्या खड्या सुरा पुढें झाला. यावरून तो किती गोड असेल ? याची कल्पना वाचक करतील. अशी गोड म्हणणी, माहिती पुष्कळ अशा हरदासाचें कीर्तन पाहून श्रोते संतोष पावत असतील यांत नवल काय ? त्यांची कथा पाहिलेले पुरुष आहेत त्यांच्या गोष्टी ऐकिल्या म्हणजे फंदींत शिघ्र कवित्व वक्तृत्व आणि शोधकपणा इत्यादि गुण वसत होते हें विदीत होईल. सोलापुरकर जोशीबावाच्या प्रतीची ही असामी असून स्वभावही तसाच होता.

अनंतफंदींनीं चिरकाल चालेल अशी देणगी मिळविली नाहीं. सवाईफंदीनी मात्र पांचशें रुपयांचें वर्षासन गायकवाडींत ( बडोद्यास ) मिळविलें. तें अद्यापपर्यंत त्यांचे वंशजाकडे चालत आहे, फंदींचे वंशज बडोद्यास गेले म्हणजे शहरांत येण्याकरितां सरकाराची गाडी, छत्री मशाल पाठवून आणविण्याची चाल आद्यापपर्यंत आहे.

आम्ही हा हेतु सिद्धीस नेण्याची सामग्री मिळवीत असतां नामांकित मासिक पुस्तक जें ' निबंधमाला ' त्याचा विसावा अंक दृष्टीस पडला; तेणेंकरून हुशारी आली. आणि त्यांत केलेली सूचना आम्हासच झाली असें वाटून हेतु तडीस नेण्यास उत्तेजन मिळालें. हें कृत्य तडीस गेल्यास वरील पुस्तकाचे उपकार झाले असें मानूं. हीच सूचना काय ? पण अशा सूचना या पुस्तकांत ठिकठिकाणीं आढळतात. त्या सिद्धीस नेण्याचा प्रयत्न केला तर त्याचे उपकार होतील. हें पुस्तक भाषेच्या व देशाच्या उत्कर्षास कारणीभूत आहे त्यास उदंड अयुष्य देण्याविषयीं परमेश्वरास शरण जाऊन हितचिंतक पुस्तकाचा डंका देशभर गाजत राहूं देण्याविषयीं त्याची प्रार्थना करितों.

चुकांची क्षमा करावी हा सुज्ञांचा धर्मच आहे; हें पहिलें कृत्य ह्मणून पुष्कळ चुकांचा संभव आहे. त्यांबद्दल माफी असावी. कांहीं सूचना करण्यासारख्या असल्यास किंवा नवीन माहिती पाठवून देण्यासारखी असल्यास पाठवावी. पुढील आवृत्तींत त्यांचा विचार करूं.

हें पुस्तक आमचे हातें जगापुढें आणिलें यावरून ईश्वराचे आभारी होऊन सच्चिदानंद परमेश्वराची प्रार्थना करितों. व असेंच सत्कृत्य करविण्याविषयीं विज्ञप्ति करितों.

---

# अनंतफंदीविषयीं महदाख्यायिका.

—o*o—

या कवीच्या कांहीं गोष्टी येथें निरूपण करूं.

१ एके दिवशीं नानाफडनाविसांनीं बांधलेल्या बेलबागेंतील सभामंडपांत अनंदफंदीचें कीर्तन चाललें होतें. अस्खलित वक्त्वत् श्रावणांत श्रोते निमग्न असतां नानाफडणविसाच्या मागें नवीन झालेले कारभारी सदाशीव माणकेश्वर हे देवदर्शनास आले. श्रोते मंडळी ताजीम देण्याकरितां उभी राहिली. हरदास बोवाही जरा थांबलें. आणि नमस्कार करून लोंडाकडे हात दाखविला. कांहीं तरी बोललें पाहिजे म्हणून सदाशीव माणकेश्वर ह्मणाले "हें केव्हां पासून धरिलें ?" हरदासानें उत्तर केलें कीं, "आपण विणा खालीं ठेविला आणि आम्ही उचलिला !"

२ एके दिवशीं शंकराचार्यांची स्वारी संगमनेरीं आली. त्यावेळीं कुटिल लोकानीं शंकराचार्यास विनंति केली कीं, अनंतफंदी हे ब्राम्हण असून स्नान संध्या करीत नाहींत. तमाशा करीत असतात. हें कळतांच स्वामीनीं फंदीस बोलावणें पाठविलें. बोलावणें पोंचल्यावर उलट विनंती कळविली कीं, तमाशाच्या सरंजामासह बोलाविलें किंवा एकट्यासच बोलाविलें ? हा निरोप कळतांच आचार्यांस राग येऊन सांगून पाठविलें कीं, तुह्मास हावें तसें यावें. फंदी नर्तकासह तेथें गेलें. लावण्या ह्मणण्याकरितांच स्वामिनीं बोलाविलें असा फंदीचा समज होता. तेथें गेल्याबरोबर तुमची जात कोण ? असा स्वामींनीं प्रश्न केला. "ब्राह्मण" ह्मणून फंदींनीं उत्तर दिलें. हें ऐकतांच संध्या ह्मणून दाखविण्याविषयीं स्वामींनीं आज्ञा केली. जो तमाशा करणारा त्यास संध्या येणार नाहीं व स्वामी त्यास बहिष्कृत करतील, असा कुटिल मंडळीस भरंवसा होता. फंदींनीं डफावर थाप मारिली, आणि संध्येतील चोवीस नामांची लावणी करून तात्काळ ह्मणून दाखविली ! ती ऐकून स्वामींची मर्जी सुप्रसन्न झाली.

३. हे कवी माळव्यांतून संगमनेरी येण्यास निघाले. मार्गांत सातपुडा पर्वत लागतो. त्या पर्वतांत भिल्लांचा उपद्रव मनस्वी असे. सातपुड्याचे मध्यभागीं फंदी आपल्या तमासगीर मंडळींसह येतांच त्याजभोंवतीं भिल्लांनीं गर्दी केली. त्यांचे जवळचा सर्व अजबाब लुटला! फंदींनीं तो समय लक्षांत आणून कवित्वबुद्धि प्रगट केली. भिल्लांवर लावणी करून ती नायकास म्हणून दाखविली. ती लावणी ऐकून भिल्ल आणि त्यांचा नाईक संतोषित होऊन फंदीचें सर्व घेतलेलें द्रव्य त्यांस परत करून आणखी एक पोषाग आणि दोनशें रुपये वर दिले. बरोबर पांच भिल्ल देऊन फंदीस संगमनेरचे वेशी पर्यंत पोंचतें केलें. भिल्ल, रामोशी यांची गांठ रानांत पडल्यावर नुसता शब्द निघण्याची मारामार! मग बोलणें कोठचें? पण फंदीचें धारिष्ट विलक्षण.

४. एके दिवशीं रावबाजींनीं फंदीबोवांस आपणांवर कविता करण्यास सांगितलें. फंदीनीं गंगकवी सारखा प्राप्त झालेला प्रसंग दवडिला नाहीं. त्यांनीं खालची कविता करून म्हटली:—

## ओंव्या.

“ वडिलांचे हातचे चाकर ॥ त्यांस न मिळे भाकर ॥
“ अजागळ ते तूपसाकार ॥ चारूनि व्यर्थ पोशिले ॥ १ ॥
“ सत्पात्राचा त्रास मनीं ॥ उपजे प्रभूचे मनांतूनि ॥
“ ज्या पुरुषास न पुसे कोणी ॥ अर्धी त्याला भजावें ॥ २ ॥
“ तट्टू ज्यास न मिळे कधीं ॥ पालखी द्यावी तयास आधिं ॥
“ मडकें टाकूनि भांड्यांत रांधी ॥ ताटवाट्या भोजना ॥ ३ ॥
“ द्रव्य देऊन आणिक आणिक ॥ नवे तितके केले धनिक ॥
“ जुन्यांची तिंबुनि कणीक ॥ राज्य आपुलें हरविलें ॥ ४ ॥
“ जो पायलीची खायील क्षिप्रा ॥ पालखी द्यावी तया विप्रा ॥
“ निराक्षर एकाद्या विप्रा ॥ त्याला क्षिप्रा चारावी ॥ ५ ॥
“ एके दिवशीं व्हावी खुशाली ॥ स्वारी पुढें शंभर मशाली ॥

" एके दिवशीं जैशी निशा आली ॥ मशाल एकही नसावी ॥ ६ ॥
" मेण्यांत बसावें जाउनि ॥ कपाटें ध्यावीं लाऊनि ॥
" स्वरूप कोणा न दावूनि ॥ जागे किंवा निजले कळेना ॥ ७ ॥
" हुताशनीच्या सुंदर गांठ्या ॥ शेर शेर साकराच्या पेख्या ॥
" विप्र कंठीं जैशा ग्रंस्या ॥ उग्याच कंठ्या घालाव्या ॥ ८ ॥
" तशाच राख्या जबरदस्त ॥ सांभाळितां जड होती हस्त ॥
" दौलत लुटुनि केली फस्त ॥ हस्त चहूंकडे फिरविला ॥ ९ ॥
" तुरा शिरीं केवढा तरी ॥ बहुतची मोठा चक्राकारी ॥
" हार गजरे नखरेदारी ॥ सोंगापरी दिसावें ॥ १० ॥
" हात हात रेशमी धोतरजोडे ॥ चालतां ओझें चहूंकडे ॥
" आंगवस्त्र दाहदां पडे ॥ चरणीं खडे रुततातीं ॥ ११ ॥
" पोषाग दिधले बाजिरायें ॥ मोच्यांस पैका कोठें आहे ? ॥
" तैसेच अनवाणी चालताहे ॥ शास्त्री अथवा अशास्त्री ॥ १२ ॥
" घडींत व्हावें क्रोधयुक्त ॥ घडींत व्हावें आनंदभरित ॥
" घडींत व्हावें कृपण बहुत ॥ घडींत उदार कर्णापरी ॥ १३ ॥
" घडींत व्हावी सौम्य मुद्रा ॥ घडींत यावा कोप रुद्रा ॥
" घडींत घ्यावी क्षणैक निद्रा ॥ स्वेच्छाचारी प्रभू हा ॥ १४ ॥

हें कवन बाजीराव साहेबांस ह्मणून दाखविण्याचे पूर्वीं फंदीनीं आपलें बिऱ्हाड पुण्याबाहेर बांभुर्ड्यास नेलें होतें ! हें कवन ऐकून रावबाजीची मर्जी रुष्ट झाली. पुढें दोन तीन महिने फंदी वाड्यांतच गेले नाहींत. कांहीं दिवसांनीं पेशव्यांनीं फंदीस बोलावणें पाठवून वाड्यांत येण्याविषयीं कळविलें. फंदी आल्यावर ' प्रभु बाजिराय उदार मोठे सांभ जसे ॥ ज्याचें दैव उघडेल त्याला मनस्वी पैका देत असे ॥ ' असें नवें कवन करून दाखविलें. संतोष पावून नाशीक शहर जहागीर देण्याचें योजिलें, परंतु प्रधान मंडळींतून अशी कोणी सूचना केली कीं, यांस येवढी जहा-

" एके दिवशीं जैशी निशा आली ॥ मशाल एकही नसावी ॥ ६ ॥
" मेण्यांत बसावें जाउनि ॥ कपाटें घ्यावीं लाऊनि ॥
" स्वरूप कोणा न दावूनि ॥ जागे किंवा निजले कळेना ॥ ७ ॥
" हुताशनीच्या सुंदर गांठ्या ॥ शेर शेर साकराच्या पेट्या ॥
" विप्र कंठीं जैशा ग्रंथ्या ॥ उग्याच कंठ्या घालाव्या ॥ ८ ॥
" तशाच राख्या जबरदस्त ॥ सांभाळितां जड होती हस्त ॥
" दौलत लुटुनि केली फस्त ॥ हस्त चहूंकडे फिरविला ॥ ९ ॥
" तुरा शिरीं केवढा तरी ॥ बहुतची मोठा चक्राकारी ॥
" हार गजरे नखरेदारी ॥ सोंगापरी दिसावे ॥ १० ॥
" हात हात रेशमी धोतरजोडे ॥ चालतां ओझें चहूंकडे ॥
" आंगवस्त्र दाहदां पडे ॥ चरणीं खडे रूतताती ॥ ११ ॥
" पोषाग दिधले बाजिरायें ॥ मोच्यांस पैका कोठें आहे ? ॥
" तैसेच अनवाणी चालताहे ॥ शास्त्री अथवा अशास्त्री ॥ १२ ॥
" घडींत व्हावें क्रोधयुक्त ॥ घडींत व्हावें आनंदभरित ॥
" घडींत व्हावें कृपण बहुत ॥ घडींत उदार कर्णापरी ॥ १३ ॥
" घडींत व्हावी सौम्य मुद्रा ॥ घडींत यावा कोप रुद्रा ॥
" घडींत घ्यावी क्षणैक निद्रा ॥ स्वेच्छाचारी प्रभू हा ॥ १४ ॥

हें कवन बाजीराव साहेबांस ह्मणून दाखविण्याचे पूर्वीं फंदीनीं आपलें बिऱ्हाड पुण्याबाहेर बांभुर्ड्यास नेलें होतें ! हें कवन ऐकून रावबाजीची मर्जी रुष्ट झाली. पुढें दोन तीन महिने फंदी वाड्यांतच गेले नाहींत. कांहीं दिवसांनीं पेशव्यांनीं फंदीस बोलावणें पाठवून वाड्यांत येण्याविषयीं कळविलें. फंदी आल्यावर ' प्रभु बाजिराय उदार भोळे सांभ जसे ॥ ज्याचें दैव उघडेल त्याला मनस्वी पैका देत असे ॥ ' असें नवें कवन करून दाखविलें. संतोष पावून नाशीक शहर जहागीर देण्याचें योजिलें, परंतु प्रधान मंडळींतून अशी कोणी सूचना केली कीं, यांस येवढी जहा-

गीर दिलें तर तरवार गाजविणाऱ्यास काय द्यावें ? कोणी म्हणतात कीं, फर्दांनीं या अशाश्वत महाराजांचें देणें नाकारिलें. कारण मर्जी बहाल झाली ह्मणून जहागीर मिळत आहे; मर्जी खप्पा झाली तर ही देणगी परत घे-तली जाईल! यांस लिताळे होऊं नये, हा उत्तम मार्ग. घेतलेली सनद मागें दिली.

या ठिकाणीं गंग कवीची हकिकत अप्रासंगिक होणार नाहीं म्हणून ती या खालीं दिली. गंग कवी कित्येकांस माहित नसेल. दिल्ली दरबारांत बादशहाचे पदरीं भाट कवि असत, ही गोष्ट सर्वांस विश्रुत असेल.

अकबर बादशहाचे वेळीं राजाश्रित गंग कवि होता. अकबराचे बापाची व आजोबाची कारकीर्द या कवीनें पाहिली होती. बाबरचे वेळीं आणि हुमायुनचे वेळीं झालेल्या उलाढाल्या यांस माहित असून त्या वेळीं झालेल्या लढायांचें काव्यरूपानें या गंग कवीनें बहारीचें वर्णन केलें होतें. त्यामुळें या कवीची कीर्ति सर्व देशांत पसरून दरबारांत तर विशेषच मान्यता असे. अकबरानें लढाई वगैरे केल्याचें माहित नाहीं. सर्वच स्वस्थता होती. अकबर बादशहानें आपल्या पूर्ववयींच वृद्ध झालेल्या गंग कवीस आम्हावर कांहीं तरी कविता करावी ह्मणून सांगितलें. हा बादशहाचा हेतु ऐकून गंग कवीनें स्पष्ट सांगितलें कीं, तुमचे कारकीर्दींत कविता करण्याजोगी गोष्ट अझून घडून आली नाहीं! आमचें काम काय? कविता करावी हेंच. बाद-शहानें अत्याग्रहानें पुनः सांगितलें कीं, आजपासून तीन दिवसांचे आंत कविता केलीच पाहिजे. कवी घरीं जाऊन निरवानिरव करूं लागला. घरीं कवीची बायको आणि नंदलाल नांवाचा लहान मुलगा होता. बायकोनें कवीस असें करण्याचें कारण विचारलें. कवीनें दरबारांत झालेली बिना सांगून पुढें सांगितलें कीं, खरें काव्य प्रसिद्ध करावें हें कवीचें काम. आणि तसें केल्याचा बादशहास राग येऊन तो माझा घात करील. यासाठीं तीन दिवसांचे पुढें माझा वांचण्याचा भरंवसा नाहीं.

नेमल्या दिवशीं कवी दरबारांत जाऊन थडकले. बादशहानें कविता केली काय ? ह्मणून विचारलें. भाटकवीनें पूर्वीचेंच उत्तर आतांही दिलें. बादशहास राग येऊन सांगितलें कीं, "कविता न केली तर तुमचें डोकें तोडूं !" गंगकवीनें हें भाषण ऐकून ह्मटलें कीं:—

"कभी न गांडू रण चढे कभी न वाजे बंब
सकल सभाकू रामराम बिदा होत कवि गंग"

हें ऐकून बादशहा कोपायमान होऊन "गंग कवीस हत्तीचे पायीं बांधून मारवावें" असा हुकूम केला. हा हुकूम ऐकून अमीर, उमराव, आदिकरून सर्व सभेस वाईट वाटलें; परंतु काय ? कवीस हुकुमाप्रमाणें हत्तीच्या पायीं चिरडवून मारविलें ! !

पुढें कांहीं दिवसांनीं गंग कवीची योग्यता बादशहाचे लक्षांत येऊन केल्या कर्माचा अनुताप झाला; परंतु आतां काय ? गेली मूर्ति ती गेली ! बादशहास शोक झाला. दरबारांतील मंडळी कवीचा निस्पृहपणा नेहमीं वर्णीत. कांहीं काळानें कवीपुत्र नंदलाल मोठा झाला. बापाची योग्यता लोकांचे तोंडची त्यानें ऐकिली होती. शहरांत ज्याची लोक स्तुति करितात व ज्यावांचून दरबार शून्य दिसतें ह्मणून बोलतात, असा माझा बाप कोण ? त्याची गति झाली काय ? याची पुसतपास करण्याची इच्छा त्यास होऊन तो आपल्या मातोश्रीकडे गेला; आणि बापाचें इतिवृत्त विचारूं लागला. आईनें डोळ्यांस पाणी आणून कवीची योग्यता आणि बादशहाचा मूढपणा पुत्रास सांगितला. 'बीज तसा अंकुर' तें ऐकिल्याबरोबर "आतांच बादशहाकडे जातों" ह्मणून रागानें म्हणाला. आईनें सांगितलें "बाळा तूं बादशहाकडे जाऊं नको. त्यास बोललास तर तो तुलाही मारील."

नंदलाल न ऐकतां रात्र झाली होती तरी तसाच राजवाड्याकडे निघाला. वाड्यांत गेला तों त्यास समजलें कीं, बादशहा महालांत निजले आहेत. हा काय ? जो निघाला तो महालाकडे गेला. महालाचें द्वार लाविलेलें

होतें तें पाहून द्वाराची कडी हातीं धरून द्वार ठोठावूं लागला!! तें ऐकून बादशहा महालांतून " कोण आहे ? " अशी चौकशी करतो तों हा बोलला:—

" अकब्बर बे अकब्बर तूं है अंधा नर।
तूं होजा हमारी स्त्री अगर होजा हमारा वर॥
एक हातमे घोडा बे एक हातमे खर॥
कहेना हता सो कहे दिया करना होय सो कर॥ "

हें बादशहानें ऐकून कविपुत्रास दरबारांत येण्याविषयीं सांगितलें; आणि दुसरें दिवशीं दरबारांत कविपुत्रास आणविण्याविषयीं प्रधानास सांगून पाठवून नंदलालाचा निरोप घेऊन महालांत गेला. दुसरे दिवशीं कविपुत्र दरबारांत गेल्यावर बादशहानें ताजीम देऊन, आसन दिलें; " कांहीं कविता करूं शिकला काय ?" म्हणून त्यास विचारलें. यास रात्रीचा राग होता. त्यानें म्हटलें कीं:—

" कारळ को खेत कहा, कपटी को हेत कहा, वेश्या-
का विश्वास कहा, रांगके रुपय्याकू कहा जातुराये॥
काटकी तलवार बांध कोण जंग जींत पावे॥
पथरके मुरतको कबलो समजाईये॥
गुलामनके गुलाम, तिलामनके तिलाम कविगंग—
ऐसे गुणीकु, क्यां गरिंदसे तुराईये॥

याचा भावार्थ:—" कडुकारळ्याच्या शेतांत तसेंच लबाडाचे हेतूंत आणि कलावंतिणीच्या विश्वासांत जीव काय ? कातड्याच्या रुपयांत काय जीव ? लांकडाची तरवार बांधून कोणी जय पावला काय ? तशीच दगडाची मूर्ती समजावण्याचें म्हटलें तर ती समजेल काय ? ( शेवटीं तर बादशहास एक शिवी आंसडून म्हटलें कीं, ) कविगंग ऐसा गुणी हत्तीचे पायीं बांधावा ? " हा भावार्थ उरदु भाषा जाणत असलेल्यास कळून येण्याजोगा आहे. याप्रमाणें नंदलाल बोलला तरी अकबर न रागावतां उलटा संतोष पावून कवी पुत्रास मोठी देणगी दिली; आणि नित्य गंगकवीप्रमाणें दरबारांत येण्याविषयीं कवीपुत्रास विनविता झाला!

नेमल्या दिवशीं कवी दरबारांत जाऊन थंडकले. बादशहानें कविता केली काय ? ह्मणून विचारलें. भाटकवीनें पूर्वीचेंच उत्तर आतांही दिलें. बादशहास राग येऊन सांगितलें कीं, "कविता न केली तर तुमचें डोकें तोडूं !" गंगकवीनें हें भाषण ऐकून ह्मटलें कीं:—

" कभी न गांडू रण चढे कभी न वाजे बंब
सकल सभाकू रामराम बिदा होत कवि गंग "

हें ऐकून बादशहा कोपायमान होऊन "गंग कवीस हत्तीचे पायीं बांधून मारावें" असा हुकूम केला. हा हुकूम ऐकून अमीर, उमराव, आदिकरून सर्व सभेस वाईट वाटलें; परंतु काय ? कवीस हुकुमाप्रमाणें हत्तीच्या पायीं चिरडवून मारविलें ! !

पुढें कांहीं दिवसांनीं गंग कवीची योग्यता बादशहाचे लक्षांत येऊन केल्या कर्माचा अनुताप झाला; परंतु आतां काय ? गेली मूर्ति ती गेली ! बादशहास शोक झाला. दरबारांतील मंडळी कवीचा निस्पृहपणा नेहमीं वर्णीत. कांहीं काळानें कवीपुत्र नंदलाल मोठा झाला. बापाची योग्यता लोकांचे तोंडची त्यानें ऐकिली होती. शहरांत ज्याची लोक स्तुति करितात व ज्यावांचून दरबार शून्य दिसतें ह्मणून बोलतात, असा माझा बाप कोण ? त्याची गति झाली काय ? याची पुसतपास करण्याची इच्छा त्यास होऊन तो आपल्या मातोश्रीकडे गेला; आणि बापाचें इतिवृत्त विचारूं लागला. आईनें डोळ्यांस पाणी आणून कवीची योग्यता आणि बादशहाचा मूढपणा पुत्रास सांगितला. 'बीज तसा अंकूर' तें ऐकिल्याबरोबर "आतांच बादशहाकडे जातों" ह्मणून रागानें म्हणाला. आईनें सांगितलें "बाळा तूं बादशहाकडे जाऊं नको. त्यास बोललास तर तो तुलाही मारील."

नंदलाल न ऐकतां रात्र झाली होती तरी तसाच राजवाड्याकडे निघाला. वाड्यांत गेला तों त्यास समजलें कीं, बादशहा महालांत निजले आहेत. हा काय ? जो निघाला तो महालाकडे गेला. महालाचें द्वार लाविलेलें

होतें तें पाहून द्वाराची कडी हातीं धरून द्वार ठोठावूं लागला !! तें ऐकून बादशहा महालांतून " कोण आहे ? " अशी चौकशी करतो तों हा बोलिला:—

" अकब्बर बे अकब्बर तूं है अंधा नर ।
तूं होजा हमारी स्त्री अगर होजा हमारा वर ॥
एक हातमे घोडा बे एक हातमे खर ॥
कहेना हता सो कहे दिया करना होय सो कर ॥ "

हें बादशहानें ऐकून कविपुत्रास दरबारांत येण्याविषयीं सांगितलें; आणि दुसरें दिवशीं दरबारांत कविपुत्रास आणविण्याविषयीं प्रधानास सांगून पाठवून नंदलालाचा निरोप घेऊन महालांत गेला. दुसरे दिवशीं कविपुत्र दरबारांत गेल्यावर बादशहानें ताजीम देऊन, आसन दिलें; " कांहीं कविता करूं शिकला काय ?" म्हणून त्यास विचारलें. यास रात्रीचा राग होता. त्यानें ह्मटलें कीं:—

" कारळ को खेत कहा, कपटी को हेत कहा, वेश्या-
का विश्वास कहा, रांगके रुपय्याकू कहा जातुराये ॥
काटकी तलवार बांध कोण जंग जीत पावे ॥
पथरके मुरतको कबलो समजाईये ॥
गुलामनके गुलाम, तिलामनके तिलाम कविगंग—
ऐसे गुणीकु, क्यां गरिंदसे तुराईये ॥

याचा भावार्थ:—" कडुकारळ्याच्या शेतांत तसेंच लबाडाचे हेतूंत आणि कलावंतिणीच्या विश्वासांत जीव काय ? कातड्याच्या रुपयांत काय जीव ? लांकडाची तरवार बांधून कोणी जय पावला काय ? तशीच दगडाची मूर्ती समजावण्याचें ह्मटलें तर ती समजेल काय ? ( शेवटीं तर बादशहास एक शिवी आंसडून ह्मटलें कीं, ) कविगंग ऐसा गुणी हत्तीचे पायीं बांधावा ? " हा भावार्थ उरदु भाषा जाणत असलेल्यास कळून येण्याजोगा आहे. याप्रमाणें नंदलाल बोलला तरी अकबर न रागावतां उलटा संतोष पावून कवी पुत्रास मोठी देणगी दिली; आणि नित्य गंगकवीप्रमाणें दरबारांत येण्याविषयीं कवीपुत्रास विनविता झाला !

# अनंतफंदी.

---

अनुक्रमणिका. पृष्ठ.


१ दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना. .... .... १
२ अनंतफंदीचें अल्पचरित्र. .... .... ५
३ अनंतफंदीच्या गोष्टी. .... .... १६
४ माधवग्रंथ ओवीबद्ध. अध्याय सहा. .... १
५ सदरग्रंथ छंदोबद्ध. .... .... ३१
६ खर्ड्याच्या लढाईवर पोवाडा. ( १ ) सवाई माधवराव सवाई भाग्योदय ज्याचे पदरीं। .... .... ३७
७ रावबाजीवर. ( २ ) उट्या केशरी टिळा कस्तुरी कमालखानी हारगजरे। .... .... ४०
८ सदर. ( ३ ) वडिलाचे हातचे चाकर। ४१
९ नाना फडनविसावर पोवाडा. ( ४ ) सवाई माधवराव सवाई डंका बजाया। .... .... ४२
१० यशवंतराव होळकरावर पोवाडा. ( ५ ) सुभेदार यशवंत कऱ्हया सदा फत्ते० .... .... ४४
११ फत्तेसिंग गाइकवाडावर पोवाडा. ( ६ ) पुण्यांत बाजीराय बडोद्यांत फत्तेसिंग .... .... ४५
१२ महेश्वर शहरावर. ( ७ ) नर्मदा निकट तर घाट। ४७
१३ चिंतामणराव आपासाहेब पटवर्धन ( ८ ) वसविली सांगली। चिंतामणरायें० .... .... ४८

१४ बाळासाहेब मिरजकर पटवर्धन ( ९ ) प्रतापीबाळासाहेब पुण्यश्लोकमुखी. .... .... ९०
१५ ठाकुरजी. ( १ ) काळी गंडिका शिळा चकाकीत आंत शुभ्र प्रतिबिंब दिसे । .... .... ९१
१६ अक्रूर. ( २ ) अक्रुरा गोपी आक्रंदती हरीप्रती ठेवा ॥ मथुरेशीं नको नेऊं पहारे० .... .... ९२
१७ चंद्रावळ. ( ३ ) नटधीट अचाट राही नटला शारंग-पाणी ॥ पतिव्रता चंद्रावळ० .... .... ९४
१८ संध्येंतील चोवीस नामांवर. ( ४ ) अनंतभगवंताचीं नामें त्यांतूनि हीं उत्तम ॥ ९८
१९ उपदेशपर फटका. ( ५ ) लंडेगुंडेहिरसे तट्टु यांची संगत धरूं नको ॥ .... .... .... ९९
२० उपदेशपर फटका. ( ६ ) येऊंदे वाचे नाम देवाचें अष्टौ-प्रहर शिव हरहर हर ॥ .... .... ६१
२१ उपदेशपर फटका. ( ७ ) शोध करीरे मना हरि भजना-विण अवघें वृथा ॥ ६१
२२ उपदेशपर फटका ( ८ ) दे सोडुन तरी फंद वाऊगे–विषयाची तरी काय मजा ॥ ६२
२३ उपदेशपर फटका ( ९ ) नरदेहामधीं नरहो साधन ऐसें-करा । जेणें भवसागर० ६३
२४ उपदेशपर फटका ( १०) सत्कर्माचा तोटा । समय खोटारे खोटा । ( शेवटचे बाजीरावाची कार० ) .... . ६४
२५ दुष्काळ लावणी. ( ११ ) जिकडे तिकडे माजले टोळ । दुनियेचें वाटोळें झालें । .... .... ६५

२६ दुष्काळ लावणी. ( १२ ) जिकडे तिकडे टोळ माजले । ६६
२७ बाजिरावाची कारकीर्द. ( १३ ) दुनयेला तिळमात्र उपद्रव कांहीं नसावा । .... .... .... ६७
२८ लावणी. ( १४ ) जन्मा आला आला उफराटा ॥ ६८
२९ लावणी (१५) पंडितशहाणा आलामना मधीं उलटा सुलटा० ६९
३० लावणी. ( १६ ) एका राजाला कन्या झाली तिच्या उरावर तीन थान ॥ ७०
३१ लावणी ( १७ ) अपने मेहेल चुपके खडिथी कही गईन आईजी० .... .... .... ७१
३२ लावणी. ( १८ ) बारा बरसका पठा देखो अंगी नयनपर० ७२
३३ लावणी. ( १९ ) जोरु कसमका कज्या सुनो हाजा० ७३
३४ लावणी. ( २० ) हे मुर्खा खूण तर्का पर्का पुरुष आपला नसे ॥ .... .... .... ७४
३५ लावणी. ( २१ ) धन्य तुझें लावण्य प्रीतीचे बाण जैसे सणाणी । खरें सांगशील कधीं० .... .... ७५
दोमजला पैटणचें पातळ लफ्फा घे टाचेची खबर ॥
३६ लावणी. ( २२ ) बोल गड्या मशीं नरम नको होऊं गरम० चाल तुझ्या स्वरूपाची तारिफ काय । मारशील० ७६
३७ लावणी. ( २३ ) पति तर केवळ शुद्ध दांडगे० .... ७७
३८ लावणी ( २४ ) तुज नाहींरे माझी काळजी । .... ७८
३९ लावणी. ( २५ ) हार तुरे तुला धीरा मी गुंफितें । ७८
४० लावणी. ( २६ ) नको जाऊ बाहेरी गोऱ्या० सवाईफंदी ७९
४१ लावणी. ( २७ ) क्षीरसागरीचा हरी पाहूं । ,, ८१
४२ लावणी. ( २८ ) घर नको मला मी फार त्रासलें । ८१

# अनंतफंदीकृत श्रीमाधव ग्रंथ.

## अध्याय पहिला.

श्रीगणेशायनमः । शके सत्राशेंसत्रामाझारी । राक्षसनाम संवत्सरीं । श्रीमाधव गेले कैलासपुरीं । राज्यभार सोडोनियां ॥ १ ॥ गणपतीच्या रंगमहालावरी । उभे ठाकले क्षणभरी । ते समयीं तो मोंगलारी[2] । काय करितां जाहला ॥ २ ॥ धर्मराज्य होतां अखेर । पुढील जाणोनि सर्व भविष्योत्तर । तो श्री नारायण कुमर । अवतार आपुला संपवी ॥ ३ ॥ आश्विन शुद्ध द्वादशी । उडी टाकिली ते दिवशीं । श्रीमंत शुद्ध पौर्णिमेशीं । कैलासवासीं जाहले ॥ ४ ॥ एकाएकीं उडी आपुल्या सुखें । टाकिली त्या घाशीरामांतकें[3] । प्रयत्नें ही केलीं बहुतेकें । परंतु असाध्य जाहलीं ॥ ५ ॥ नानांशीं कळलें वर्तमान । श्रीमाधव पावले मरण । चिंताक्रांत बाळाजी जनार्दन[4] । गोड कांहीं न लागे ॥ ६ ॥ म्हणे हें काय उलटें जाहलें । आम्हास कां येथें ठेविलें । अर्थातचि स्वराज्य संपलें । चांगलें न केलें श्री-माधवें ॥ ७ ॥ एकचि जाला हलकल्लोळ । नाना पिटीत वक्षस्थळ । जीवजंतु समस्त पक्षीकुळ । शोकार्णवीं पडियेलें ॥ ८ ॥ प्रजा लोकें-पाळ[5] जितुके । शोकार्णवीं पडिलें तितुके । श्रीमाधवें केलें इतुकें । पुढें दुःख कितुकें कळेना ॥ ९ ॥ असो यापरी दुःख झालें जना ।

---

१ माधव नारायण उर्फ सवाई माधवराव पेशवे. २ मोंगलांचा शत्रु. ३ घाशीराम कोतवाल यास त्याच्या दुर्वर्तनासाठीं श्रीमंतांनीं हत्तींच्या पायीं देवून मारविलें. ४ बाळाजी जनार्दन, नाना फडनवीस. ५ राजे व सरदार.

रुद्रभूमीसे नेलें माधव नारायणा । सर्वे बरोबर मुख्य नाना । दहन करविलें रायाचें ॥ १० ॥ शहरचा करोनि बंदोबस्त । लोकपाळ घरा गेले समस्त । नाना आपुलें सदनीं स्वस्थ । चिंताक्रांत बैसले ॥ ११ ॥ म्हणें आतां कैसा करावा विचार । बोलावुनि शिंदे होळकर । अष्टउमराव ही समग्र । बोलाविलें नानानीं ॥ १२ ॥ आतां दत्तक घ्यावा म्हणे नाना । हें योग्य मानवलें समस्तजना । परंतु शिंद्याच्या नये मनां । नानाशीं बोलतां जाहला ॥ १३ ॥ नानाशीं म्हणें दवलतराव शूर । धनी असतां उभयतां वीर । एकापरीस एक धुरंधर । मग दत्तक तो कासया ॥ १४ ॥ अदुग्ध नसतां मुलाची माय । मग दुधांचें कारण काय । जरी नसते अप्पा बाजीरायं । मग दत्त घेणेंचि प्राप्त ॥ १५ ॥ पदरीं असतां लाखों धन । मग कासया व्याजी ऋण । टाकुनियां गंगाजीवन । कूपोदक तें कासया ॥ १६ ॥ सागवानीं मोडूनि घर । उभे करावे येरंड शेर । जिवंत असतां लग्नवर । मग कां करावा पाटाचा ॥ १७ ॥ टाकुनियां धुवासाकर । गुळ कां व्हावा प्रियकर । पोळी असतां भाकर कँदान्नें कां भक्षावी ॥ १८ ॥ हातें वस्त्र फाडोनि आपुलें । तुणवीत असावें देऊनि मोलें । क्षुधेनें पीडिलीं घरचीं मुलें । इतरां सांगे भोजना ॥ १९ ॥ मिळत असतां दुग्ध मांडे । मग कां खावे खोंडेकोंडे । बोलतां येत असतां तोंडें । मग मुक्यानें कां खुणवावें ॥ २० ॥ लोणकढें सांडोनि वायां । मग घासाचें तें कासया । घरचा दीप विझवुनियां । परगृहीं अग्नि कां मागावा ॥ २१ ॥ नवें वस्त्र असोनि नेटकें । दाटोनि कां नेसावें फाटकें । घरचीं असोनि भारत्तीं

---

१ ओंकारेश्वर एथील स्मशानभूमि. २ दवलतराव शिंदे. ३ तुकोजी होळकर. ४ बाहेरचें दूध. ५ राघोबादादाचे चिरंजीव चिमणाजी आप्पा. ६ राघोबादादाचे वडील चिरंजीव बाजीराव. ७ वाईट अन्नें.

कटकें । मग मर्कटकें² कां ठेवावी ॥ २२ ॥ घरीं सुवर्ण असतां विपुल । मग कासया ल्यावें पितळ । असोनि वाळ्याचा पंखा शितळ । मग रुमाल कां वारावा ॥ २३ ॥ टाकोनियां उत्तम चंदन । मग कां धुंडावें बाभूळवन । हिरा टाकोनियां दैदीप्यमान । मग कां गारा वेचाव्या ॥ २४ ॥ असतां अयसीं धोरणें । मग दंत तो कासया कोरणें । पळी असतां खोरणें । कासयाला पाहिजे ॥ २५ ॥ असो यापरी शिंद्यानें । केलें नानाशी बोलणें । या वंशावांचूनि म्हणे । इतरास मुजरा हे ना घडे ॥ २६ ॥ ऐसा ठेवतांचि दस्त । मग नाना जाहले चिंताग्रस्त । जबरी पाहोनि टेंकले हस्त । केवढें प्रस्थ³ नानाचें ॥ २७ ॥ ऐशी लावूनिया निकट । शिंद्याचें सामर्थ्य पाहूनिया बिकट । नाना निस्तेज होऊनि फिकट । चिंताज्वरें व्यापिला ॥ २८ ॥ मग मनीं विचार करी नाना । जर दत्तकाची करावी योजना । तर शिंदा आमुच्या शहाणपणा । चालों नेदी सर्वथा ॥२९ फौजही शिंद्याची महाबळ । चाळीस पलटणें पायदळ । राज्यांत होईल गोंधळ । शिंद्यापुढें बळ चालेना ॥ ३० ॥ तशांत जुन्नरास शिंद्याचीं पलटणें । दो चौ रोजा जाणार त्वरेनें । आणावया त्रिवर्गा⁴ कारणें । हें गुह्य समजलें नानाला ॥ ३१ ॥ कीं शिंदा घेऊन येणार तिघांतें । मग संकट पडेल मातें । मग नानानीं परशुराम⁵ भाऊतें ।

---

१ सेना. २ हा शब्द गूढार्थदर्शक दिसतो. 'मर्कटकें' म्हणजे साधारणपणें 'माकडें' असा अर्थ आहे. परंतु इंग्रज लोकांविषयीं त्यावेळेस आमच्या लोकांस फार माहिती नसल्यामुळें त्यांस सीतेच्या वरदानानें राज्य करणारीं 'मर्कटें' असें म्हणत असत. म्हणून हा तद्वाचकही घेतला असेल, यावरून त्या वेळीं इंग्रज लोकांविषयीं किती द्वेषभाव लोकांत होता हें स्पष्ट दिसतें. ३ महात्म ४ राघोबादादाचे दत्तक चिरंजीव अमृतराव आणि औरस बाजीराव व चिमणाजी आप्पा यांस जुनरास नानांनीं कोंडून ठेविलें होतें. ५ परशुराम भाऊ पटवर्धन.

मिरजकरातें बोलाविलें ॥ ३२ ॥ किं शिंद्याचीं पलटणें न पोंचतां । तुम्हीं जुन्नरास जावें आतां । घेऊनि यावें राघवसुतां । अमृतराय तेथेंचि ठेवावा ॥ ३३ ॥ नानाची आज्ञा घेऊन । दिवसां दोनप्रहरीं पटवर्धन । कारिते जाहले प्रयाण । माघ शुद्ध षष्ठीस सुमूहूर्तें ॥ ३४ ॥ त्वरित भाऊ गेले जुन्नरांते । रथसप्तमीस पोंचले तेथें । अष्टमीस भेटोनियां त्रिवर्गांतें । एकांतस्थानीं बैसले ॥ ३५ ॥ परशरामभाऊ जोडोनि कर । अमृतरायजीच्या समोर । विनंती करीत वारंवार । रावसाहेबाशीं आयका त ॥ ३६ ॥ कीं पुण्यास हीं दोन्हीं मुलें । नानांनीं सत्वर बोलाविलें । मग अमृतरायें उत्तर केलें । परशुराम भाऊशीं तेधवां ॥ ३७ ॥ जैसें मला ठेवितां येथें । या दोघांस घेऊनि जातां तेथें । फुट पाडूं नका उभयांतें । दोघे एकत्र ठेवावे ॥ ३८ ॥ मी जरी म्हणतो नका नेऊं । तरी तुम्ही बळें न्यावयास आलांत भाऊ । थोर वयातीत वृद्ध बहु । तुम्हाशीं मीं काय सांगावें ॥ ३९ ॥ नानाचे व तुमचे ओटींत मुलें । घालितों मी तुमच्या बोलें । आजपावेतों सांभाळिलें । आतां तुम्ही सांभाळा ॥ ४० ॥ मीं केले रंजाचे गज[1] । आतां सोडोनि जाताति मज । डोळां अश्रु आले सहज । साहेबांच्या तेधवां ॥ ४१ ॥ मग भाऊ ह्मणे मुलांचीं चिंता । तुह्मी न करावी सर्वथा । मी सेवक जिवंत असतां । मुलांस धक्का लागों नदे ॥ ४२ ॥ उभयतांस मी वाजतें वारें । लागों न देया राघवकुमरें । ऐशी ऐकुनि भाऊचीं मृदूत्तरें । अमृतरायजी संतोषले ॥ ४३ ॥ अमृतरायें उभयतां लागुनि । विडे दिधले तेचक्षणीं । आपुल्या हस्तें गुलाबपाणीं । अमृतरायें शिंपिलें ॥ ४४ ॥ विडे घालुनि मुखामाजीं । सजवोनि उभे केले वाजी[2] । जाते समयीं आपा व बाजी । निरोपास आले

---

१ लहानाचे मोटे. २ घोडे.

बंधूकडे ॥ ४५ ॥ मग दोघे बंधू धारिले पोटीं । आतां तुमच्या आमच्या भेंटी । तो घडवील तेव्हां जगजेठी । तेव्हांच खेटी होतील ॥ ४६ ॥ पायांवरी ठेविली डोयी । आपा बाजी उभयतांही । दादासाहेब आनंदीबाई । त्यांचे ठायीं तुम्ही आहां ॥ ४७ ॥ तूर्त काळीं आपुल्यावर । कोपला असे जगदीश्वर । परस्परें गहिंवर । एकमेकांस समजाविती ॥ ४८ ॥ तेरा वरुषें एकत्र । दादासाहेबाचे पुत्र । हे ब्रह्मा विष्णु त्रिनेत्र । एकेठायीं होतों तिघे ॥४९॥ आतां पडोंपाहे अंतर । मला येथें ठेवितां दूर । असो होईल जयजयकार । जा आशीर्वाद दिधला ॥ ५० ॥ अमृतराय अमृतोत्तरें । समजाविलीं राघवकुमरें । निघतां जैसें रघुविरें । दशरथातें त्यागिलें ॥ ५१ ॥गोकुळीं टाकुनि तातमात । मथुरेसी गेला सिंधुजामात । मागें येशोदा आक्रंदत । तैसेंच येथें जाहलें हो ॥ ५२ ॥ अथवा लहू घालुनि रथीं । घेऊनि गेलासे शत्रुघ्ननृपति । गडबडां लोळे सीतासती । वाल्मीकाचे आश्रमीं ॥ ५३ ॥ असो वाढेल कथा फार । उभयता जाहले अश्वस्वार । परशुराम भाऊ बरोबर । घेउनि आले दोघांतें ॥ ५४ ॥ खडकी पुलाजवळिकें । आणिलीं सुमुहूर्तें पाहुनि निकें । नानांशीं भाऊ सांगतां मुखें । हर्ष न माये अंतरीं ॥ ५५ ॥ ही कथा बाजीराव रघुनाथें ॥ लिहोनि दिधली आपुल्या हातें । त्या पत्रावरहुकूम टीका येथें । कवित्व केलें कवीनें ॥ ५६ ॥ याचा मागील कैसा दोरा । हें माहीत राघवकिशोरा । सारी सर्वत्रां लहान थोरां । आनंदफंदी ठाउका ॥ ५७ ॥ स्वस्ति श्रीमाधवकवन सुंदर । संमत बाजीरघुनाथपत्राधार । त्या पत्रावरोनि हा विस्तार । प्रथमोध्याय गोड हा ॥ ५८ ॥

---

१ भेट. २ बाप व आई. ३ कृष्णनाथ ४ योग ५ बाजीरावास.

## अध्याय दुसरा.

श्रीगणेशायनमः । गादी ज्यास प्राप्त असे । तो प्रभू विष्णु-
चाच अंश । श्रीमाधवराव सद्वंश । निःसंशय जाणपा ॥१॥ गोब्रा-
म्हण प्रतिपाळक । पुण्यश्लोकी वय बाळक । शत्रु वधूनि जयसी-
बाळक । धर्मे राज्य चालविलें ॥ २ ॥ गेलें सर्वत्रांचें जीवन ।
काय जाहलें जाणें कवण । कैसें दुग्धांत पडिलें लवणें । तो मन-
पवन गेला हो ॥ ३ ॥ असो प्रथमोध्यायीं कथा । बाजी व चिम-
णाजीरघुनाथा । भाऊंनीं आणुनि उभयतां । पुलाजवळी ठेविलें ॥४॥
नानांच्या व श्रीमंतांच्या । भेटी जाहल्या उभयतांच्या । पुला-
जवळीं खडकीच्या । एकमेकां भेटले ॥ ५ ॥ त्या पुलाजवळी ठेविलीं
मुलें । मग नाना पुण्यांत प्रवेशले । पुढें कवतुक काय केलें । नाना
फडणीसें तेधवां ॥ ६ ॥ म्हणे दोचौ रोजामाजीं । वाड्यांत आणावें
आपा व वाजी । पर्वतीस न्यावें दर्शनाकाजी । तेथें तऱ्हा दुसरी
योजावी ॥ ७ ॥ दर्शनास न्यावें पर्वतीकडे । बाजीरायास चालवावे
पुढें । आपासाहेब मागें सडे । येऊं द्यावे मुकाट्या ॥८॥ सिंहगडास
न्यावे रावबाजी । मागें वाड्यांत आणावे चिमणाजी । ही मसलत
उभयतामाजी । बाजी व आपातें समजली ॥ ९ ॥ मग दोघे
बंधु चिंताक्रांत । आतां कैसी करावी मसलत । शिंद्यास कळ-
वावा वृत्तांत । तो हें विघ्न वारील ॥ १० ॥ तेव्हां शिंदे पुण्यास
नवते । दवलतराव जामगांवीं होते । बातमी कळविली राघवसुतें ।
रायाजी पाटलाकडुनियां ॥ ११ ॥ कीं हाकाट केला बाळा-
जीजनार्दनानें । त्यास वाड्यांत आमचे उभयतांचें जाणें । न होय
ऐसी युक्ति करणें । शिंद्यास वकिलांनीं सुचविलें ॥ १२ ॥ कीं

---

१ मीठ. २ पानोडीकर.

रावबाजीस किल्ला प्राप्त । राज्याधिकारा चिमणाजीरघुनाथ । ऐसी समजतां नानांची मसलत । तप्त शिंदा जाहला ॥ १३ ॥ ऐसें समजतां तत्क्षणीं । दवलतरायें वकिलास बोलाऊनी । कीं नानाशीं सांगावें निक्षूनी । वाड्यांत मुलें न आणावीं ॥ १४ ॥ श्रीमंतांच्या व आमुच्या । भेटी होतील सर्वत्रांच्या । मग तुमच्या आमुच्या व धन्यांच्या । विचारें घडेल तैसें करूं ॥ १५ ॥ मध्यें एखादी गडबड कांहीं । केली तो कार्यास पडणार नाहीं । ऐसें सांगतां वकिलांही । हिरमोड झाला नानाचा ॥ १६ ॥ ह्मणे जी जी करावी मसलत । साध्य तितुकी असाध्यची होत । नदी उतरोनियां समस्त । कांठाजवळी कां बुडावें ॥ १७ ॥ चांगला ह्मणुनी घेतला पाच । शेवटीं तो कां निवडावा कांच । प्रवासाहूनि घरीं येतांच । वेशींत चोरें नागविलें ॥ १८ ॥ तैसें जाहलें मजलागुनी । राज्यास योजित होतों धनी । शिंद्याच्या कां न यावें मनीं । ह्मणूनि नाना दिलगीर ॥ १९ ॥ असो ते दिवशीं दोघांचें अरिष्ट । गजाननें टाळिलें स्पष्ट । दादाचें पुण्य उत्कृष्ट । म्हणूनि विघ्नें वितळलीं ॥ २० ॥ तशांत दो चौरोजामाझारी । शिंदे पुण्यास येणार झडकरी । नाना म्हणे शिंदा आल्यावरी । अवरू कैसी थांबेल ॥ २१ ॥ मग बाजीरघुनाथा लवलाह्या । नाना गेले भेटावया । मिठी घालोनियां पायां । श्रीमंताशीं बोलतसे ॥ २२ ॥ शिंद्याची मर्जी बुडवावें आम्हां । म्हणूनि प्रार्थना करितों तुम्हां । आतां स्वामीनीं करावी क्षमा । अपराधी जरी असलों मी ॥ २३ ॥ आपुला सेवक अपराधी । तो आपणचि वधावा आधीं । स्वामीचा अपराधी दुसरा वधी । ऐसें सहसा न करावें ॥ २४ ॥ ऐकूनि नानाची विज्ञापना । द्रव आला बाजीरघुनंदना । पूर्वींचे तुमचे उपकार नाना ।

तुम्हांस कैसे नाटवती ॥ २५ ॥ दादासाहेबास तुह्मी जाणा । पीडा केली बहुतेक नाना । सुरतेहुनि आणिलें गंगास्नाना । नंतर दादा वारले[1] ॥ २६ ॥ दादा गेले कैलासांतरीं । दहनाची रक्षा तैसीच गंगेवरी । तों कैद केलें लवकरी । तुह्मीं आह्मां तिघांतें ॥ २७ ॥ तोफखाना आणि वगैरे । लुटूनी घेतलें खटलें सारें । चौक्या जामदारखान्यावरे । नाना तुह्मीं बसविल्या ॥ २८ ॥ पुढें काळें करूनी पाहीं । शांत जाहली आनंदीबाई । माधवराव मरते समयीं । नाना तुह्मासी बोलिले ॥ २९ ॥ कीं बाजीराव भेटवा मातें । पण तुम्हीं धिक्कारिलें त्यातें । भेट न केली उभयतांतें । ऐसे तुमचे कृतोपकार ॥ ३० ॥ श्रीमाधव मेल्यावर । दत्तची ध्यावा हिया थोर । परंतु या वंशाशीं नमस्कार । करावयाचा नाहीं मला ॥ ३१ ॥ मग नानाशीं म्हणे राघवकुमर । चिरंजीव मी थोराचा थोर । शरण आल्यास वांचविणार । मम शत्रू तरी असेना कां ॥ ३२ ॥ म्हणे दादासाहेबाशीं याशीं । हाडवैर होतें अहोर्निशीं[2] । आतां तें दुःख न आणीनी मानसीं । आधीं नानास वांचवावें ॥ ३३ ॥ मग नानाशीं म्हणे बाजीराव । शिंद्याचें बाळगूं नका भय । मी असतां करणार काय । तुम्हास धक्का लागों न दे ॥ ३४ ॥ लोह जरी परिसावरी । आदळूनियां ताडिला जरी । तरी तो लोहाचें सुवर्णची करी । स्वभाव गुण न टाकी ॥ ३५ ॥ कुठारें[3] घातली मैलागिरीवरी । राय राय तुकडे केले जरी । तरी त्याचा सुवास दिगंतरीं । स्वभाव गुण न टाकी ॥ ३६ ॥ सज्जनास भेटला दुर्जन । तो कसेंही करी त्याचें छळण । परी दुर्जनाचेंच इच्छी कल्याण । स्वभावगुण न टाकी ॥ ३७ ॥ कागदीं बांधूनि कस्तुरीचे पुडे । फेंकूनि

---

१ वारली. २ रात्रंदिवस. ३ कुऱ्हाड.

दिधले एकीकडे । तरी त्यांचा सुवास लोपे ऐसें न घडे । स्वभाव-गुण न टाकी ॥ ३८ ॥ तैसे तुह्मीं मला साहेबदादा । मी तुमचें वाईट न करी कदां । मजपुढें काय करितो शिंदा । तीनदां किती सांगावें ॥ ३९ ॥ ऐसीं ऐकूनी प्रभूचें मृदुवचन । नानास वाटलें समाधान । म्हणे स्वामींनीं माझे अवगुण । उदाराब्धींत सांठविले ॥ ४० ॥ म्हणें म्यां बहुतेक दिधलीं दुःखें । त्या विठ्ठलसुंदरांतकें । परंतु त्या प्रभूनें सोसूनि तितुकें । दादासमान मज लेखिलें ॥४१॥ पुढें कथा याहून सुरस । सातान्यास जातील नाना फडणीस । धों-डिबा बाळोबा पागनिस । श्रीमंताशीं एकांत करतील ॥ ४२ ॥ हें कथानक राघवपुत्रें । आपुल्या स्वहस्तें लिहिलीं पत्रें । त्या पत्राव-रूनि हीं चारित्रें । कवीनें कविता केली असे ॥ ४३ ॥ यांत पद-रचें नाहीं यत्किंचित । बाजी रघुनाथ साक्षभूत । टीका केली प्राकृत १ लहान थोरांस समजावया ॥ ४४ ॥ पूर्वीं पांडवांच्या ख्याती । राजा रजवाड्यांच्या किताबती । दामाजीपंताच्या बखरा वाचिती । ह्यापुढें तशाच होतील ॥ ४५ ॥ ज्या ज्या कथा जाह-ल्या जितुक्या । त्या त्या कवीनें वर्णिल्या तितुक्या । पुढें आणीक होतलि तितुक्या । आनंदफंदी मुखें ऐकाव्या ॥ ४६ ॥ स्वस्ति श्रीमाधवकवन सुंदर । संमत बाजी रघुनाथपत्राधार । श्रोते पारि-सोत पंडित चतुर । द्वितीयोध्याय गोड हा ॥ ४६ ॥

---

## अध्याय तिसरा.

॥ श्रीगणेशायनमः ॥ गत झाले माधवनारायण । लोकांस केलें

---

१ हा हैदराबादच्या निजामाचा दिवाण. यांस राक्षसभुवन येथील लढा-ईंत राघोबादादाच्या लोकांनीं मारिलें.

शोकपरायण । टाकूनि गेले विश्ववारायण । दीप दक्षिणचा मालवला ॥ १ ॥ देवावांचूनि देउळ सुनें । कीं नासिकावांचूनि वदन । कीं पुत्रावांचूनि जैसें सदन । व्यर्थ काय तें जाळावें ॥ २ ॥ कीं गळ्यावांचूनि गायन । कीं बुबुळावांचूनि नयन । कीं शरीर जैसे प्राणावीण । पंडितावीण सभाजैशी ॥ ३ ॥ कीं शूरत्वावांचूनि शिपायगिरी । कीं हिऱ्यावांचूनी मुद्रिका करी । कीं पतिवांचूनि दिव्य नारी । कीं यजमानावांचूनि याचक ॥ ४ ॥ कीं चंद्रावांचूनि तारांगण । कीं वस्त्रावांचूनि शरीर नग्न । कीं वरावांचूनि जैसें लग्न । शोभूं नेदी सर्वथा ॥ ५ ॥ तैसें श्री माधवावांचूनि । भयानक भासे पृथ्वी सुनी । असो द्वितियाध्यायीं निरूपणीं । नानाशीं प्रभू बोलिले ॥६॥ मग नानाशीं म्हणे रावबाजी । पुण्यांत येणार दवलतरावजी । तुम्ही एक दो रोजांमाजी । सातान्याशीं जाईजे ॥ ७ ॥ येथें मी व भाऊ दोघेजण । बाबाफडक्यासह[1] वर्तमान । मानकरी तुकोजी जाण । मी आपल्या जवळी ठेवितों ॥ ८ ॥ शिंद्यास मी गोड गोड वचन । बोलूनी मोहितों त्याचें मन । श्रीमंतांची आज्ञा घेऊन । सातान्यास नाना निघाले ॥ ९ ॥ भाऊस म्हणे जनार्दनकुमर । शिंद्यांचा व आमुचा बहुत हाडवैर । द्वेषाद्वेष वाढला फार । म्हणुनी जातों सातान्या ॥ १० ॥ श्रीमंतापाशीं तुम्ही असा । मुलाची रखवाली करीतसा । मसलतीचा हावभाव कैसा । धन्यास नाहीं ठावका ॥ ११ ॥ तुम्ही सांभाळा शहाणपणानें । प्रस्तुत मी सातान्यास जातों म्हणे । मग प्रयाण केलें बाळाजी जनार्दनें । इकडे पुण्यास शिंदा पातला ॥ १२ ॥ खडकी पुला-

1 बाबाराव फडके, हरिपंत फडक्याचे चिरंजीव.

जवळी जाहल्या भेटी । श्रीमंतास धरूनिया मनगटी । वाड्यांत आणिले उठाउठी । अत्यादरे शिंद्यानें ॥ १३ ॥ वाड्यांत आणिले दोघेजण । हे नानास कळलें वर्तमान । म्हणे श्रीमंत शिंदे एकचि जाण । आधार कवणाचा मजलागी ॥ १४ ॥ आतां सातान्यास राज्याचीं वस्त्रें । घ्यावीं म्हणुनि निघाले त्वरें । सेना सिद्ध करूनिया राघवकुमरें । पुण्या बाहेरी निघाले ॥ १५ ॥ कुच करूनि गेले थेउरीं । तेथे शिंद्याचे कारभारी । कोण कोण पातले त्या अवसरी । बाळोबा[1] व धोंडिबा[2] ॥१६॥ बाळोबाचा व धोंडिबाचा । एकांत जाहला श्रीमंताचा । म्हणती आम्ही शत्रु स्वामीचा । धरूं कैद करूं नानातें । कीं नानाचें करावया वाईट । आज्ञा स्वामींनीं द्यावी स्पष्ट । मग बाजीराव म्हणे मी क्रियाभ्रष्ट । नानाविषयीं होणार नव्हे ॥१८॥ नाना म्हणजे मला दादा । मी त्याचें वाईट न करी कदां । ऐकूनिया दवलतराव शिंदा । मर्जी खट्टी जाहली ॥ १९ ॥ ह्मणे धन्याचेच नाहीं चित्तांत । आह्मीं मर्जीस्तव केला बेत । आतां मर्जी धन्याची ज्यांत । त्यांताचि मर्जी आमुची ॥ २० ॥ हें बाळोबाच्या न ये मना । ह्मणे धरूनियां घ्यावें नाना । काळे करून आपुल्या प्राणा । तो हा नाना घेईल ॥ २१ ॥ मग बाजीरायास बाळोबा ह्मणे । आह्मांस स्वामीचें बरें करणें । ह्मणुनि घेतलें असें धरणें । नाना नाशातें पावावया ॥ २२ ॥ आह्मी स्वामीच्या जिवासाठीं । नाना सर्प दुखविला पोटीं । आतां स्वामीच्या ऐशा गोष्टी । तस्मात् अह्मां बुडवितां ॥ २३ ॥ आधीं नानावरी मसलत । करणें हेंचि दुरापत । पदरीं दो कोटीची दवलत । फौजही असावी दोन लक्ष ॥ २४ ॥ इतुकी ज़्याला अनुकूळ जाहली । मग त्याणें हालवावी

---

१ बाळोबा तात्या शिंद्याचे सेनापती. २ धोंडिबा पोतनीस.

जिंभली । त्या नानाला आह्मी केली । बुडवावयाची मसलत ॥ २५
आतां स्वामी म्हणतात । कीं नाना धरावें हें अयुक्त । मग बाळो-
बाशीं श्रीमंत । बोलते जाहले तेधवां ॥ २६ ॥ म्यां साहेबदादा
म्हटलें नाना । तेपक्षीं धक्का त्याचिया प्राणा । लागों दिल्यास
माझिया वचना । माजी अंतर पडों पाहे ॥ २७ ॥ मग त्यास-
मयीं बाळोबानें । परशुराम भाऊस बोलावून । बाजीराव नाना दोघे-
जण । म्हणे कैद करावें धरूनियां ॥ २८ ॥ रावबाजीस नानाचा
अग्रह फार । तरीं राघोबाचा कनिष्ट कुमर । यशोदाबाईचे मांडीवर
चिमाजीआपा बसवावें ॥ २९ ॥ ही गोष्ट भाऊच्या आली मना ।
म्हणे धरा जा दोघेजण । मागील भाऊनीं आणा प्रमाण । अवघ्या
ठेविल्या गुंडाळोनी ॥ ३० ॥ असो भाऊनीं बाळोबाशीं । रुकार
दिधला धरावयासी । श्रीगणपतीस थेऊराशीं । क्रियाशपथा जा-
हल्या ॥ ३१ ॥ मग परशुराम भाऊनीं त्या समयांत । लिमये
बोलावूनी चिंतोपंत । सातान्यास मार्गस्थ केलें त्वरित । नानाकडे
तेधवां ॥ ३२ ॥ कीं राज्यास योग्य नाहींत रावबाजी । मज दैव-
वान भासे चिमाआपाजी । यशोदाबाईचे मांडीवर राजी । चिमा
आपा बसवावें ॥ ३३ ॥ मग नानासही आनंद जाहला । चिंतो-
पंतालागीं बोलिला । म्हणे सत्वर भटाभिक्षुकाला । विधान पत्रिका
पाठवा ॥ ३४ ॥ थोरथोर ब्राम्हणाच्या नियमानें । दत्ता मसुद्याचें
मत घेणें । आपटे महादेव दीक्षित बोलाविणे । भास्करभट कर्वे बोलवा ।
॥ ३५ ॥ लहान मोठे समस्त । ज्योतिष वैदिक पुराणिक । यज्ञे-
श्वर शास्त्री बोलवा त्वरित । चिमणाअपा स्थापावया ॥ ३६ ॥
आपला कारकून बक्षी चांगला । बाबाफडक्याकडे पाठवा त्याला ।
कीं भाऊ सांगतील तैसे चाला । कारकून गेला नानाचा ॥ ३७ ॥

इकडे भाऊनी मनसुबा करून । गोविंदरावें पिंगळे बोलाऊन । ब्राहि-
रोपंत मेहेंदळ्या लागून । आपुल्याजवळी बोलाविलें ॥ ३८ ॥ पर-
चुरे त्रिंबकरावही आले । आन्याबा मेहेंदळे पाचारिलें । राघोपंता-
दिक थत्ते भले । दुसरे राघोपंत ठोसर ॥ ३९ ॥ विसाजीपंत
वाडदेकर । हरी विष्णुलागीं लवकर । सहस्रबुद्धे बरचेवर । पंत
बाळाजी बोलाविले ॥ ४० ॥ सुभेदार जनोबालागीं आणा । हरिबा
धायगुडे सर्वत्रांना । सदाशिवपंत गोखल्यांना । शिवाय मुत्सदी
अवघेचला ॥ ४१ ॥ वेगळे करूनी दवलतरावजी । या कामाला
इतुके राजी । दत्ताचि ध्यावा चिमाजी अपाजी । मनांत ऐसें सर्व-
त्रांच्या ॥४२॥ तेवीं धोंडिबादादा सत्वर । सवें सदाशिव मल्हार ।
दोन सहस्र फौज बरोबर । तोफा चार द्वय पलटणें ॥ ४३ ॥
इतुका सरंजाम सांगातें । शिंदे कब्रडींचे मुकामीं होते । मग आले
थेउरातें । साहेबांकडे तेकाळीं ॥ ४४ ॥ बाजीराव होते स्नानसं-
ध्येंत । धोंडिबा भाऊचा एकांत । झाला कीं राहोटी सभोंवतीं
समस्त [1] बंदोबस्त करावा ॥ ४५ ॥ स्नानसंध्येमाजी राघव सुत ।
दोघे बंधु राहुटींत । भाऊ धोंडिबा फितुरी समस्त । चिमाआपातें
नेऊं म्हणे ॥ ४६ ॥ पुढे चिमणाजी रघुनाथातें । भाऊ धरूं जा-
तील त्यातें । मग रायाजी पाटील तेथे । बोध करितील भाऊला
॥ ४८ ॥ स्वस्तिश्रीमाधव कवन सुंदर । संमत बाजी रघुनाथ
पत्राधार । संतुष्ट होतील ऐकणार । तृतीयोध्याय गोड हा ॥४९॥

---

१ हे पेशव्यांचे हैदराबाद एथें वकील होते.

## अध्याय चवथा.

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीमाधव महापुण्यश्लोकी । ऐसा प्रभु नसे यालोकीं । तो प्रभूच गेला शिवलोकीं । म्हणोनी बैद्री जालासे ॥ १ ॥ ते जरी असते स्वस्तिक्षेम । मग वैद्याचें काय काम । कासया होती धामधूम । वायकरैणी बैदा हा ॥ २ ॥ असो कथा संपली तृतीयोध्यायीं । भाऊनीं क्रियाशपथा समस्तही । तितुक्या केल्या जलप्रवाहीं । शेवटीं पडले बदलोनियां ॥ ३ ॥ भाऊस मनीं दुःख न वाटलें । अपास एकांतीं घरीं गांठलें । मग त्यासमयीं रायाजीपाटलें । निषेध केला भाऊला ॥ ४ ॥ म्हणे तुम्हीं फक्त शिपाई तौरा । बाहेरील शत्रु सर करा । पण अपास नेणें दूर करा । घरपुरुष फोडों नये ॥ ५ ॥ बाजीराव धनी येथें तरंगले । आपास नेतां हें नव्हे चांगलें । फडके जरी येउनी तुह्मांस मिळाले । तरी लोक पळाले नाहींत हुजरातीचे ॥ ६ ॥ धन्यास टाकूनि तुम्हा-कडे । समस्त होतील हें नाघडे । परंतु तुमचे प्राण रोकडे । मज वाटे जातील ॥ ७ ॥ पाठीसी धनी समर्थ असतां । मग तुह्मास कासया चिंता । असें उत्तर भाउनीं ऐकतां । तप्त जाहला अंतरीं ॥ ८ ॥ भाऊ म्हणे आम्हा अवश्यमेव करणें । आधीं आपासाहे-बांस धरणें । रायाजीपाटील म्हणे हें बोलणें । अमार्गाचें दिसतें । ॥ ९ ॥ घात जरी धन्याचा जाहला । धक्का लागल्यास दोन्ही मुलां । मग जिवंत कोण राहूं देणार तुह्माला । मृत्यु मोलें घेतसां ॥ १० ॥ मग भाऊ म्हणे कशास ह्या दहशती । धनी जरी मारले गेलेती । तरी फार चांगलें म्हणती । हें रायाजीनें ऐकिले ॥ ११ ॥

---

१ घोटाळा. २ व्यर्थ. ३ शूर.

म्हणे तुम्हीं धन्याच्या बऱ्यावरी । पहिल्यापासूनि आहांत इतबारी । पूर्वक्रमें भाऊचीं त्या अवसरीं । रायाजी पाटलें सांगितलीं ॥ १२ ॥ गोपाळरावें[2] पटवर्धन । मोंगलास मिळाले जाऊन । तेव्हां त्याणीं जाळिलें पुणें । तुम्हीं त्याचे वंशाचे ॥ १३ ॥ वडिलांच्या चालीप्रमाणें । भाऊ तुम्हीं न चालणें । मी मागतों इतुकें देणें । आपास नेणें ठीक नाहीं ॥ १४ ॥ ऐकूनियां भाउनीं त्याच घडी । धोंडीवास सांगितलें तांतडी । रायाजीनें कपाळा घातली आढी । आपासाहेबांस नेऊं नका ॥ १५ ॥ मग धोंडिबा म्हणे युक्ती ऐका माझी । लष्कराबाहेरी काढावें रावबाजी । कळेल तसें मग चिमा आपाजी । स्वस्थपणें उचलावें ॥ १६ ॥ ऐशी करोनि तेव्हां मसलत । धोंडिबाचा भाऊ राहुटींत । बाजीरायाकडे आले बकध्यानस्त । म्हणतीं स्वामी आज्ञा मान्य आम्हा ॥ १७ ॥ मग भाऊ सांगे धोंडिबास । कांहीं अर्जी करोनि श्रीमंतास । कीं आम्हा नाहीं खर्चायास । दवलतरायें पाठविलें ॥ १८ ॥ मग बाजीराव म्हणे धोंडिबादादा । उतावळा होऊं न द्या शिंदा । दहा लक्ष रुपये तुम्हांस एकदां । आठा चौं रोजा मी देतों ॥ १९ ॥ धोंडिबा गेले आज्ञा घेऊन । इकडे परशुरामभाऊन । मंडळी फितुरी मेळवून । प्रभूस बोलता जाहला ॥ २० ॥ परशुरामभाऊ बोले उत्तर । कीं नानाकारितां रोज किरकीर । स्वामींनीं एकांतावर । गोष्ट आणोन ठेवावी ॥ २१ ॥ आज शिंद्याचे लष्करांत । आधीं स्वामींनीं जावें त्वरित । मग बोलतातीं श्रीमंत । रात्र होईल उदईक जाऊं ॥ २२ ॥ मग भाऊ म्हणे म्यां धोंडीबाशीं । वचन दिधलें निश्चयेशीं । आपण आजची

१ विश्वासुक. २. गोपाळराव गोविंद पटवर्धन, मीरजचे जहागिरदार, हे शिवकराम मामास पेशव्यांचे दिवाणगिरीचे कामांत मदतनीस होते.

या समयाशीं । तेथें गेलें पाहिजे ॥ २३ ॥ मग बाजीरायें उत्तम ह्मणोन । स्वारी सिद्ध करविली जाण । मग भाऊ ह्मणे मागुतीं न । सायंकाळीं आपा नेऊं नका ॥ २४ ॥ तुह्मींच शिंद्याकडे जावें । आपास येथेंच राहूं द्यावें । मी जवळ असतां स्वयें । मग भय तें कासयाचें ॥ २५ ॥ मग बाजीराव ह्मणे भाऊतें । अपा जरी न राहतील येथें । तरीं मी बळेंच राहवीन त्यांतें । तुह्मीं आहांत ह्मणोनियां ॥ २६ ॥ अमृतरायाचे जागीं तुह्मीं । ऐसे चित्तांत लेखितों आम्ही । मग चिमण्याचे भय तरी मी । कशास्तव बाळगूं ॥ २७ ॥ तेव्हां निळकंठपरभु येऊनी । श्रीमंतास सांगितले कानीं । कीं आज तुह्मीं येकल्यानीं । शिंद्याकडे जाऊं नये ॥ २८ ॥ जरी आतांच जाणें सत्वर । तरी आपास न्यावें बरोबर । परंतु नायके सत्वधीर । भाऊ येथें आहेत म्हणे ॥ २९ ॥ मग राये सिद्ध करूनी स्वारी । आले डेरीयाचे बाहेरी । चिमणाअपाते परोपरी । रावबाजी शिकवितसे ॥ ३० ॥ लष्करांत शिंद्याचे मी जातों । तुला भाऊपाशीं ठेवितों । माघारी इतुक्यांत येतों । त्वां असावें येथेंची ॥ ३१ ॥ नानाचें व शिंद्याचें हाडवैर । द्वेषाद्वेष वाढला फार । म्हणोनी भाऊ मला लवकर । शिंद्याकडे पाठवितो ॥ ३२ ॥ मग आपासाहेब बोलतसे । म्हणे हे तो मला विपरीत भासे । जुन्नरापासून मी आपुल्यापासे । रावसाहेबापाशीं फूट पाडून ॥ ३३ ॥ दादासाहेब मेल्यावरी । होते आनंदीबाईचे उदरीं । तीही वारली गंगातिरीं । तुमचे पदरांत घालोनियां ॥ ३४ ॥ दादासाहेब आनंदीबाई । तुम्ही मला त्यांचे ठायीं । टाकोनि जातां मज या समयीं । घात करीन प्राणाचा ॥ ३५ ॥ मिठी घालोनि गळ्यामाजी । मांडीवर आपुल्या रावबाजी । बैसवूनि चिमा आपाजी । श्रमी उभयतां होता-

ती ॥ ३६ ॥ उभयतांचे वाहती अश्रुपात । प्रळय जाहला अत्यद्भुत । तुज टाकोनजातों येथ । पण वचनीं गुंतलों भाऊच्या ॥ ३७ ॥ कीं अपास येथें ठेवोनियां । मी जाईन शिंद्यास भेटावया । ऐसें अपाशीं बोलूनियां । रावबाजी उठले ॥ ३८ ॥ जे दिवशीं भेटसी चिमण्या मला । ते दिवशीं आजची बंधु झाला । ऐसें बोलोनियां कुच केला । गेले शिंद्याच्या लष्करांत ॥ ३९ ॥ मग बाळोबा पागनिसास हर्ष झाला । म्हणे सुघटका लाधली भाऊला । तोफा तीन सुटल्या कळवावयाला । परशुरामभाऊला संज्ञा ॥ ४० ॥ ऐकोनि संज्ञा भाऊनीं । पैचंग बांधिला ह्मातारपणीं । फडक्याकडे आले धांवोनी । ह्मणे कार्यसिद्धी जाहली ॥ ४१ ॥ मग मंडळी जमा करोनि समस्त । आले खाशांच्या डेरियांत । मग बाबा फडके बोलतात । चिमाअपासी तेधवां ॥ ४१ ॥ शिंद्याचे लष्करांत गेले बाजी रघुनाथ । त्यांना विलंब जाहला बहुत । अपास घेऊनि या म्हणतात । तुम्हांस बोलविलें चलावें ॥ ४३ ॥ फडक्यास म्हणे चिमाअपाजी । जाते समयीं रावबाजी । मला सांगोन गेले कीं त्याकाजी । बाजीची आज्ञा मान्य मला ॥ ४४ ॥ बाळाजीपंत पटवर्धन । मी धाडीन तुम्हां बोलावून । इतरांच्या ह्मटल्या न येणें । मग आग्रह कां तुमचा ॥ ४५ ॥ बाळाजीपंतास घेऊनि या । मग मी तुह्मासवें चालतों जाऊनियां । परशुरामभाऊ ह्मणे विचार करूनियां । जबरदस्तीनें अप्पा न्यावे ॥ ४६ ॥ नंतर अपा गेले भोजनाला । मग मंडळी इतर लोक जमावयाला । क्षण एक अपानीं आराम केला । बिचोळ्यांत भाऊनीं गांठिलें ॥ ४७ ॥ आपास भाऊ जोडोनि हात । चला महाराज अर्जीकरीत । तेव्हां

१ कंबर बांधली. २ लहान डेरा.

आपा म्हणे बाळाजीपंत । पटवर्धना घेउनिया ॥ ४८ ॥ भाऊ म्हणे अबरु कशास्तव मुला । व्यर्थ कां गमाविशी नुमजे तुला । मर्यादा टाकोनी बोलता झाला । अमर्यादा बहु केली ॥ ४९ ॥ आपास गाहिंवर दाटे । काय करील अभाळ फाटे । डेऱ्यांत शिपाई आविंध मराठे । आपा सभोंती बैसले ॥ ५० ॥ तेव्हां आपा त्रिचोव्यांतरी । स्वस्थ बैसले तल्पकावरी । मग हरि विष्णूस भाऊ म्हणे ते अवसरीं । मुल चालावयासी अमानीतो ॥ ५१ ॥ तेव्हां आपास भाऊ कैसा भासला देख । जणो सीता हरावया आला दशमुख । असो आपानीं पाहुनी गलबला अधीक । गोविंदराव पिंगळा क्रिजबिजला ॥ ५२ ॥ चवथे अध्यायीं कथा सुरस । बोलावतील यशोदाबाईस । परशुराम भाऊ आपासाहेबास । चिमणाजी माधव करतील ॥ ५३ ॥ ही कथा राघवात्मजें । लिहिली आपुल्या स्वकरांबुजें । लेखाबरहुकुम काय जें । कवित्व केलें फंदीनें । स्वस्ति श्रीमाधवकवन सुंदर । संमत बाजीरघुनाथपत्राधार । पदरचें यांत नसे अणुमात्र । चतुर्थोध्याय गोड हा ॥ ५५ ॥ ॥ ४ ॥

---

## अध्याय ५ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥ हरिविष्णुलागीं सांगे भाऊ । आतां विलंब न करी बहु । आपा भोंवती चक्रव्युह । परशरामें रचीला असे ॥ १ ॥ हरिविष्णू मग ते अवसरीं । आपासाहेबास करीं धरी । तेव्हां क्रोध हृदयांतरीं । आला अद्भुत नावरे ॥ २ ॥ परंतु धैर्यापासूनी । अणुमात्र डगला नाहीं प्राणी । हरीविष्णुला मनस्वी त्यांनीं । नानाप्रकारें शिव्याचमका दिधल्या ॥ ३ ॥ तेव्हां हिय्या करोनी थोर । एक दोघांनीं धरले कर । अवघे मानकरी

झाले चोर । वडिलावडिली चाकर जे ॥ ४ ॥ आणिले बाहेर विचोळ्याचे । मग कांही उपाय न चले त्याचे । वारंवार स्मरण बाबाचें । कोठें गेलास ये तरी ॥ ५ ॥ अपाची कुमक न करी कोणी । घेउनी चालिले चोरावाणी । तेव्हां अपा गहिंवरोनी । गडबडा लोळे धरणीवरी ॥ ६ ॥ बाबा कोठें आहेस तरी । मला दुःखाचे डोंगरीं । टाकोनी कैसा गेला दुरी । कोण मजला तुज वेगळें ॥ ७ ॥ दादासाहेब जिवंत असते । ते तरी मजला सोडविते । किमपी हातीं न देते । आनंदीबाई तीही मेली ॥ ८ ॥ असते जरी नानाभाऊ । ते तरी येतसे सोडऊ । चुलते जनोबा बाबा भाऊ । तेही गेले स्वर्गातें ॥ ९ ॥ विश्वासराव माधवराव । त्यांचेही फक्त राहिलें नांव । सोडविणार गेले नारायणराव । धाकटे माधवराव तेही गेले ॥ १० ॥ अमृतरावही राहिले दूर । आतां मी जालों निराधार । शोकास आपल्या नाहीं पार । बाबावांचोनी किलवाणी ॥ ११ ॥ मी उघडाबोडका शरिरावर । धोतर व एक अंगवस्त्र । मायबापामागें अंगिकार । बाबा तुम्ही केला असे ॥ १२ ॥ जळा वांचोनी जैसा मत्स्य । किं धेनुवांचूनी जैसें वत्स । तैसें अपा जहाले बिभित्स । दाही दिशा न्याहाळी ॥ १३ ॥ आनंदीबाईनें शंकर । पूजिला भक्तिपुरःसर । त्याचें फळ हें घोरांद्र । मज भोंवतें जहालें ॥ १४ ॥ सभोंवता शत्रूचा संभारू । त्यामाजी अपा लेंकरूं । गडबडा लोळे न धरवे धिरू । बाबा मज कां टाकिलें ॥ १५ ॥ आतां बाजीराव बाबाचें । पुनः दर्शन होणें कैचें । तीळ तुटले त्याचे आमचे । ऐसें मला वाटतें ॥ १६ ॥ पालखींत घालून अपा नेले । वर्तमान शिंद्याचे लष्करांत गेलें । कीं भाऊ इमानी कामा आले । श्रीमंतातें समजलें

॥ १७ ॥ मग दवलतरायाशीं रावबाजीनें । वर्तमान केलें निवेदन । कीं जिमणा अपा घेऊन । गेलेत कोठें नकळे मला ॥ १८ ॥ भाऊ जहाले कियाभ्रष्ट । हें शिंद्यास ठावकें नव्हतें स्पष्ट । ऐकूनी मर्जी जहाली रुष्ट । श्रीमंतांशीं बोलतसे ॥ १९ ॥ दत्तपुत्र नाना घेणार । आम्ही त्याचा मोडूनि कार । आपुले मर्जीस्तव त्याशीं वैर । केवढा आम्हीं संपादिला ॥ २० ॥ तेव्हां निमकहरामी आम्ही । भाऊ निमकहलाल केले तुह्मी । वचनाचे साचे पराक्रमी । त्यांनींच केलीं हीं कर्में ॥ २१ ॥ तेव्हां शिंद्याशीं श्रीमंत । पुनः मागुती बोलतात । चिमण्याचेंच दुःख अत्यंत । त्याही वरी तुझी शस्त्रें ॥ २२ ॥ तुजवर आमचा विश्वास । नाहीं ऐसें म्हणतोस ॥ भाऊवर फार विशेष । हें काय बोलणें ये वेळीं ॥ २३ ॥ पानपतावर भाऊ मेले । पूर्वज तुमचे त्यासवें गेले । जर कसेंही स्वामींनीं वाईट केले । तरी मरावें धन्यासंगे ॥ २४ ॥ हा धर्म तुझा परंपरा । चालत असला महावीरा । तर तुम्हीही कबूल करा । मागील काय आठवितोसी ॥ २५ ॥ ऊठ करूं शत्रूचा पाठलागे । अपास परतोन आणूं मागें । मग शिंदा म्हणे उठा वेगें । चिमणाअपाचा शोध करूं ॥ २६ ॥ शिंदे श्रीमंत दोघे वीर । पुढें होणार अश्वस्वार । इतक्यांत बाळोबा सत्वर । येऊन सांगे शिंद्याला ॥ २७ ॥ म्हणे ही वेळ जावयाची नव्हे । रात्रौ मनसुबे राहूं द्यावे । उजेडल्या उपरांतीक शोधावें । अपासाहेब असतील तेथें ॥ २८ ॥ **पंचचामर वृत्त** । बाळोबानीं जावयाचा कार मोडिला जेव्हां । शिंदे बाजीराव जात होते राहिले तेव्हां । बाळोबास अंतरीं मनांत जाली बाहाली । फार चांगली बहुत कार्य सिद्धी जाहली ॥ २९ ॥ शिंदे

---

१ करार. २ सदाशिवराव भाऊ. ३ जनकोजी शिंदे.

४८५ ४८५

आणि श्रीमंत खलबता बैसले असे । सेवकाहातूनी दोघे बातमी आणितसे । बाळोबानें खेळ काय मांडलासे बाहेरी । पलटणें फौज आवळूनिया उभी करी ॥ ३० ॥ बाहेर येतां करावे ठार दोघेही जण । शिंदे स्वामीलागी सांगतात हात जोडून । स्वामी आज लष्करांत माझियाच राहावें । स्वामीचा मी भृत्य चाकरी घडेल पहावें ॥ ३१ ॥ सेवकांनीं आणिले वळुनी स्वामी मागुता । असो चिमाअपास भाऊ घेऊनी पळालेती । कुच करोन मांजरीस शिंदे पेशवे आले । पुढें अपाचें वर्तमान पाहिजेच ऐकिलें ॥ ३२ ॥ बाहिरोपंत सातान्यास भाऊ पाठवी जेव्हां । बळेंच राजापासूनी वस्त्रें आणिलीं तेव्हां । तेव्हां यशोदाबाई लागीं भाऊनीं बोलाविलें । तों बाईनीं निरोप धाडिला नव्हे हें चांगलें ॥ ३३ ॥ तुम्ही प्रवुद्ध थोर काय सांगावें तुम्हास रे । कसे अपास दत्त देतसां ते माझे सासरे । सुन त्यांचीमी मला ते दत्त देतसा कसें । अयोग्य कर्म काय भाऊ वर्ततां तुम्ही असे ॥ ३४ ॥ पुनः यशोदाबाईला निरोप भाऊ पाठवी । सुनसासऱ्याची कलपना मनांत ना ठेवी । तुम्ही स्वसंतोषें आलांत फार चांगलें म्हणे । न आलियास मग आम्ही आणूं तुम्हां बुरेपणें ॥ ३५ ॥ बाई भ्याली अंतरीं म्हणे हे अबरु घेतील । करुनीयां जुलूम दत्त चिमाअपास देतील । अबरु टिके कशी एतदर्थीं बाई हो भारी । चिमाअपाविधानसमयीं खेद अंतरी करी ॥ ३६ ॥ दत्तपुत्र मी न होय बैसले गडोनिया । मर्जी जाली तसे राहिले अपा अडोनियां । फार फार आग्रह केला परंतु नायके । तरी करील काय तो मिळाले सर्व गायके ॥ ३७ ॥ तशांत राघोपंत ठासरास भाऊ सांगतो । धरा बळें मुलास त्यास भाऊ-

१ सेवक.

काय सांगतो । करोनि दत्तविधान वेळेंच पावतीस दिधले । वस्त्रें पेशवाईचीं दिलीं न मर्म शोधिलें ॥ ३८ ॥ फडक्यास भाऊ बोलतात सर्व जालें चांगलें । आतां अमृतरायजी धरावें पुरे चांगलें । त्याजलाही अर्गळा करावी पाठिलागले । व्यर्थ भाऊ भागले न सत्क्रियेस लागले ॥ ३९ ॥ ओव्या ॥ मग भाउशीं फडके बोलतात स्वयें । शिवनेरीस ठेवावें अमृतराय । कैद करोनी किल्लयास न्यावें । मग आपण निर्भय झालों ॥ ४० ॥ बापुजीपंत जगन्नाथपंत । बापट बळवंतराव काशीसांगात । समागमें फौज आणि हुजरात । जरीपटका सोडोनियां ॥ ४१ ॥ कैद केले रावबाजी । दत्त बसविले चिमाअपाजी । आतां धरूं अमृतरायजी । मर्जी ऐशी सर्वांची ॥ ४२ ॥ भाऊनीं व परचुऱ्यांनीं । पुण्यास अपा नेल्यावर त्यांनीं । थेउरचे मुकामीं वस्तवानी । जप्त केली रावबाजीची ॥ ४३ ॥ इकडे जुनरास फौजा येउनी । रावसाहेबास वेढिलें त्यानीं । दरवाजे लावून रावसाहेबांनीं । मग यांनीं शिड्या लावल्या ॥ ४४ ॥ ज्यानीं ज्यानीं अपा ऐकले । तीतुकेही मागें पुढें गेले । धोंडीबा बाळोबा नानाही गेले । तीच अवस्था भाऊची ॥ ४५ ॥ आपासाहेब केले होते दत्त । त्यास देउनियां प्रायश्चित । पुनः दत्ताचे केले अदत्त । चिमणाजी रघुनाथ पुनः केले ॥ ४६ ॥ मग शिंद्यांनीं आणोनी बाजीराव । राज्यासनीं केला गौरव । पुढें माजले जैसे कौरव । कोणास कोणी न मोजिती ॥ ४७ ॥ एकमेकांनीं अपअपसांत । एकमेकांचे योजिले घात । मसलत एकही न ठेविली पोक्त । म्हणुनि बैदा जाहला ॥ ४८ ॥ शिंद्यानें बांधला मल्हराव होळकर । बाजीरायें वधिला त्याचा सहोदर । कापट्य करूनी शास्त्री गंगाधर । देव

द्वारीं मारला ॥ ४९ ॥ आपणही जहाले राज्यभ्रष्ट । एकही न केला शेवट । धरिली उत्तरपंथेची वाट । ब्रह्मावर्तीं बैसले ॥ ५० ॥ प्रथमोध्यायीं कथा जाणा । शिंद्यांनीं मृदु केले नाना । मोडूनिया दत्ताची या कसणा । सेवकपणा राखिला ॥ ५१ ॥ भाऊ धोंडिबा बाळोबानें । श्रीमंताशीं एकांत करून । कीं धरावे बाळाजी जनार्दन । द्वितीयोध्यायीं हेचि कथा ॥ ५२ ॥ रायाजी पाटील येऊनी । भाऊस फजीत केलें त्यांनीं । कीं नेले आपालागुनी । तीच कथा तृतीयोध्यायीं ॥ ५३ ॥ चवथे अध्यायीं भाऊच्या मता । चिमणा बैसविले दत्ता । त्रिवर्गासही कैसे बहुत । भाऊ बाळोबा देतसे ॥ ५४ ॥ पंचमोध्यायीं जाणपां । जबरदस्तीनें चिमाणाआपा । यशोदाबाईच्या ओटींत नृपा । अपाभूपातें दीधलें ॥ ५५ ॥ ही कथा बाजीरायें । अपुले हस्तें लिहिली स्वयें । त्या प्रभूच्या लेखाअन्वयें । कविता केली कवीनें ॥ ५६ ॥ श्रीमाधवें टाकिली उडी । तेव्हां पासून मोडली घडी । त्या घडीची करूनीयां पुडी । आनंदफंदी निवेदी ॥ ५७ ॥ स्वस्तीश्रीमाधवकवन सुंदर । संमत बाजी रघुनाथपत्राधार । कवीचे ठिकाण संगमनेर । पंचमोध्याय गोड हा ॥ ५८ ॥

---

## अध्याय ६ वा.

श्रीगणेशायनमः ॥ जे जैशीं कर्मे आचरती । तदनुसार फळें भोगिती । निमित्तमात्र भूपती । त्याजकडे दोष नाहीं ॥ १ ॥ असो पंचमोध्यायीं संपली कथा । प्रायश्चित्त चिमणाजी रघुनाथा । देऊनियां पुन्हा मागुता । बाजीराव जे स्थापिले ॥ २ ॥ आतां येथूनियां बंडप्रकरण । श्रोते परिसा सावधान । कैसें पृथ्वीचें लुटणें ।

काय सांगतो । करोनि दत्तविधान बळेंच पावतीस दिधले ।
वस्त्रें पेशवाईचीं दिलीं न मर्म शोधिलें ॥ ३८ ॥ फडक्यास
भाऊ बोलतात सर्व जालें चांगलें । आतां अमृतरायजी धरावें
पुरे चांगलें । त्याजलाही अर्गळा करावी पाठिलागले । व्यर्थ
भाऊ भागले न सत्क्रियेस लागले ॥ ३९ ॥ ओव्या ॥ मग भा-
उशीं फडके बोलतात स्वयें । शिवनेरीस ठेवावें अमृतराय । कैद
करोनी किल्लयास न्यावें । मग आपण निर्भय झालों ॥ ४० ॥
बापुजीपंत जगन्नाथपंत । बापट बळवंतराव काशीसांगात । समागमे
फौज आणि हुजरात । जरीपटका सोडोनियां ॥ ४१ ॥ कैद केले
रावबाजी । दत्त बसविले चिमाअपाजी । आतां धरूं अमृतरायजी ।
मर्जी ऐशी सर्वांची ॥ ४२ ॥ भाऊनीं व परचुऱ्यांनीं । पुण्यास
अपा नेल्यावर त्यांनीं । थेउरचे मुकामीं वस्तवानी । जप्त केली
रावबाजीची ॥ ४३ ॥ इकडे जुनरास फौजा येउनी । रावसाहे-
बास वेढिलें त्यानीं । दरवाजे लावून रावसाहेबांनीं । मग यांनीं
शिड्या लावल्या ॥ ४४ ॥ ज्यानीं ज्यानीं अपा ऐकले । तीतु-
केही मागें पुढें गेले । धोंडीबा बाळोबा नानाही गेले । तीच
अवस्था भाऊची ॥ ४५ ॥ आपासाहेब केले होते दत्त । त्यास
देउनियां प्रायश्चित । पुनः दत्ताचे केले अदत्त । चिमणाजी रघु-
नाथ पुनः केले ॥ ४६ ॥ मग शिंद्यांनीं आणोनी बाजीराव ।
राज्यासनीं केला गौरव । पुढें माजले जैसे कौरव । कोणास कोणी
न मोजिती ॥ ४७ ॥ एकमेकांनीं अपअपसांत । एकमेकांचे यो-
जिले घात । मसलत एकही न ठेविली पोक्त । म्हणुनि बेदा
जाहला ॥ ४८ ॥ शिंद्यानें बांधला मल्हराव होळकर । बाजीरायें
वधिला त्याचा सहोदर । कापट्य करूनी शास्त्री गंगाधर । देव

द्वारीं मारला ॥ ४९ ॥ आपणही जहाले राज्यभ्रष्ट । एकही न केला शेवट । धरिली उत्तरपंथेची वाट । ब्रह्मावर्ती बैसले ॥ ५० ॥ प्रथमोध्यायीं कथा जाणा । शिंद्यांनीं मृदु केले नाना । मोडूनिया दत्ताची या कसणा । सवकपणा राखिला ॥ ५१ ॥ भाऊ धोंडिबा बाळोबानें । श्रीमंताशीं एकांत करून । कीं धरावे बाळाजी जनार्दन । द्वितीयोध्यायीं हेचि कथा ॥ ५२ ॥ रायाजी पाटील येऊनी । भाऊस फजीत केलें त्यांनीं । कीं नेले आपालागुनी । तीच कथा तृतीयोध्यायीं ॥ ५३ ॥ चवथे अध्यायीं भाऊच्या मता । चिमणा बैसविले दत्ता । त्रिवर्गासही कैसे बहुत । भाऊ बाळोबा देतसे ॥ ५४ ॥ पंचमोध्यायीं जाणपां । जबरदस्तीनें चिमाणाआपा । यशोदाबाईच्या ओटींत नृपा । अपाभूपातें दीधलें ॥ ५५ ॥ ही कथा बाजीरायें । अपुले हस्तें लिहिली स्वयें । त्या प्रभूच्या लेखा-अन्वयें । कविता केली कवीनें ॥ ५६ ॥ श्रीमाधवें टाकिली उडी । तेव्हां पासून मोडली घडी । त्या घडीची करूनीयां पुडी । आनंदफंदी निवेदी ॥ ५७ ॥ स्वस्तीश्रीमाधवकवन सुंदर । संमत बाजी रघुनाथपत्राधार । कवीचे ठिकाण संगमनेर । पंचमोध्याय गोड हा ॥ ५८ ॥

---

## अध्याय ६ वा.

श्रीगणेशायनमः ॥ जे जैशीं कर्में आचरती । तदनुसार फळें भोगिती । निमित्तमात्र भूपती । त्याजकडे दोष नाहीं ॥ १ ॥ असो पंचमोध्यायीं संपली कथा । प्रायश्चित्त चिमणाजी रघुनाथा । देऊनियां पुन्हा मागुता । बाजीराव जे स्थापिले ॥ २ ॥ आतां येथूनियां बंडप्रकरण । श्रोते परिसा सावधान । कैसें पृथ्वीचें लुटणं ।

जाहलें ऐका चतुरहो ॥ ३ ॥ पूर्वी भाकीत होतें जाणें जोशी । कीं पुढें येईल रुद्रवंशी । काळ पडेल दक्षिण देशीं । वर्णसंकर होईल ॥ ४ ॥ राज्यांत माजेल धुमाळी । घरोघर आपल्या होतील बळी । बळी तोच कान पिळी । महा अनर्थ होईल ॥ ५ ॥ पाळणें लागतील डोंगरीं । मनुष्यें पळतील गिरीकंदरीं । विसा पंचाविसा कोसावरी । वस्तीलागीं एक ग्राम ॥ ६ ॥ सहस्र घरांची वस्ती जेथें । दहा पांच घरें राहतील तेथें । खून पडावे मार्गपंथें । तें तें आलें अनुभवा ॥ ७ ॥ डोंगरावरी लागेल दिवा । गांवांत भुंकतील भालुवा । हें आवडेल महादेवा । रुद्रवंशीं लागतांची ॥ ८ ॥ बंड मनुष्यें आणील वाजा । मार देतील टाकून बाजा । दक्षिण देशीं मरेल राजा । क्षेत्रभंग होईल ॥ ९ ॥ याला जो असत्य म्हणेल कोणी । मग मी करीन त्याची पुरवणी । तरीच हा जोशी चिंतामणी । हें वाक्य माझें सत्य जाणा ॥ १० ॥ हीं जोशाचीं ढंग मतं । असत्य भासत होतीं आपणातें । म्हणे हे भिकारी मागते । कुणबटातें ज्ञान कैंचें ॥ ११ ॥ रांजण साठवेल गाडग्यांत । धनगाडे राहतील रांगड्यांत । जेवणार जे कां वाडग्यांत । ग्रास त्यां ताटवाट्या ॥ १२ ॥ जें जें कथिलें वाल्मीकें । तें सत्य केलें रघुनायकें । तैशीं ह्या जोशाचीं वाक्यें । ह्या बंडलोकीं सत्य केलीं ॥ १३ ॥ असो पुढें बंडाला आरंभ झाला । जोही ज्याच्या गृहांत गेला । घरधनीच होउनी उभा ठेला । यजमान जैसा तस्कर ॥ १४ ॥ ज्यास जी वस्तु आवडावी । तितकी त्याणें सावडावी । मना जे नावडावी । ते ठेवावी घरधन्यास ॥ १५ ॥ दह्यातुपाचीं चोरुळीं । भक्षुनी भरावीं थारोळीं । घरधनी मारितां

---

१ खाटा. ? २ भय. ३ जंगली लोकांत. ४ घ्यावी. ५ भांडीं. ६ डबकी.

आरोळी । आधीं त्याजला चोपावें ॥ १६ ॥ मग त्याची गृहस्वामिणी । करीत भोंवती शंखध्वनी । तों तिची बांधोनियां वेणी । मार देती फरमासी ॥ १७ ॥ लावूनियां दरवाजा । यथासांग चालिती पूजा । तेथें ईश्वराखेरीज दूजा । कोण त्याला वांचवी । ॥ १८ ॥ हरतऱ्हेचे मार द्यावे । तावूनियां तप्त तवे । मोठमोठाले नरवरी[1] नवे । उभे करावे त्यावरी ॥ १९ ॥ एक मस्तकीं एक तळीं । चाबकानीं झळाळी । उष्ण वरती तळतळी । हस्त सकळी मारावया ॥ २० ॥ कर्ण घ्राणीं दारु भरिती । वरूनि वत्ती लाविती । तिळमात्र दया नुपजे चित्तीं । शिवाय कुरघोड्या वेगळ्या ॥ २१ ॥ शें दोनशांस करावे ओणवे । उडून त्यांवरी बैसावें । राख मिर्ची घालूनी द्यावे । तोबरे मुखीं घोड्यांच्या ॥ २२ ॥ अशक्ताची करावी घोडी । वर बसवावा जडगडी । स्वस्थपणें ओढीत गुरगुडी । तोंड झोडी चाबकानें ॥ २३ ॥ चराठांची सरासरी । त्याची करावी गळसरी । मग तो डोळे वटारी । प्राण जाऊं पाहतो ॥ २४ ॥ खटमार ह्मणजे जगविख्यात । वरकड मार त्याचे आश्रित । हीं टूम ईश्वरें अनुश्रुत । कोठुनि काढिली कळेना ॥ २५ ॥ इंद्रियातें बांधोनि दोरीं । उचलूनी त्याचे तराजू करीं । एक येतां जातां मारी । कोटवरी सोसाव्या यातना ॥ २६ ॥ कांकडे घेऊनियां आपुले हातीं । समग्र दाढी मिशा जाळिती । एक मोचों[2] सुद्धां हाणिती । मुखावरी ब्राह्मणाच्या ॥ २७ ॥ मुखावाटे वाहे रुधिर । तों पुन्हा मारिती वारंवार । आरडताती जैसे ढोर । हे उपचार शरीराचे ॥ २८ ॥ पायांस बांधावीं चऱ्हाटें । झाडाशीं टांगिती उफराटे । मग ते ब्राह्मण अथवा मराठे । कोण तेथें निवडितो ॥ २९ ॥

---

१ नरवरगांवचे तवे उत्कृष्टपणामुळें प्रख्यात आहेत. २ जोडा.

फकीर मानभाव सन्यासी । अतीत गोसावी तापसी । त्यांस हे पापी अभक्तरासी । मार मनस्वी देताती ॥ ३० ॥ अग्निहोत्रि यांच्या यज्ञकुंडीं । कोपोनि रांधिती अजामुंडी[1] । होमशाळेमाजी धुंडी । घरधनी कोठें धराहो ॥ ३१ ॥ कोण कोणाचा प्राण वधी । याची दाद ना फिर्यादी । असंख्यात अमर्यादी । रीत स्वल्पी नाटळे ॥ ३२ ॥ घरांत बसतां उपद्रव वरीं । बाहेर निघतां भलता धरी । जेऊं न घाली मातोश्री । पिता भिक्षा न मागूंदे ॥ ३३ ॥ पीक पाणी यावें रंगा । म्हणजे चारावें तुरंगा । रयत गेली भवगंगा । केवढा दंगा ओढवला ॥ ३४ ॥ घरदार लुटावें सर्वपरी । घरधनीच धरावा बिगारी । बायका मुलें लहान थोरी । बिगार अवघ्यांनीं पोंचवावी ॥ ३५ ॥ घरें लुटुनियां बिगारी न्यावें । मुकामीं झाडाशीं बांधावें । आणिकही त्याजला पुसावें । दौलत कोठें दाखवा ॥ ३६ ॥ मग ते बोलती दीनवदन । दौलत आणिली आपण । आतां आमुचे प्राण । मस्तकें ठेवितीं पायांवरी ॥ ३७ ॥ तईच मस्तकें धरूनी त्यांनीं । आपटीत असावें मेदिनी । हायहाय म्हणोनी । प्राण जाती कैकांचे ॥ ३८ ॥ तत्रापी त्याला न सोडिती । राहिले त्यांसही तोडिती । माकडहाडें मोडिती । कुठार जैशी काष्ठावरी ॥ ३९ ॥ ओलें जैसें पिरगळावें । तैसें मनुष्य धरूनी मुरगळावें । गळ्यांत बांधोनियां दावें । ओढावें जैसें मेंढरूं ॥ ४० ॥ एक नासिक पिरगाळिती । एक उगेंच गालोरे घेती । एक उडूनियां बैसती । घोड्यापरी माणसावरी ॥ ४१ ॥ एक ह्मणती आमुचा घोडा । मोडें याचिया माकडहाडां । लुटोनी आणिला ज्याचा वाडा । त्याच्या अपेष्टा ह्या केल्या ॥ ४२ ॥ ऐसा बंडाचा उपद्रव । वाघ्यांस पा-

---

[1] बोकडाचें मुंडकें.

तलें वैभव । मग ते तृणप्राय सर्व । गर्वमदें व्यापिलेती ॥ ४३ ॥ कोणी कोणातें न ओळखती । ज्यास द्यावें त्यास न देती । न द्यावें त्याचे दारीं हत्ती । बळेंच नेवोनि बांधावा ॥ ४४ ॥ समय पातला उफराटा । ज्याचे सदनीं सुवर्णसाटा । त्याला अदपाव पिठाचा तोटा । दोन प्रहराची भ्रांती त्याला ॥ ४५ ॥ लुटीचीं वस्त्रें अपरिमित । महारपोरग्यांस झालीं प्राप्त । परंतु पांघरावयाची पूत । काय त्याला ठाऊकी ॥ ४६ ॥ मस्तकीं गुंडाळिती पितांबर । लुगडेंच पांघरती वेडे पीर । बायकांचे अलंकार । गळ्यांत घालावे आपुल्या ॥ ४७ ॥ हार पुतळ्यांचे घालिती गळां । भाषेंत आपल्या सांगे सकळां । कांहीं आहेत सुनेच्या माळा । दुसऱ्या लेइल्या दुलडी ॥ ४८ ॥ ऐसीं अर्भकें उत्पन्न झालीं । त्यांनींच हीं पृथ्वी लुटिली । दीनवदनें मनुष्यें केलीं । घरोघर भिकारी जाहले ॥ ४९ ॥ रेंकटें[1] ज्यांनीं पांघरावें । एकदांच त्यांचीं उपटलीं दैवें । शाल-जोडींत पर्ण बांधावे । मोट जैशी चवाळ्याची ॥५०॥ दोदो लक्षांचा एक वाडा । त्याच्या फोडोनियां कवाडा । मोकळा अवघा पिछे-वाडा[2] । मंदिरांत लोळती उंदीर ॥ ५१ ॥ मोठमोठालीं देवालयें । चांगलीं राहूं देऊं नये । छिन्न भिन्न करावे हातपाय । कर्णघ्राणें फांडावीं ॥ ५२ ॥ कोट्याधीपती संभावित । मार मारू भरावे भोतें । बताव ऐसे बोलतात । तोंडांत घालिती बोकणे[3] ॥ ५३ ॥ जरी कोट्यावधी दिधलें द्रव्य । तरी बताव ऐसी राहूं नये । आणीकही दाखवा कोठें आहे । बताव कांहीं नसरेची ॥ ५४ ॥ मग बताव त्याची सरावी केव्हां । प्राण त्याचा जाईल जेव्हां । द्रव्य नाहीसें समजावें तेव्हां । असतें तरी कां मरतेहो ॥ ५५ ॥ कोलदांडे

---

१ फाटकें कांबळ. २ मागीलदार. ३ गोणी. ४ बोळे.

घालुनियां एकसरी । झाडांसी टांगिताति हारोहारी । जळत काष्ठें घालिती शिरीं । मांस तोडिती सांडसानें ।। ५६ ।। दुधारी ठेवावी वक्षस्थळीं । एक उगाच बोटें मुरगाळी । एक नाकपुडी पिरगाळी । एक निर्पसितो[1] दाढीमिशा ।। ५७ ।। एकदांची धरूनियां शेंदोनशें । बळदांत[2] कोंडावीं माणसें । पुनः त्यांचें स्मरणही नसे । जीवंत किंवा मेले ते ।। ५८ ।। जरी भिकारी लागला हातीं । त्यास बिगारी खालीं मारितातीं । जिकडे जातो तिकडे नेती । ओझें मनस्वी लादावें ।। ५९ ।। जी जी वस्तु सांपडावी । ती ती बिगारि-यापाशीं द्यावी । मनस्वी ओझ्यानें मूर्च्छना यावी । वरूनियां यानें वडवावें ।। ६० ।। म्हणे दिसतोसी तरणाताठा । अशातर तू ने-शील चार मोटा । मग सोबत्यास म्हणे तुमच्याही गांठा । टाका आमुच्या तट्टावरी ।।६१।। तो बिगारी कैसा वांचावा । पुनः गृहातें न यावा । मग तो गेलिया गांवा । ऐसे ही मेले लक्षावधी ।। ६२ ।। कैसेंही शक्तिवान् असेल मनुज । तें शक्तिनुसार उचलील ओझें । पहिलवान मस्तकीं सहज । गज कैसा घेईल ।। ६३ ।। पोहणार नेला समुद्रतीरीं । म्हणे परत जाउनि ये माघारी । लक्ष मनुष्याचें अन्न पात्रीं । बालिष्ठ तेथें काय करी ।। ६४ ।। तैसा वजन बिगारी एक मण । मस्तकीं खंडीचें सामान । तो कैसाही झाला बलसंपन्न । तरी गाडाभर ओझें कां घेईल ।। ६५ ।। असो पुरुषाची जेव्हां ऐसी दशा । मग ठेविल्या असतील स्त्रिया कैशा । मनास ज्याच्या आवडल जैशा । त्यानें तशा भोगाव्या ।। ६६ ।। चांगल्या अथवा ओंगळी । ज्यास जी मिळे क्षुधाकाळीं । तोच तिला कवटाळी । भ्रता-

---

१ उपटितो. २ दाणा भरून ठेवण्यासाठीं भिंतींत जागा करून ठेविली असेल ती.

[stamp]

राचे सन्मुख ॥ ६७ ॥ तो अविचारें सांगतां ग्रंथायुक्त । दोष घडेल आणि वाढेल ग्रंथ । हे अविचाराचे पर्वत । कोठवरी सांगावे ॥ ६८ ॥ असो श्रीमाधव जातां देवभेटी । बंडें भ्रष्ट केली बहुधा सृष्टी । पुढें दुष्कळही त्याचेच पोटीं । बंडानिमित्त जाहला ॥६९॥ अन्न न मिळे मनुष्यातें । कोट्यावधी पडलीं प्रेतें । जननी आपुलिया बाळकांतें । हिरवेंच लागे भक्षावया ॥ ७० ॥ वृक्षास नराहें एकपर्ण । मग अपक्क राहतील कोठून । सोंतरोठे[1] वरबडे[2] भक्षून । तरी वाचले नाहींत ॥ ७१ ॥ वृषभ धेनु सूकर श्वानें । मत्स्य मंडुक गणपतीवाहनें । सर्वही भक्षिले भिकाऱ्यानें । शेवटीं प्राण गेलेहो ॥ ७२ ॥ असंख्यात पर्वताचे पर्वत । बिदोबिदीं शिरें लोळत । काक घारी श्वान बहुत । प्रेतालागीं तुडविती ॥ ७३ ॥ असें जें भक्षुनये तें भक्षिलें । शेवटीं ईश्वरीं उपेक्षिलें । त्यांतून चवथाई रक्षिलें । तीन हिस्से गतप्राण ॥ ७४ ॥ हातानें तोलावें सुवर्ण । धान्य मोजावें ताजव्यानें । अच्छेर दीडपाव दाणे । रुपयाचे तेही न मिळे ॥ ७५ ॥ अन्नावांचून चालले प्राण । लोक जाहले ते निर्धन । मायांच्या गळां मिठी घालून । मुलें बाळें आक्रंदती॥७६॥ अन्नाकारितां प्राण गेले । । अधम कैचे स्मशानांत गेले । तेथें भिकारी अवतरले । त्या प्रेताला भक्षावया ॥ ७७ ॥ जेसे दाणे काढिती कणसाचे । मग काय प्रयोजन बिटोरियाचें । तैसें मांस रक्त भक्षावें त्याचें । सांपळे हाडाचे लोळती ॥ ७८ ॥ तें मांस ज्यानें भक्षिलें सर्वांचि त्याचे प्राण गेले । असो ऐसे लक्षानुलक्ष मेले । गणीत कोणा न करवे ॥ ७९ ॥ कोणी गहस्थ ठेवावा चाकरी । तो आधीं चोरूनि भक्षितो भाकरी । इतकी धान्याची अखेरी । कधीं पाहिली

---

१ वनस्पातिविशेष. २ गवत.

न ऐकिली ॥ ८० ॥ स्त्री पाहातसे भ्रताराचे मढें । तिच्याही न पाहवे पोटाकडे । तान्हे लेंकरूही न घेववे कडे । त्याचीही आस्था सोडिली ॥ ८१ ॥ कोण प्रेताला ओढितो । येथें अवघ्यांचा प्राण जातो । कोण कोणाचा समाचार घेतो । यांत वांचतो कोणता॥८२॥ सर्रा सर्वत्रालागीं जाणा । एकसारख्याची वेदना । धनाढ्यासि न मिळे दाणा । मग निर्धन कैसा वाचतो ॥ ८३ ॥ प्रताप अनंतो यत्किंचित । परंतु कवीचा लाघव बहुत । तेसा येथें अनर्थ अत्यद्भुत । कवीनें यत्किंचित वर्णिलें ॥ ८४ ॥ महाअभिमानी देखण्या नारी । त्या घरोघर लागल्या दाण्यावरी । घरधनी वरूनी काठ्या मारी । मग अभिमान कोठें राहिला ॥ ८५ ॥ बंड आणि महर्गतेचा संयोग । या उभयतांचा घडतां योग । प्रळय झाला यथासांग रुसावयाला जागा न ठेविलि ॥ ८६ ॥ स्वामीचा जे घात योजितो। शेवट त्याच्या ऐशागती । सत्क्रियेशी न जागती । ते अधोगती मरताती ॥ ८७ ॥ यांचि अर्थ जो घेईल कवी । तो पुढें कविता करील नवी । ही हकीकत नसे ठावी । अनंतफंदी वेगळी ॥ ८८ ॥ शुद्ध अशुद्ध या माधव ग्रंथीं । कल्पना न घ्यावी पंडिती । हा ग्रंथ थोरथोरांप्रती । बखर केली असे ॥ ८९ ॥ यांत अवघे राज्यकारण । संपूर्ण केलें निवेदन । कळो पर्के वर्तमान । येथूनी झाले समाप्त ॥ ॥ ९० ॥ आतां पुढें समग्र दुनियां। आरंभ होईल लुटावका । प्राणीमात्रास नुपजे दया । कठीण हृदय होतील ॥ ९१ ॥ अनंतफंदीच्या कवीवर छंदें । मर्मज्ञ डोलती परमानंदे । पुढें कंपूवयमाण वदे । उजाड पृथ्वी करतील ॥ ९२ ॥ इति श्रीमाधव ग्रंथ अनुश्रुत । कैसें झालें अत्यद्भुत । तें परिसोत श्रोते पंडित । षष्ठमोध्याय गोड हा ॥ ९३ ॥ इति माधव ग्रंथ समाप्त.

## परिशिष्ट.

याच कवीनें याच विषयावर आणखी एक अनेक छंदांनीं रचलला ग्रंथ केला आहे. त्यापैकीं आम्हाजवळ कांहीं किरकोळ भाग आहे; पण त्यांत अशुद्धें आहेत. सर्व ग्रंथाची शुद्ध प्रत मिळेपर्यंत या प्रतीवरच निर्वाह करणें भाग. यास्तव सध्यां उपलब्ध असलेल्या प्रकरणांपैकीं मुळांत असलेल्या ओंव्याखेरीज करून बाकींचीं वृत्तें आहेत तशीं अशुद्धच या परिशिष्टांत दाखल केलीं आहेत. पुढें शुद्ध प्रत मिळाल्यावर दाखल करतां येईल.

### अध्याय पहिला.

**ओंव्या १–२आर्या**–शके सत्राशें सत्रा, राक्षससंवत्सरांत खडबडले । श्री माधव गणपतीच्या, रंगमहालावरून गडबडले ॥

**ओंवी ३—अनुष्टुप**–आश्वीन शुद्ध द्वादशीस, टाकली असे उडी । अंतकाळ हो जाहला, पौर्णिमेसीच तांतडी ॥

**ओंव्या ६–१२–शिखरिणी**—तदा नानाला हो अघटित महासंकट पडे, आतां राज्यालागीं दत्तचि असावें ततघडे । तदा शिंदे स्वामीसेवेंत बहु सादर असे, अयोध्याधीशाचा पवनज जसा सेवक तसे ॥

**ओंवी २९–आर्या**–चित्तांत म्हणे नाना । मी जर दत्ताचा विचार उडवींतों । नाहीं तर यासमयीं, हा शिंदा आपणास बुडवींतो ॥

**ओंव्या ३२–४४–शार्दूलविक्रीडित**–नानांनीं मग भाऊला सुचविलें जा जुन्नरा येधवां । बाजीराव आणि अपा उभयता ज्येष्ठास तेथें ठिवा । आज्ञा घेउनि भाउ स्वार जाहले गेले त्वरें

जुन्नरा । त्रीवर्गासहि भेटुनि मग वदे भाउ विधी हरिहरा ।।

सवाई–अमृतरायास बोलतसे भाऊ बाजी आपांस पुण्यास नेयाचें; द्यावी रजा महराज ह्मणे कर जोडुनि अर्जी करीत तयाची । ते समयीं मग अमृतराय प्रतिउत्तर भाउस देत मायाचें ( ? ), न्या जा परंतु दोघांतही अंतर पाडूं नका मुलें अल्पवयाचीं ।। १ ।। नेउं नका जरि म्यां म्हटलें तरि तुम्हीं बळेंच आलांत नेयास, थोर वयातीत वृद्ध तुम्ही वरुषें गत झालींत फार वयास । नानाचे व तुमचे हे ओटींत मुलें दिधलीं जिव लावी तयास, मांजर घालितसे फेरी तेंव्हां जसे शिंक्यावरीं ठेविती पायास ।। २ ।। उपजाती–केले रजाचे गज म्यां मुलांला, सांभाळितो माळी जसा फुलांला । सांभाळ म्यां आजपर्यंत यांचा, केला असे वाव नसे भयाचा ।। ३ ।। आतां तुम्ही यांस आजांत नेऊं, तेंव्हां पुढें उत्तर देत भाऊ । चिंता मुलांची किमपी न कीजे, मी असतां अंतर या न दीजे । ओवी–ऐकुनि भाऊंचें मृदूत्तर, मग संतुष्ट जाहले अमृतेश्वर । आपल्या हस्तें उन्नतांवर, गुलबापाणी शिंपिलें ।।४।।

## अध्याय दुसरा.

ओव्या ८–२७–सवाई–लवकी पुण्यामधीं भाऊनीं बाजीराव आपांस आणुनि सुवेळीं, नानाच्या व पेशव्यांच्या भेटी जाहल्या पुढें नानानीं केली खाडाळी । वाड्यांत पेशव्यांच्या हीं मुलें दोन्ही आणावीं आज उद्यां शीघ्रकाळीं, दोघांसही न्यावें पर्वतीच्या दर्शनानिमित्त अभिमानें जाळी ।। १ ।। बाजीरायातें पुढें चालवावें आपा साहेबातें येऊं द्यावें मागें, सिंहगडाकडे बाजीस न्यावें आणावें आपा मागें वाड्यांत वेगें । नानाचे कावे अपा बाजीला झाले ठावे तेंव्हा मोठे दिलगिर दोघे, पानवडकिर

रामजीला रावबाजी तेव्हां ही हकीकत सांगे ॥ २ ॥ वाड्यांत आमचें उभयतांचें जाणें न होय तें करावें सांगे वकिलाला, तेव्हां नानाकडे रामजी पाटील दौलतरावशिंद्याकुण आला । शिंद्याचे भेटीवांचुनी वाड्यांत न यावीं मुलें ऐसें सांगे नानाला, भेटीरहीत वाड्यांत नेले तर कामा नये तेव्हां खट्टाचि जाहला ॥ ३ ॥ ते दिवशीं राव बाजी आशांचें अरिष्ट महाअरीनें धुडवीलें, दादांचें पुण्य पुढें आडवें जाहलें तेव्हां त्यांनीं आपाय खुडवीले, त्या समयामाजी दो चवरोजांनीं शिंदे पुण्यास येणार उडवीलें, घाबरलासे बाळाजी जनार्दन शिंद्या हातीं ह्मणे जाऊं तुडवीले ॥ ४ ॥ कंपु शिंद्यासवें पलटणी चाळिस हजार आणिक सेना शिवाय, फाराचि घाबरले नाना धैर्य न धरवे भयेंकरून व्यापला हे । बाजीरायालागीं भेटु आले नाना म्लान मुखें ह्मणे मी आपुला हे, शिंद्याचि मर्जी मला बुडवावें तुम्ही असतां मज भय तें काय ॥ ५ ॥ स्वामींनीं मातें स्वहस्तें वधावें न द्यावें हातीं इतराच्या कदापि । माय जशी अन्याय मुलाचे सहस्र सोशीतसे प्रीतीनें दापी, असा आपला अपराधी आहे मी परंतु आतां जगवावें तथापि, बाजीरायातें आला द्रव नानाशीं बोलत राघवपुत्र प्रतापी ॥ ६ ॥ पूर्वींचे तुमचे आचार कसे होते सूक्ष्मदृष्टीनें ध्यानांत आणा, साहेब दादा होते तेव्हां तुम्हीं त्यांना मनस्वी पिडा केली नाना । सुरतेहुनी आलों गंगतिरीं तेव्हां दादाशीं देवआज्ञा झाली जाणा, दहनाची रक्षा तैसीच गंगेवरी दादाची तों केलें कैद तिघांना ॥ ७ ॥ आर्या—उत्तम स्थळ गंगातिरीं, रात्रोबा पावतांच स्वर्गातें । त्याचे मागें तुम्ही, केली अम्हां अगोळा त्रिवर्गातें ॥

ओंव्या ४०—४१—स्वागता—शोध अंतरिं यंदों करि नांना, दुः-

ख यास दिधलें म्हणे नाना । फोडुनी शिरूं म्हणे अवनींत वर्तलों बहुत मी अवनीत ॥ ओंवी—मग नानाशीं म्हणे बाजीराय, शिंद्याचें बाळगूं नका भय । मी असतां करणार काय, तुह्मा धक्का लागूं न दे ॥ बाजीरायाचीं मृदु वचनें, नानानें केलीं कर्णभूषणें । म्हणे मजकरितां स्वामीनें, आग्रह फार धरिला असे ॥

## अध्याय तिसरा.

**ओंव्या ७—१७—शार्दूलविक्रीडित**—नानाला म्हणे बाजीराव शिंदा येणार येथें त्वरें, साताऱ्यास निघा तुम्ही झडकरी जाणोन वाइट बरें । भाऊ मीच इथें असों उभयतां फडक्यासही ठेवितों, अवघे मानकरी तुकोजीसहित घेऊनियां राहतों । शिंद्यालागिं मी गोडगोड वचनें बोलूनियां सांगतों, तुमचें त्याचें रहस्य व्हावया ऐसें या कामीं मी लागतों । श्रीमंताची रजा होतां ते समयीं नाना निघाले त्वरें, भाऊला निरवीतसे मग तदा नाना बहु आदरें ॥ **शिखरिणी**—धरायासी शिंदा घडिघडि मला तो जपतसे, गजालागीं जैसा मृगपति धराया टपतसे । म्हणूनी साताऱ्या जाणेंची मला भाऊस ह्मणे, तुम्ही येथें राहा स्वामीजवळ शहाणपणें ॥ मुलें हीं ल्हानालीं मसलत कधीं ठाउकी नसे, तुम्ही सांभाळावें प्रस्तुत आतां मी पळतसें । तदा साताऱ्याशीं लवकरचि नाना पोंहचले, आला शिंदा भेटूं खडकीजवळी भेटलीं मुलें । आपा बाजीराय मग ते आले वाड्यांत आपल्या, तेव्हां नानाच्याहो सर्वहि कळा त्या हरपल्या । आतां शिंदे स्वामी एकचि जहाले ह्मणतसे, आधारें कोणाचे जोर धरूं नाना कण्हतसे । **पंचचामर**—साताऱ्यास वस्त्रें घ्यावीं राजियाचीं त्यामुळें, निघाले पुण्याचे बाहेरी घेउनी सर्व दळें । कुच करुनि थेउरास बाजिराव ते आले, तेथें शिंद्याचे

कारभारी कोण कोण पातले । पागनीस बाळोबा धोंडिबा सर्वे आला, राव बाजीलागी सांगती एकांत जाहला । कीं शत्रू स्वामीचा धरूनियां लुबाहला ( ? ), स्वामींनीं रुकार दिधला कीं तह लादला ॥

**ओंव्या २३-२५-पंचचामर**-योग्य दौलतीस बाजीराव नाहीं दिसतो, मला चिमाअपा बहुत दैववान भासतो । यशोदाबाईचे ओटींत घालिजे चिमाअपा, मग नानालाही हर्ष जाहला न झाला खपा ॥ चिंतोपंत नानालागिं बोलिले तें ऐका, भटाभिक्षुकांस पाठवा विधान पत्रिका । थोर थोर ब्राम्हणाचे विद्यमानें दत्त द्या, सर्व मुत्सद्दी बोलवा एकामेकांचें मत घ्या ॥

**ओंवी ४६-पंचचामर**-स्नानसंध्येमाजि राहुटींत बाजिराव ते, भाऊ धोंडिबा फितुरी हेचि आग लावते । बंदोबस्त राहुटी सभोंवता करूनियां, मग पुढें चिमाअपास नेऊं म्हणे धरूनियां ॥

## अध्याय चवथा.

**ओंवी ४-१७-पंचचामर**-पुढें आपास भाउनीं धरोन एकांतीं गांठले, तेव्हां फजीत केलें भाउला रायाजीपाटलें । तुम्ही शिपाई फक्त बाहेरील शत्रू सर करा, घरपुरुष फोडूं नये अपास नेणें दूर करा । बाजीराव मुख्य हे धनी येथें तरंगले, तुम्ही चिमा-अपास नेतसा नव्हे हें चांगलें । फडके जरी तुम्हास येऊनि स्वयें मिळालेत, परंतु लोक नाहीं हुजुरातचे पळालेत । धन्यासीं टाकुनी तुम्हाकडे समग्र होतील, असें तो नावडे परंतु तुमचे प्राण घेतील । पाठीशीं धनी समर्थ असतां भय नसे, अंतरीं तेव्हां तो भाऊ त्रस्त फार होतसे । घात जर धन्याचा जाहला गेलेत मारले, ते धरतील तुम्हास उलटें शत्रूपण दुसारलें । मृत्यु मोलें घेतसा उगाच

व्यर्थ कासया, भाऊ ह्मणें कशास व्यर्थ दहशती आह्मांस या। मारले गेले धनी ते फार चांगले ह्मणे, तेव्हां रायाजी पाटलानें ऐकिलें हें बोलणें । ह्मणे तुह्मी वऱ्यावरी धन्याचे पहिल्यापासुनीं, पूर्व चाली भाऊच्या रायाजी काढी तेक्षणीं । गोपाळराव मोगलाशीं गेले मिळुनियां जेव्हां, तुमचे असे वडील त्यांनीं जाळिलें पुणें तेव्हां । तुह्मीं नका पडूं पिडेंत ऐकाची मी सांगतों, जाल मारले अपास नेऊं नका मी सांगतों ॥ आर्या—ऐकूनियां भाऊनीं, त्याच वर्डी धोंडिबास सांगितले । कीं चिमाअपास न न्यावें, रायाजी पाटलानीं मागितलें ॥ स० बोलतसे धोंडिबा ह्मणे लष्कराबाहेरी काढुनियां रावबाजी, स्वस्थपणें उचलवि तुम्हांस कळेल तसें चिमणा अपाजी । ऐसी करून तेव्हां मसलत धोंडिबा भाऊ राहोत माजी; बाजीरायाकडे येउनी बक ध्यानस्थ म्हणे स्वामी आज्ञेत राजी ॥

**ओव्या ४३–९२–आर्या**—रावबाजी शिंद्याकडे, गेले त्यांना विलंब झाला हो ! भारी अपा चलाहो, त्यांनीं बोलविलें तुम्हांला हो ॥ **शार्दूलविक्रीडित**—फडक्यालागीं चिमा अपा म्हणतसे जातेसमयीं बाजींनीं, मजला सांगितलें तसें करिन मी मुख्य मला ते धनी । बाळाजी पटवर्धनास म्हणे मी धाडिन तुला बोलाऊं, इतरांच्या ह्मणण्यानें येऊं नये करितां जुलूम बहु । श्लोक—बाळाजीपंत पटवर्धनास यावें त्वरित घेवोनियां, मग मी तुम्हां सर्वांचि चालतों आतां जेऊनिया । मग तेव्हां मनीं विचार करीत भाऊ, आतां जबरदस्ती करून नेऊं । त्यानंतर मग अपा गेले भोजनाला, मग मंडळी इतर लोक जमाव झाला । करूनि भोजन अपांनीं आराम केला, तेथें बिचोब्यांतचि भाऊ आला ॥ सवाई—अर्जी करीत उभे

भाऊ चिमणा अपा पुढें म्हणती महाराज चलों, तेव्हां अपा करीं उत्तर घेउनि यावें बाळाजी पटवर्धनाला । भाऊ म्हणे अब्रूही उगाचि कशास्तव व्यर्थ गमाविशी मुला, मर्यादा टाकुनियां भाषणें गणना नाहीं करूनचि त्याला । त्या समयांत आपासाहेबास महा हृदयामाजि गहिंवर दाटे, द्वादश वर्षामाजि ते बालक काय करील आभाळचि फाटे । डेऱ्याचे आंत शिपाई अपासाहेबाभवताले अविंध मराठे, काळमाहात्म्य आलें उफराटें तों भाऊ मिळाले सराटेखराटे। धैर्य धरुनि तसाचि अपा बसलासे खुशाल पलगावरी तो, भाऊ हरी विष्णुलागीं म्हणे मुल चालावया अनमान करितो । आतां बळेंचि अपा उचलावे म्हणोनि हरी विष्णु आव धरितो, तेव्हां भाऊस कसा दिसला जणो रामवधु दशमुख हरीतो । अनुष्टुप ॥ असो तेव्हां अपांनीं पाहुनि मनस्वी गलबला । मांडिला गोविंद-राव पिंगळ्यांनीं किलबिला ॥

---

# पोंवाडा १.

## ( खर्ड्याच्या लढाईवर )

चाल ॥ कटाव ॥

श्रीमंत सवाई नांव पावले । दिव्य तनू जणुं चित्र बाहुलें । वि-चित्र पुण्योदरीं समावले। नानातें राज्याचे अवॅले। विधात्यानें[2] नेमून ठेविले।बसल्या जागा कैक छपाविले।उन्मत्त झाले तेच खॅपाविले[3] । अति रतिकुल दोरींत ओविले । जगावयाचे तेच जगविले । तमाम

१ सुकाणू फिरवणारे. २ ब्रम्हदेवानें ३ नाहींसें केले.

शत्रू मग नागविले। तपसामर्थ्यें येश लपविलें। दिल्ली अग्र्यावर झेंडे रोविले। अटक कर्नाटकांत भोंवले, जिकडे पहावें तिकडे उगवले, माधवराय पुण्याचीं पावले, टिपू सारखे मुठींत घांवले, मेणा परिस मृदु वांकविले। सवाई तेजापुढें झांकले। पुण्य सवळ उत्कृष्ठ फांकले। नानापुढें बुद्धिवान चकले। कैक त्यांची तालीम शिकले। तरि ते अपक्क नाहीं पिकले, दहा विस वर्षे स्वराज्य हांकिले, श्रीमंताचें तक्त राखिलें. अक्कलवंत कोठेंहि न थकले। श्रीमंत गर्भी असतां एकले, नानांनीं राज्य ठोकुनि हाकिले, माझे करूनि महाभाव केलें, जहाज बुद्धीवळ जवकले, यावत्काळ पावेतों टिकले, श्रीमंत पाहून धनुंवर छकले, छोटेखानी कैक दबकले, जे स्वामीं चरणास लुबकले, ते तरले वरकड अंतरले, जे मीपणांत गर्वें भरले, ते नानांनीं हातिं न धरलें, ते सैहिब सेवेंत घसरले, मग त्यांचें पुण्योदय सरलें, न ( ? ) जन्मले माते उदरीं, घाशिराम कोतवाल त्यावर उलथून पडली ब्रम्हपुरी। सबाई माधवराव सवाई भाग्योदय ज्यांचे पदरीं, यशवंत श्रीमंत पेशवे अपेश तेथें पाणी भरी ॥ १ ॥

श्रीमंताचें पुण्य सवळ कीं, न्यून पडेना पदार्थ एकहि, महान्न झाले भिन्न मनोदय खिन्न करूनी, शत्रूचीं शकलें मध्यें एक चिन्ह उद्भवलें, नवाब झाला सिद्ध करु म्हणे, राज्य आपण पृथ्वीचें सारें, गलीमाचे मोडूनि पसारे, वकील धाडुनिया परभारे, हलुच लाविले सारे दोरे, ह्मणे युद्ध करा धरा हत्यारें, त्यामुळें वीरश्रीच्या मारे, शहर पुण्याच्या बाहेर डेरे,

४ सिंधू. ५ उदय पावले. ६ सांपडले. ७ सवाई माधवराव ८ थक्क झालें. ९ शिक्षण. १०कच्चे.११ ब्राम्हणी राज्य. १२ गादी. १३ धनुर्धर. १४. सवाई माधवराव पेशवे. १५ टुकडे.

गारपिरावर दिधले डेरे, श्रीमंताना जयजयकारें, होळकरास धाडिलें बलाउन, छोटे मोठे समग्र येऊन, वडिलपणानें जय संपदा, पाटिलं गेले ते विष्णुपदा, जवर त्यांची सब्र्से ज्यादा, गादीवर दवलतराव शिंदा, बहुत शिपायांचा पोशिंदा, त्याच्या नांवें करूनि सनदा, लष्करि एकहि नाहिं अजुरदा, त्याचे पदरचे जिवबादादा, सुद्धां आणविलें, परशरामभाऊ मिरजवाले, नागपुराकडुन आले भोसले, बाबा फडके, आप्पा बळवंत, बजाबा बापू, शिलेरकर माधवराव रास्ते, राजे बहादर, गोविंदराव पिंगळे, विठ्ठलसिंग आणिक देव रंगराव वढेकर, गोडबोले, राघोपंत जयवंत पानशे, मालोजी राजे, घोरपडे, दाजीबा पाटणकर, अष्ट प्रधानांतील प्रतिनिधि फाकडे मानाजी मागुन आले, चक्रदेव नारोपंत भले दाभाडे, निंबाळकर हे उभेच ठेले, रामराव दरेकर चमकले, वकील रामाजी पाटिल सुकले, मग याशिवाय चुकले मुकले । कोण पाह्याला गेले आपले । तमाम पागे पतके बेरोजगारी घेउंनि कुतुके । अचाट फौजा मिळूनि आले, वळून गेले । जुळून संगम झाला, तीलक्षाचा एकच ठेला, त्यामधिं नाना ते कुलकला, होणारी शंकर नानाला, बंदुखानी तोफा गरनाळा, वाद्यें रणभेरी कर्णाला, गणिता नाहीं शामकर्णाला, मरणाला नच भीती घोडे, पुढें धकाउनि नानासहवर्तमान पुण्यांत आले, राउत तमाम दुनिया आली पाह्याला, कन्हया माधवराव फुलाचा झेला, पेशव्यांनीं कुच केला, सर्वेचि मोंगल सावध झाला, याचा त्याचा पाण्यावरुनी तंटा झाला, तो तंटा त्यानिंच वाढविला, श्रीमंतांनीं करूनि हल्ला, घ्या घ्या म्हणून कैक धुडाउन, दिले लुढाउन मोगल गोगलेंगाय करुनिया, पृथ्वी

१ महादजी शिंदे. २ मृत्यु पावले. ३ दीन.

देईना ठाय, मोकली धाय करित हायहाय, तेव्हां लेंकरा विसरली माय, प्रतापी सवाई माधवराय, मोंगल त्राहे त्राहे करितील माय, करुनि सोडविला गनिमाचा वरपाय, कैक दरपानें खालीं पाहे, किं सर्पासंनिध उंदिर जाय, असा मृदु मोंगल केला, शरण आला मग मरण कसें चिंतावें त्याला, उभयतापक्षीं सल्ला झाला, पुढें मग महाल मुलुख कांहीं देतो घेतो श्रीमंताला, ते आपल्याला, कोण सांगतों आतां पुढें जे उडेल मातु तेव्हां कळेल कीं अमके महाल, अमकी धातु अमकी पांतु, नबाबावर रहस्य राखुनि रंग मारला, पुढें ठेविली अस्ता, रस्ता धरूनि पुण्याचा थाट दुरस्ता, नबाबावर कंबरवस्ता फिरून आले वळून एक एक नानापरिच्या वस्ता, स्वता दाणा पाणी वाद्यांसहवर्तमान मश्रु मुलुख कैद करु-नियां, श्रीमंतानीं कारागृहीं ठेविला, येथुनि पवाडा समाप्त झाला, सव् शहरीं संममनेरी फंदी अनंत कटिबंद छंद ललकारी, श्रीमंता दरबारीं । सवाई माधवराव सवाई भाग्योदय ज्याचे पदरीं । यशवंत श्रीमंत पेशवे अपेश तेथें पाणी भरी ॥ २ ॥

# पोंवाडा २.

## ( रावबाजीवर )

उच्या केशरी टिळा कस्तुरी कमालखानी हार गजरे । गहे-नाजी वहेनाजी अक्षयीं जवळ पालखिच्या हुजरे । जुनी माणसें तीं कणसाला महाग गैर त्याची बुजरे । चार चटारी भ-टारी हलके जाणुनिगे अलबत हुजरे । सुंदर स्त्री दुसऱ्या-ची तिसरा दे बैल गुतुन अवता । शाल्योदन मिष्टान्न भोगता सवा शेरं ज्याचा सवता । चोवीस वर्षे चैन भोगिली राज्यक्रांति

जाणुन नवता ॥ धृ० ॥ १ ॥ जो नीचकर्मी लइशी गुर्मी कुटुंब दाखल नजराणा । प्रभु फार संतोष न किमपी दोष निजा इज-जवळ जाणा । असे अवश्य घडवी अडवी तिडवी चार प्रहर दम द्या ताणा । दौलतीस बाजीराय करिल अपाय म्हणत होते नाना । खेळ करुनि उफराटा वरंटा पाटा रयतेच्या भवता ॥ शाल्यो० ॥ २ ॥ कुलकल्ला त्रिंबकजी डेंगुळ अगदिं राहिले दिडवोट । पंढरपुरीं महाद्वारीं शास्त्री ठार केले कर्मच खोटे । चौकुन मग इचकोबा तोबा हाय सुकुन गेले ओठ । आळ येतांच चंडाळ गडावर पदरीं काय पडला धोट । सर्वांची रग जिरली ह्मणुनि तळि भरली आला दीप मालवता । फंदी-मूल ह्मणे असति विरस ! कां गादि पुण्याची घालवता । शाल्यो-दन मिष्टान्न० ॥ धृ० ॥ ३ ॥

## पोंवाडा ३.

(शेवटले बाजीरावाचा) चाल ॥ ओंव्या ॥

वडिलांचे हातचे चाकर । त्यांस न मिळे भाकर ।
अजागळ ते तूपसाखर । चारुनि व्यर्थ पोशिले ॥ १ ॥
सत्पात्राचा त्रास मनीं । उपजे प्रभूचे मनांतूनि ।
ज्या पुरुषास न कोणी । अर्धी त्याला भजावें ॥ २ ॥
तट्टू ज्यास न मिळे कधीं । पालखी द्यावी तयास आधिं ।
मडकें टाकुनि भांड्यांत रांधी ॥ ताटवाट्या भोजना ॥ ३ ॥
द्रव्य देऊन आणिक आणिक । नवे तितके केले धानिक ।
जुन्याची तिंबुनि कणीक । राज्य आपुलें हराविलें ॥ ४ ॥
जो पायलीची खाईल क्षिप्रा । पालखी द्यावी तया विप्रा ।

निराक्षर एकाद्या विप्रा । त्याला क्षिप्रा चारावी ॥ ५ ॥
एके दिवशीं व्हावी खुशाली । स्वारी पुढें शंभर मशाली ।
एके दिवशीं जैशी निशा आली । मशाल एकही नसावी ॥ ६ ॥
मेण्यांत बसावें जाउनि । कपाटें ध्यावीं लाउनि ।
स्वरूप कोणा न दावूनी । जागें किंवा निजले कळेना ॥ ७ ॥
हुताशनीच्या सुंदर गांठ्या । शेर शेर साकरेच्या पेट्या ।
विप्र कंठीं जैशा घंट्या । उगाच कंठ्या घालाव्या ॥ ८ ॥
तशाच राख्या जबरदस्त । सांभाळितां जड होती हस्त ॥
दौलत लुटुनि केली फस्त । हस्त चहूंकडे फिरविला ॥ ९ ॥
तुरा शिरीं केवढा तरी । बहुतची मोठा चक्राकारी ॥
हार गजरे नखरेदारी । सोंगापरी दिसावें ॥ १० ॥
हात हात रेशमी धोतरजोडे । चालतां ओझें चहूंकडे
आंगवस्त्र दाहदां पडे । चरणी खडे रूतताती ॥ ११ ॥
पोषाग दिधले बाजिरायें । मोच्यास पैका कोठें आहे ? ॥
तैसेच अनवाणी चालताहे । शास्त्री अथवा अशास्त्री ॥ १२ ॥
घडींत व्हावें क्रोधयुक्त । घडींत व्हावें आनंदभरित ॥
घडींत व्हावें कृपण बहुत । घडींत उदार कर्णापरी ॥ १३ ॥
घडींत व्हावी सौम्य मुद्रा । घडींत यावा कोप रुद्रा ॥
घडींत ध्यावी क्षणैक निद्रा । स्वेच्छाचारी प्रभू हा ॥ १४ ॥

## पोवाडा ४.

### ( नाना फडनाविसाचा )

सवाईमाधवरावसवाई सवाई डंका बजाया ! फडणीस नानाकी तारीफ अक्कलने तो गजब किया ॥ धृ० ॥

बिनधारसे राज्य चलाया नाकिसे चक्मक् झडी । कैक मुत्सदी चपगये बस भये नानाकी तो अक्कल बडी । दिल्ली अटक लाहोर भाहोर कर्नाटक बीच पुकार पडी । चारो तरफ तजेला निकला चंदाऐसी किरत बडी । जिने बैठे राज कमाया दिलके तै खूप दिल दिलासा दिया । साहेब बंदगी करना पुना छांड कहूं अया न गया । अजि बडी अकल । सवायी माधवराव सवायी सवायी डंका वजाया । फडणीस नानाकी तारिफ अक्कलने तो गजब किया ॥ ॥ १ ॥ कैक मुत्सदी होगये अक्कल नानाकी नयी पायी किसे। निजामअल्ली भगादिया साहेब जसदे हराउसे । टिपूसरीखे लाये बगलमे ज्या पहुंचे दरवाजेसे । पेशवोका निमक जहालम् मनीं कियावो गाजीमे । क्या नबाबका हुवा खराबा तोबा सबही डुबा-दिया । तुम हमबी कानोसे सुनते याजस लेकर कोन गया । कुचबी नही । सवायी माधवराव सवायी० ॥ २ ॥ किया मोंगल-पर हल्ला उसदिन कई उमराव संगा चले । शिंदे होळकर और नागपुरवाले भोसले आन मिले । दाभाडे पाटणकर निंबालकर कट्टे लढनेवाले । पवार जाधव माधवरावके संगत नानाबी निकले । फडके आपाबळवंत रास्ते अभग्रे इसमे कोण रह्या । चुका भुला हुवा देखने कहा अपना अखर गया । अजि किसे खबर । सवायी माधवराव सवायी० ॥ ३ ॥ सब् मिल हल्ला किया उडादिया नबा-बके धुडके धुडके । मशरमुलुक् पकड कैदमे डाल दिया बैठो चुपके । पानी बिगर घोडे उट हत्ती तमाम मरगये नबाबके । रुपयेका जल एक कटोरा पानी ऐसी जगा रखे । किसे खबर भइ मेहेल मुलुख नबावने क्या दिया लिया । फंदी अनंत कुतै क्या मामलु

१ नर्मदा.

सुनते है कुच कबूल किया । सचहोयगा । सवायी माधवराव सवायी० ॥ ४ ॥

# पोंवाडा ५.

## ( यशवंतराव होळकरावर )

सुभेदार यशवंत कन्हया सदा फत्ते करी तलवारी । सवाई यशवंतराव होळकर प्रसन्न मल्हारी हस्त शिरीं ॥ ध्रुवपद ॥

वडील नावकर मल्हार ऐका गर्दी झाली त्यावरती । जे सावध होते परंतु सर्यत केली सरतासरती । भाऊ यशवंतराव बहादर ऐकून ध्याया ह्या कीर्ति । दोन लाख फौजेचा जमाव दों वर्षांमधिं ध्या गणती । बनकस कंपू पठाण कडिये फौजेमधिं नित्य झडती । मान भिडावून देति लढावुन टोपीवाले नाहीं गणती । नागोपंत सरदार शिपाई अनेक उमराव हे बहिरी ॥ सुभे० ॥ १ ॥

शहर पुण्याशीं यावें ऐसा विचार ठरला फौजेचा । दरकूच घेउनि अघाडी मुकाम केला फलटणचा । मागून दुसरा गोलपठाणशाह आमदखान मीरखानचा । मार्गीं येतां लढाई संग्राम झाला टोपीवाल्याचा । उद्यां लढाई दुसरी नेमिली आला हलकारा लष्करचा । खाशासुद्धां करुनि तयारी मुकाम केला जेजूरिचा । किं मल्हाराचें दर्शन घ्यावें मग निर्दाळावे वैरी ॥ सुभे० ॥ २ ॥

सोमवारच्या दिवशीं प्रातःकाळीं लढाई नेमिली । फत्तेसिंगमानी यांणीं तलख लिहून पाठविली । अशी लढाई करा म्हणावें मागें मोहरें नाहीं जाहली । टोपीवाले फार हरामी त्यांनीं बहु धुंद केली । सवाई यशवंतराव जाऊन अंगें तरवार चमकाविली ।

दोन लाख फौजेमधिं जाऊन कणसापरि कत्तल केली । तमाम कंपू पळ सुटला चहूंकडे गेले हो पेंढारी ॥ सुभे० ॥ ३ ॥

सवाई मल्हार ऐका गर्दी झाली त्यावरती । बेफाम होते परंतु भली केली सरतांसरती । सवाई यशवंतराव बहादर ऐकून घ्याव्या या कीर्ति । दोन लाख फौजेचा जमाव दोप्रहारांमाधिं घ्या गणति । बंक कंपु पठाण कडवे फौजेमाधिं नित्य झडती । मान भिडावून देती लुढावून टोपीवाले नाहीं गणती । फत्तेसिंग मान्या कुलअखत्यारी ऐकुनि घ्या या शूर मूर्ति । नागोपंत सरदार शिपाई अनेक उमराव हे बहिरी । जसा कृष्ण अवतार मुरारी गोपिकांवर कृपा करी ॥ सुभे० ॥ ४ ॥

सुभेदार महाराज प्रतापी नामें ऐक एक मोहोरा । कारभारी ऐकुनि घ्यावे हरनाथाचा कुलकल्ला । शहर पुण्याची नाकेबंदी वागुं देईना पसारा । खाटमार मोठा कठिण नाहीं कुठें ऐकिली तऱ्हा । मार देडानि खंडण्या घेतो चौमुलखामधिं दरारा । वडिला वडिलीं पुरुषार्थ महिमा सवाई यशवंतराव जुरा । आनंदफंदीचे छंद ऐकतां लढाई झाली ही सारी । सुभेदार यशवंत कन्हया सदा फत्ते करी तलवारी । सवाई यशवंतराव होळकर प्रसन्न मल्हारी हस्त शिरीं ॥ सुभे० ॥५ ॥

## पोंवाडा ६.

### ( फत्तेसिंग गायकवाडाचा )

पुण्यांत बाजीराय बडोद्यांत फत्तेसिंग महाराज । उदार स्वामी सेवक त्यांना कर्णाची उपमा साज ॥ ध्रु० ॥ इकडे अमृतराय वडील । तिकडेही आनंदराय दादा । इकडे प्रभु बाजीराय । ति-

कडे फत्तेसिंग साहेब जादा । इकडे आप्पासाहेब तिकडे महाराज सयाजी उमदा । इकडे पांच चार वाडे । तिकडेही तसाच महाल जुदा । इकडे स्वामी चाकरीस पलटणें । तिकडे सेवक इंग्रज । उदार स्वामी सेवक त्यांना० ॥ १ ॥ इकडे स्वार शिपाई । तिकडेहि तसेंच थोडे बहुत । इकडे श्रावणमासीं दक्षिणा । तिकडेही धर्म होत । इकडे आल्या गेल्याचा आदर करितात यथास्थित श्रीमंत । तिकडेहीं जो आला गुणिजन तो नाहीं गेला रिक्तहस्त । इकडे पेशवे । तिकडे गायकवाड उभयता शिरताज । उदार स्वामी सेवक त्यांना० ॥ २ ॥ इकडे भरगच्ची पांघरुणें । तिकडेही याहुन चढी । इकडे अन्नशांतीचा तडाखा तिकडेही चालू खिचडी । इकडे आदितवार बुधवार । तिकडेही मांडवीत घडमोडी । इकडे मुळामुठा । तिकडे विश्वामित्रा जोडी जोडी । इकडे तलाव पर्वतीचा । तिकडे सुरसागर नांव गाज । उदार स्वामी सेवक त्याना० ॥ ३ ॥ इकडे भूमीवर अंथरुण । तिकडे रेतीमुळें घरोघर खाटा । इकडे पैका पुष्कळ । तिकडेही सुवर्णाच्या लाटा । इकडे जुना वाडा । तिकडे लहरीपुऱ्याचा बोभाटा । इकडे पुरण वरण । तिकडे चुरमा क्वचित् वरंटा पाटा । इकडे पैठणी लफ्फे । तिकडे उशा जवळ अमदाबाज । उदार स्वामी० ॥ ४ ॥ इकडे हत्ती घोडे पालख्या । तिकडेही कमती नाहीं । इकडे रावबाजी तिकडे फत्तेसिंगाची दाहीदुराई । इकडे जोगेश्वरी । तिकडेही दैवत बेचरायी । इकडे देवस्थान । तिकडेही तशीच सांगूं काई । इकडे लोक दक्षणी । तिकडे गुजराथी न्यारी[1] मिजाज[2] । उदार स्वामी सेवक त्यांना० ॥ ५ ॥ इकडे उत्साह गण-

१ वेगळी. २ तऱ्हा.

पतिचा । तिकडे तशीच चंपाषष्ठी । इकडे हारदासाच्या विदाग्या । तिकडे तशाच भरमुष्टी । इकडे मेघडंबरी । तिकडे तशीच पहा जा दृष्टी । इकडे ओंकारेश्वर । तिकडे मुक्तेश्वर नवीच सृष्टी । इकडे दिग्गज पाहिलवान । तिकडे जेठी कुस्ती रोज । उदार स्वामी सेवक त्याना कर्णाची उपमा साज ॥ ६ ॥ इकडे नानाफडणीस । तिकडे शिताराम दिवाण गाजी । इकडे पंत सदाशिव । तिकडे शास्त्री गंगाधर दाजी । इकडे बागमळे । तिकडे हर जिन्नस शाखभाजी । इकडे माती । तिकडे रेती हारफेर जमिनी माजी । इकडे हौद पाण्याचे तिकडे कुव्यावर मोठी मौज । उदार स्वामी सेवक त्यांना० ॥ ७ ॥ इकडे रावबाजी पंढरीस । आषाढी यात्रेस जातात । तिकडे विसा कोसांवर डाकुरजी पंढरीनाथ । इकडे गंगा जवळ, तिकडेही तसेंच, रेवातीर्थ । इकडे तसेंच, तिकडे घटाव दोन्ही कडला यथार्थ । इकडे कडेतोडेवाले तिकडेही तशीच लहज । इकडे अनंदफंदी, तिकडेही जाऊनि आला सहच । उदारस्वामी सेवक त्यांना कर्णाची उपमा ॥ साज ॥ ८ ॥

# पोंवाडा ७.

## ( महेश्वर शहरावर. )

नाहीं पाहिलें पारखें महेश्वर क्षेत्रपुर ॥ धृ० ॥

नर्मदा निकट तट घाट । बहुत अफाट । पायऱ्या दाट । चिरेबाट । मुक्तांचीं शिवालयें । कैलास साम्यता नानापरिची रचना रचिली । रामकृष्ण मंदिर । बहुत सुंदरें । बांधिलीं घरें । रमे रमणूक हवेल्या । नयनीं पाहिल्या । नूतन थाट । प्रताप अहिल्या ।

किल्यावर तळवटी । शहर गुल्जार । बहुत बाजार हारज । दुकानें लक्षापति सावकार । भारी भारी माल खजीना रस्ता खस्ता सुकाळ नाहीं दुकाळ बाल वृद्ध प्रतिपाल करीती । गरिब गुरिब कंगाल गांजले । अडले भिडले । त्या देखुनियां अन्नछत्र सरी सारखे । नाहिं पाहिलें नयनिं पारखे । महेश्वर क्षेत्र पूर ॥ ॥ १ ॥ दानधर्म करी नित्य शिवार्चन । सत्वशील ऐकुनी धांवती । देशोदेशींचे कर्नाटक । तैलंग द्रावीड । वऱ्हाड कऱ्हाड । कोल्हापूर, कृष्णातीर, गंगातीर । कोंकण काशीकर । गयावळ, माळवे बिरांगडे येती कावडे, वेडे बागडे । गुजराथी मैथुलीपुरी । भारती दिगंबर जटाधारी । बैरागी योगी कानफाडे दर्शना येती । हरिदासाचे प्रेमळ भक्त सांप्रदाय पुष्कळ पाहिले नयनीं । सर्व महेश्वर क्षेत्रपूर ॥ २ ॥

# पोंवाडा ८.

## ( चिंतामणराव आपासाहेब पटवर्धन सांगलीकर. )

वसविली सांगली । चिंतामणरायें चांगली ॥ ध्रु० ॥ सर्वांचा मुकुटमणी । मुख्य पटवर्धन चिंतामणि । कर्ममार्गामाजी सुलक्षणी । सर्व यजमानची मनास आणी । वचन जें निघेल तोंडातुनि । करावें मान्य सर्वत्रांनीं । दौलतीचा खांब मुख्य स्थानी । आज्ञा त्याची कोण न मानी । किल्ला सांगली राजधानी । प्रजा उभी जोडूनी द्वयपाणी । ज्याला जितुकें पाजतिल पाणी । त्याला पिणें प्राप्त मुक्यानी । लौकिक त्याचा जगत्र वानी । शिपाई मूळचे पुण्यप्राणी । गजानन ज्याचा पक्ष धरोनि । करीत संरक्षण संतोष मानी । कानीं नित्य पडावें गानीं । गायन करिती महा महा

गुणी । विणे पखवाज कितीक कोण गणी । कुशल ज्या त्या मम-तेशील धनी । न लागे जेथें किंचित पाणी । तेथें प्रभु यत्किंचित खणी । पाणीच पाणी रानोरानीं । किल्ल्याची कीर्ति जग वाखाणी । चुंबित गगन मनोरे गगनीं । कोटांत कोट बाहेरूनि । सभोंता खंदक मग रेवणी । वेष्टिला वरूनि चिर्ल्हारीनीं । चहूंकडे कीर्ति फांकली । वसविली सांगली ॥ १ ॥

भक्ति गजाननाची भारी । तो मोरेश्वर देतो उभारी । चिंतामणी सर्वांला तारी । जेथें बिघडेल तेथें सवारी । चिंतामणीची चिंता वारी । धर्मिष्ठ अधर्मास धिःकारी । पटवर्धन जाणती संसारी । घालिती उड्याच जैशा घारी । फत्ते केल्याविण माघारीं । उलटो-नयेची मारी मारी । ह्मणावें हेंच मनांत खुमारी । ऐसे थोडे पुरुष अवतारी । वडिला वडिलीं नामधारी । सप्त पिढ्या लौकिक उद्धारी । वृत्ति धर्मा जागली । वसविली ॥ २ ॥

खेरीज बाहेर पुरे । वसविले एकाहून एक सरे । बंदोबस्ती गस्ती पाहारे । लोक सुखवस्ती बांधूनि घरें । राहती स्वस्थ नांद-ती बरें । कौल सर्वांला ताकीद फिरे । धन्याची आज्ञा नांदा कीरे । शिवालय देवालय सुंदरे । घाट बांधूनिया कृष्णातिरें । आंत भरचक्का चुनारचिरे । कृपा केली श्री मोरेश्वरें । पुण्य सामुग्री भागली । वसविली सांगली० ॥ ३ ॥

शेंकडो चारी दुकानदार । जोहोरी बोहोरी शेटे सावकार । रुमालीं रस्ते बांधुन चार । बनविला बाग चांगला फार । आंत मां-डव द्राक्षांचे गार । सुरूची झाडें मनोहर । फुलें हरजिनशी अप-रंपार । पाचद्वणा मरवा कचनार । गुलाब चमेली गुले अनार । मोतिया मोगऱ्यांचे हार । सोनचाफे मकरंद बाहार । गणित

करतांना वाटेल फार । ह्मणूनि सांगितले सारासार । आंत उमराव जुने सरदार । अश्वरथ गाड्या कुंजर बहार । पालख्या शिवाय घोडेस्वार । तलावे देती चक्राकार । दुपेटे शेले भरीजरतार । एकापरीस एक दवलतदार । भले लोक संग्रही धनदार । पुण्य त्या चिंतामणीचें सारें । मुख्य सर्वांला तोच आधार । दान धर्माला बहुत उदार । आल्या गेल्याचा आधीं सत्कार । कल्पना बुद्धीचे भांडार । न लागे ज्याचा अंतनापार । पाहिलें हें एक राजद्वार । विवेकी विचार सारासार । कविता अनंतफंदी करी । ताल सुर नमुदा लागली । वसविलें सांगली० ॥ ४ ॥

# पोंवाडा ९.

## ( बाळासाहेब पटवर्धन मिरजकर )

प्रतापी बाळासाहेब पुण्यश्लोक मुखी सर्वत्रांच्या । हेंचि ऐकण्यांत आले बहुधा कानीं प्राणिमात्रांच्या ॥ ध्रु० ॥

मोठ्या परि मोठ्याशीं भाषणें लहान्याशीं बोलुन बरें । जिंकून बसविले तिकून साजिरे अष्टपैल चौकून चिरे । दयावंत बुद्धिवंत चतुर साधारण वचनाचे खरे । रयतेचे कनवाळु सभोंतें गजाननाचें चक्र फिरे । आल्याचा सत्कार करिती भेटी घेती सत्पात्राच्या ॥ प्रतापी० ॥ १ ॥

सभोंताला खंदक किल्ल्यामधेंच उंट घोडे हत्ती । झडत असे चवघडा पदरचे भले लोक त्यांतच राहती । बागबगीचे नानापरीचे हवा लहान मोठे पाहती । शिवाय आणखी घाट बांधिला दक्षिणेस कृष्णा वाहती । लोकवस्तीची कीर्ति वाखाणती गोविंदपुत्राच्या ॥ प्रतापी० ॥ २ ॥

मुख्य दैवत समनामिर दैवत जागृत वस्तीचा वाली । तेथें उपद्रव होऊं न शके पीर मिरजेचा रखवाली ! तशांत शूर पटवर्धन बांके कीर्ति जघन्यांत झाली । भयाभीत जो होऊनि आला त्याला पाठीशी घाली । तृणप्राय परशत्रु जैसा उभ्या बाहुल्या चित्राच्या ।। प्रतापी ।। ३ ।।

वस्ती अतिगुलजार फार बाजार भरे बृहस्पतवारी । शनवारामध्यें चौक तेथें जोहारी बोहरी । व्यापारी राफाचारी तमाम इमाम रस्त्या शेजारीं । उदमाची वडामोड होतसे वजाब पट्टेकझारी । अनंदफंदीचे छंद लखमा जशा जिव्हारीं शत्रूच्या ।। प्रतापी० ।। ४ ।।

## ठाकूरजी. १

देव द्वारकेहुनि आले भक्तिस्तव डाकुरास हो ठाकुरजी । गदा पद्म शंख चक्र हातीं उभे चतुर्भुज ठाकुरजी ।। ध्रुव ।।

काळि गंडिका शिळा चक्रांकित आंत शुभ्र प्रतिबिंब दिसे । गळां शुभ्र मोत्यांच्या माळा टिळा केशरी गंध खासें । मकरकुंडलें कानिं झळाळित कमि कोठें तिळतुल्य नसे । अधिंच सुंदर शाम तयावर जडाव शुभ्रकार दिसे । तऱ्हेतऱ्हेचे मुगुट मंदिल शिरपेंच तुऱ्यावरती मर्जी । हार तुरे शोभती फुलांचे तुळशी वाहति पायावरजी । देव द्वारकेहुनि आले भक्तिस्तव डाकुरास हो ठाकुरजी । गदा पद्म शंख चक्र हातिं उभे चतुर्भुज ठाकुरजी ।। देवद्वार० ।। १ ।। पद कर कोमल शाम छबेला राम बघुनि इच्छा पुरली । नासिकाकडे मुक्ताफळहे कडीं सांखळ्या करीं मुरली । दोहिं बाजुला उभे सनक सनकादिक शोभा मनिं फारच भरली । वाटे जशी पंढरीच दुसरी समस्त ताहन-

मुक हरली । विटेवरिल जें ध्यान तीचि ठाकुरास मुर्ति मनोहर जी । देव द्वारकेहुनि० ॥ २ ॥ साकर लोणी प्रियकर ठाकुरनाथाला मोठी भक्ती । कोट्यावधि पैका जन देती जशी जशी ज्याची शक्ती । चित्रें सभामंडपांत एका पेक्षां एक काढिली युक्ती । रंगाची बहु बहार केली रम्य स्थळ जागा मुक्ती । सभवतें पटांगण सन्मुख साधु संत करती प्रेमें अर्जी । जशी ज्याची भावना तसा देव कृपा करिल त्यावरजी ॥ देव द्वारकेहुनि० ॥ ३ ॥ भांडरघर निद्रास्थळ आरसे महाल रुप्याचा झोंपाळा । याशिवाय जामदारखाना ! घरा विलासी गोपाळा । रुक्मिणीचें वेगळेंच मंदिर तिला ठेउनी पूर्वस्थळा । हत्ती घोडे पालख्या छबिना चौघडा ठाऊक सकळाला । ध्यान बहुत सुंदर देवाचें महात्म्य वर्णू कुठवरजी । जी उपमा द्यावी तुम्हाला ती शोभे मुरलि मनोहर जी । देव द्वारकेहुनि० ॥ ४ ॥ पश्चिमेकडे मुख देवाचें भोळ्या भक्ताला राजी । तीर्थ गोमती सरोवर भोंवती तरुवर गिरिवर त्या माजी । नित्य कथाकीर्तनें सरिसर्वत्रा अमृत पाजी । शिरादेवाला फार आवडतो नको त्याला पालाभाजी । ज्यावरि ठाकुरनाथ कृपा करि त्याला दुसरा कोण वर्जी । फंदी ह्मणे काय उशीर त्याला प्यादे चाकर करतिल फर्जी । देवद्वारकेहून आले भक्तीस्तव ठाकुरासही ठाकुरजी । गदा पद्म शंखचक्र हातीं उभे चतुर्भुज ठाकुरजी ॥ ५ ॥

## अक्रूर २.

अक्रुरा गोपी आक्रंदती हरिप्रति ठेवा । मथुरेशीं नको नेऊं पहारे मथुरेशीं नको नेऊं आमचा प्राणविसांवा ॥ धृ० ॥ येऊन गोकुळीं अवतरला दीनबंधु । तेपासुनि अवघे आनंदले गोपबंधू

त्रैलोक्यामाजी दुमदुमिला आनंदू । हें क्षीर सागरिचें निधान ब्रह्मानंदू । हा भक्तांना कनवाळू गोकुळाबाई । अक्रुरा याविना गोपी धृजराष्ट्र न दिसे कांहीं । मथुरेशीं कसा नेतां समुद्र जावाई । या हरिवांचुनि आम्ही मृत्यु पावलों लवलाही । हा पुतनारी घन-नीळ हत्तीचा छावा । आमचा प्राणविसांवा ॥ १ ॥ मथुरेशीं कंस कसा रिपु निर्मिला हरिच्े साठीं । धाडिलें तुम्हातें आणावया जग-जेठी । अक्रूर पण तुम्ही क्रूर भासतां पोटीं । निष्ठुर हा तुमच्या हृदयीं विषाच्या गोटी । आधीं समस्त गोपींचे प्राण वधावे । मग स्वस्तिक्षेम मथुरेशीं हरीला न्यावें । हरि गेल्यावर राहुन आम्ही काय करावें । म्हणुनि स्वहस्तें आम्हाशीं मारुनि जावें । या मुरारीचा दचका प्राणाशीं नसावा । आमुचा प्राण० ॥ २ ॥ अक्रूर म्हणे पुरुषोत्तम सर्वा ठायीं । भरुनि उरलासे तुम्हाशीं ठावा नाहीं । हा जळिं काष्ठीं पाषाणीं शेषशायी । कंसालागी हरी हा वधील एके घाई । ही तुम्हास भासती याची लहान पराई । परि हा प्रळयाग्नि कैक बांधिल पायीं । हा सर्वांचा देह असुनि विदेही । गोपीहो तुह्माला भ्रांत पडली एव्हां । आमचा प्राण० ॥ ३ ॥ अक्रुरा तुह्मि इतुकें बोललां असत्य । कळलें ये समयीं तूं कंसाचा भृत्य । वचनें ऐकुनी गोपी चित्तीं वनवास जाला । अक्रुरा काननीं कसें मोकालिलें गोपिकांला । जननी मृत्तिका फा-किती प्रयळ झाला । मालणी कैक प्राशिती विषाचा प्याला । फंदि अनंत म्हणे हृदयीं हरि वसवा । आमचा प्राणविसांवा । मथुरेशीं नको नेऊं अक्रुरा पहा रे मथुरेशीं नको नेऊं आमुचा प्राण-विसांवा ॥ ४ ॥

---

## चंद्रावळ. ३

नट धीट अचाट राही नटला सारंगपाणी । पतिव्रता चंद्रावळ भोगिली त्या भगवंतांनीं ।। ध्रु० ।। अप्रतीम चंद्रावळ पाहून भुलले वनमाळी । तिचा नेम असा कीं सूर्य टळेल एक वेळीं । परि ती सत्कर्माशीं न टळे, कुकर्मा वेगळी । राहीची धाकुटी वहिण ऐका चंद्रावळी ।। चाल ।। फुल सव्वाशेर भार वजन चंद्रावळ । मृगनयना एक एक डोळा दिसे चंचळ । कुच उरीं हालती दोन्ही मुक्ताफळ । अंगीं वीर्य जसें कुपींतील जल निर्मळ । हृदयावर जोबन दोन्ही हालती कमळ । वेणींत केवडा सुगंध परिमळ । गोरी भुरकी गाला वरता हिरवा तीळ । मंजूळ शब्द जाशि टाहो करिति कोयाळ । कंठांतुन पिक दिसे अशी वेल्हाळ । नार कळसूत्र दिसे बाहुली । नाशीक चोंच राव्याची देह कोमळ । भर सव्वाशेर वजन चंद्रावळ । नार फारच हलकी जसें तुंबिनीफळ । हा तिचा नेम कीं राहावें निर्मळ । काय सूर्य टळेल नेमाशीं एक वेळ । परि ती न टळे ऐशी चंद्रावळ । त्या चंद्रावळीचा नेम असा असेल । त्या नगरामधीं स्वतां हरी शिन्नळ । चंद्रावळ पाहतां न पडे त्याशीं कळ । तेव्हां भगवंतानीं तिथें मांडिला खेळ । राहींचें रूप मग नटले तमाळनिळ । अलंकार अंगावर घालुनि तेव्हां भगवंतांनीं । राही झाले भगवान अलंकाराची मांडणी । नट धीट अचाट० ।। १ ।। तेव्हां राहींचें रूप नटले ऐका हृषिकेशी । अलंकार अंगावर घालुनि तेव्हां त्या समयाशीं । जडिताचा शृंगार कोंदणें हिरे जिनसा जिनसी । राही काय त्या पुढें किं नटला श्रीरंगा ऐशी ।। चाल ।। राहीचें रूप मग नटला मुरलीधर । घालूनि मूद राखडी राव माथ्यावर ।

तिपेड गंगावन वेणी गुंफी पदर । मस्तकीं विजवरा माथ्यावर मासा वोर । नाकामधीं नथ सरज्याची वर विल्लोर । मोत्यांनीं भरला भांग बहुत सुंदर । कर्णफूल शिसफुल तानवडा वर चौफेर । वेल्या, बुगड्या, काप पडे प्रकाश गालावर । कानीं धेंड्या आणिक वेलबाळ्या मोत्याचे सर । पानबाळ्या तिथें मासबाळ्या मारी लहर । नालबाळ्या अबदागीरबाळ्या तर्कधर । खुंटबाळ्या साध्याबाळ्या त्याजवर । मोतीबाळ्या दाळिंबीबाळ्या त्या गंभीर । बोंडबाळ्या कोथिंबिरीबाळ्या बहुत सुंदर । चंद्रबाळ्या आणिक चिंचबाळ्या त्याजवर । घोसबाळ्या पर्डीच्या बाळ्या त्याली सुंदर । झुबुकबाळ्या मखमालीबाळ्या तानोड्यावर । खिरणीबाळ्या पोवळ्याच्या बाळ्या तर्कधर । हिरी बाळ्या कंगणीबाळ्या मनोहर । नागबाळ्या फणिंद्रीबाळ्या हातीं हातसर । मुदबाळ्या पठाडीबाळ्या नथेवर मोर । हौदीबाळ्या पतंगीबाळ्या तुटती तार । कुड्डबाळ्या मंडवीबाळ्या चाले छबीदार । फुलबाळ्या बत्तिसा बाळ्यांचा प्रकार । कानीं कुडुक ते बहू दिसती सुंदर । ताईतपेटी दुलडी सात पदर । पुतळ्यांची बोरांची जवाची माळ नवसर हार । दंडी बाजुबंद गजरानें भरला कर । गुजराथी कांकणें अंगुस्तान न जाहंगिर । रत्नजडित पाटल्या पवच्या मनोहर । दंडी वेळा वाकड्या गुजऱ्याचा झणत्कार । बसविले नागिना मंगलसूत्रावर । एकदाण्याची खरबुजी तऱ्हा सादर । चितांग चिंचपेट्या मारी लहर सुंदर । अणवट बिचवे विरोद्या वरति स्थापिलें मोर । हातिं मोतीसर वाक्या साकळ्या घालुनियां चरणीं । राही झाले भगवंत शृंगार झाला येथुनी । नट धीट अचाट० ॥ २ ॥ चंद्रावळीघरीं गेले श्रीहरि राहीरूप धरून । परिचारिका सांगती आली बाई

तुमची वहिण । दिला बसाया पाट ऐका त्या चंद्रावळिनं । चंद्रावळ म्हणे बाई आज तुझें कोणीकडे येणें । चाल । राही म्हणे आजग बाई उदासलें मन । म्यां म्हटलें आज यावें बहिणीला भेटून । तेव्हां चंद्रावळ पाहे जरा तिजकडे न्याहाळून । बाई तुझ्या उरावर कांगे दिसेना स्तन । तुझी पुरुषाची आकृति दिसती जाण । तेव्हां उराकडे पाहे अवचित नारायण । तेवढीच कळा विसरला मधुसूदन । ह्मणे आतां सोंग हें न्यावें संपादुन । पुसूं नको ग सखये माझें दुःख मी जाणें । भाल्याची जखम काय होतें तुला सांगुन । एके दिवशीं सत्यभामा मनमोहन । दोघे निजलेग मजला खोलिमधें कोंडुन । त्या काळजीनें हा जीव गेला करपुन । पुसूं नको ग गवळ्या घरिं कष्टाची धन । चंद्रावळ म्हणे बाई आतां तुला न्हाणिन । मी न्हाइना बाई खुण केली वेणिला त्यानं । श्रीकृष्णाची कदर फार दारूण । आतां तुलाच न्हाणिन मग मी घरां जाइन । आतां भ्रतार येईल तुझा बाहेरून । तो थट्टा करील माझी मेव्हणीच्या नात्यानं । तेव्हां ठेवी चुलीवर गुंड पाण्याचा राही तत्क्षणीं । असे हरीचे खेळदेव मग चंद्रावळ न्हाणी । नट धीट अचाट राही० ॥ ३ ॥ राही म्हणे चंद्रावळी उठ बाई मग करीं स्नान । पितांबर परिधान चंद्रावळ ठेवी फेडून । चौरंगावर उभी ठाकली चंद्रावळ नग्न । राही गंगाळयांत पाणी घाली त्या हंड्यांतून । चाल । राही घाली ऊन पाणी चंद्रावळीवर दाटून । चंद्रावळ म्हणे बाई पाणी फारच ऊन । उन पाणी बरें त्यानें जाइल तुझा शीण । ऐसें चंद्रावळिशीं न्हाणिलें राहीनं । त्या चंद्रावळिचा पति आला बाहेरून । त्यानें राही पाहिली करि मग हास्यवदन । आज कोणिकडेग मेहुणि

केलें येणं । म्हणे उगीच आलें इला भेटाया कारणं । तेव्हां चंद्रावळिनें स्वयंपाक करून । ह्या पुऱ्या पोळ्या घावण्या तेथें काय उणें । तेलच्या आणिक फेण्या गुरोळ्या जाण । आणिक बुंदीचे लाडू वाढी युक्तीनं । केशरी भात वर केळाचें शिखरण । लोणकढें तूप आणाविलें मागून तिनें ।भोजन करितां पति चंद्रावाळिचा म्हणे । तुम्ही दोघी बहिणी निजा महालिं जाउन । आज आम्ही एकटे निजूं बाहेर जाऊन । तेव्हां पतिला तोशक दिला दारिं अंथरून । राही आणि चंद्रावळी दोघी गेल्या निजभुवनीं । नट धीट अचाट राही नटला ॥ ४ ॥ बंगल्यामधिं अरास केली त्या चंद्रावाळिनं । अबिर बुका सुवास आणिला राही कारणं । पलंग तिवाशा लोड जंबुखा टाकून । बहुता दिवशीं राही बाहिण आली म्हणुन । चौफुला ठेवुन मधीं पानपुडा आणविला । चहूंभोर्ती समया माधिं कांदिल लाविला । राही म्हणे दिव्यानें झोंप येईना मला । त्या जंद्रावळीनें दिप विझवुन अंधार केला । तेव्हां निद्रा आली त्या चंद्रावाळिला । अंगाशीं अंग लागतां देव चंचळ झाला । धरि हळू स्तनाला मुखचुंबन रगडिला । जागी झाली चंद्रावळ हरि ऐसा भासला । अरे पाप्या दुष्टा भंग तपाचा केला । एक वेळ मीं हांसत होतें चंद्राला । मी पतिव्रता त्वां कसा डाग लाविला । जर अशी गोष्ट ही सांगावी भ्रताराला । तो म्हणेल स्त्रीचा पुरुष कैसा झाला । दोहिंकडून आड ना विहीर झाली मला । तेव्हां हरी ह्मणे इला नवल काय दाखवावें नयनीं । अकस्मात दिवे लाविले तिच्या निजभुवनीं । नट धीट अचाट राही नटला सारंगपाणी ॥ ॥ ५ ॥ विष्णुदुताला आज्ञा केली पहा भगवंतानं । स्वर्गाहुन विमान आणिलें तत्क्षणीं जाण । देवानें चंद्रावळ विमानांत बसवून

एकवीस स्वर्गे चंद्रावळिला दाखविलीं जाण । श्रीहरीनें चंद्रावळ नेली मोक्षपदाशीं । सृष्टीची घडमोड यमपुरी दाखवी तिशीं । सदाशिव दाखविला कैलासासीं । खालीं उतरुनिया आणिली समुद्रापाशीं । खांबाची द्वारका दाखवीं चंद्रावळिसीं । तेव्हां देव ठसला त्या चंद्रावाळिसीं । घाली लोटांगण तेव्हां हरिचरणाशीं । नाहिं झाला भोग तुम्ही फेडून घ्या असोशी । देवानें आड धरिलें सुदर्शनासीं । केलि सहा महिन्याची रात्र त्या समयासीं प्रीतिनें भोगिलें दिलें अलिंगन तिशीं । चंद्रावळ म्हणे देवा नको अंतर देऊं मशीं । तेव्हां देव बोलला त्या चंद्रावाळिशीं । जेव्हां स्मरशिल तेव्हां आहें तुजपाशीं । फंदिमलिकचा ठिकाण पोखरिशी । करि अभंग लावण्या धाक पडे वैऱ्याशीं । फंदि अनंतची लपेट झपेट ही विकट बिकट धरणी । रतिरती समजुन कसली पहा ब्राह्मण राणी । नट धीट अचाट राही नटला सारंगपाणी ॥ ६ ॥

---

## लावणी ४.

( संध्येंतील चोवीस नामांवर. )

अनंतभगवंताचीं नामें त्यांतूनि हीं उत्तम । गाइल्या उद्धरती आधम ॥ धु० ॥ केशवकरणी अघटित लीला नारायण तो कसा । जयाचा सकल जनावर ठसा । माधवमहिमा अगाध गोडी गोविंदाचे रसा । पीत जा देह होइल थंडसा । विष्णु स्मरतां विकल्प जातां मधु-सुदनानें कसा । काढिला मंथन समयीं जसा । वेष धरुनि कापट्य मोहिनी भाग करि निमेनिम । गाइल्या उद्धरती अधम ॥

---

१ कथामृतास. २ दुर्वासना. ३ पातकी.

अनंत भगवंताचीं नामें त्यांतुनि हीं उत्तम । गाइल्या उद्धरती अधम ॥ १ ॥ त्रिविक्रमान त्रितांप हरिले भक्तांचे सर्वहि । वामनें दान घेतली मही । श्रीधरसत्ता असंख्य हरितां दुष्टांचे गर्वहीं । वंदिल्या हृषिकेशाच्या रेंही । पद्मनाभ धरियेले तेथुनी देव झाले ब्रह्महीं । दामोदरें चोरिलें दहीं । गाती मुनिजन नारद तुंबर वसिष्ठादि गौतम । गाइल्या उद्धरती अधम ॥ अनंत भगवंताचीं नामें ॥ २ ॥ संकर्षण स्मरतांना षड्रिपु नाशातें पावती । स्मरारे वासुदेवाप्रती । प्रद्युम्नाचा कारितां धांवा गजेंद्र मोक्षागती अनिरुद्ध न वर्णवे स्तुति । क्षीरसागरिंचें निधान पुरुषोत्तम हा लक्ष्मीपती । स्मरारे अधोक्षजातें प्रती । अपार पापें स्मरतां जातीं वाचे पुरुषोत्तम । गाइल्या उद्धरती अधम । अनंत भगवंताचीं ० ॥ ३ ॥ प्रल्हादाचे साठीं नरहरि स्तंभीं जो प्रगटला । अच्युतें कालनाथ मर्दिला । जनार्दनाची अघटित लीला कीर्तनीं ऐकूं चला। उपेंद्रा शरण जाई तो भला । हरिहर स्मरतां त्रिवार वाचादोष सर्व हरियला । गोकुळीं कृष्णनाथ देखिला । रामलक्ष्मण म्हणे तयाच्या नामें गेला भवभ्रम । गाइल्या उद्धरती अधम ॥ अनंत भगवंताचीं नामें त्यांतुनि हीं उत्तम । गाइल्या उद्धरती अधम ॥ अ० ॥ ४ ॥

## उपदेशपर फटका. ९

लंडे गुंडे हिरसे तट्टू ह्यांची संगत धरू नको । नरदेहासी येऊन प्राण्या—दुष्ट वासना धरूं नको ॥ ध्रु० ॥ भंगी चंगी बटकी सटकी ह्यांच्या मेळ्यांत बसूं नको ॥ बिकट वाट वहिवाट

४ कायिक, वाचिक, मानसिक दोष. ५ पायाच्या धुळी. ६ रत्न. ७ संसारसंबंधीं अज्ञानत्व.

नसावी धोपट मार्गा सोडुं नको ॥ संसारामधिं ऐस आपला उगाच भटकत फिरूं नको । चल सालसपण धरुनि निखालस बोला खोट्या बोलुं नको ॥ पर धन पर नार पाहुनि चित्त भ्रमुं हें देऊं नको ॥ अंगीं नम्रता सदां असावी राग कुणावर धरूं नको ॥ नास्तिकपणांत शिरुनि जनाचा बोल आपणा घेऊं नको ॥ भली भलाई कर कांहीं पण अधर्म मार्गीं शिरूं नको ॥ चाल ॥ मायबापावर रुसूं नको ॥ दूर एकला बसूं नको ॥ व्यवहारामधिं फसूं नको ॥ चा० प० ॥ परी उलाढाली भलभलत्या पोटासाठीं करूं नको ॥ लंडे गुंडे० ॥ १ ॥ वर्म कादुनीं शरमायाला उणें कुणाला बोलूं नको । बुडवाया दुसऱ्याचा ठेवा करूनि हेवा झटूं नको । मी मोठा शाहणा धनाढ्यही गर्वभार हा वाहुं नको । एकाहून एक चढी जगामधिं थोरपणाला मिरवुं नको ॥ हिमायतीच्या बळें गरिबगुरिबालां तूं गुरकावुं नको । दो दिवसांची जाइल सत्ता अपेश माथां घेऊं नको । बहुत कर्जबाजारी होउनि बोज आपला दवडुं नको । स्नेह्यासाठीं पदरमोड कर परंतु जामिन होउं नको ॥ चाल ॥ विडा पैजेचा उचलुं नको । उणी तराजू तोलुं नको ॥ गहाण कुणाचें डुलवुं नको ॥ असल्यावर भीक मागूं नको ॥ चा० प० ॥ नसल्यावर सांगणें कशाला गांव तुझा भिड धरूं नको ॥ लंडे गुंडे० ॥ २ ॥ उगीच निंदा स्तुती कुणाची स्वहितासाठीं करूं नको ॥ बरी खुशामत शहाण्याची ही मूर्खाची ती मैत्रि नको ॥ कष्टाची बरि भाजि भाकरी तुप साखरेची चोरि नको ॥ आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढती पाहूं नको ॥ दिली स्थिती देवानें तींतच मानीं सुख कधिं विटूं नको ॥ आपल्या गांठीं धनसंचय कर सत्कार्यीं व्यय

हट्टूं नको ॥ आतां तुजही गोष्ट सांगतों सत्कर्मा ओसरू नको ॥ सत्कीर्ती नौबदीचा डंका गाजे मग शंकाच नको ॥ चाल ॥ सुविचारा कांतरूं नको ॥ सत्संगत अंतरूं नको ॥ द्वैताला अनुसरूं नको ॥ हरिभजना विस्मरूं नको ॥ चा० प० ॥ गावयास अनंतफंदिचे फटके मार्गे सरू नको ॥ लंडे गुंडे० ॥ ३ ॥

## उपदेशपर फटका. ६

येउंदे वाचें नाम देवाचें अष्टौ प्रहरा शिव हर हर हर ॥ धृ० ॥ दे टाकुनि हे छंद वावुगे फंद विषयाची काय मजा ॥ हरिनामाची लावी ध्वजा ॥ असार हा संसार त्यजा ॥ तमोगुणाला देच रजा ॥ रजसत्वाची करी पुजा ॥ क्षमा शांति मनिं धरीत जा ॥ भगवीं वस्त्रें करी पोटभर भिक्षा मार्गें घर घर घर ॥ येउंदे० ॥ १ ॥ परोपकारा शरीर झिजवावें जैसा मैलागिरी चंदन ॥ कर सज्जनचरणी वंदन ॥ सा शत्रूंचें करि कंदन ॥ गृहवैभव वाजी स्यंदन ॥ अशाश्वती ह्या हो धुंदन ॥ आठवी मनीं दशरथनंद न ॥ अनंतफंदी ह्मणे घालीं विठ्ठला गरके गर गर गर ॥ येउंदे० ॥ २ ॥

## उपदेशपर फटका. ७

### ( चाल ) कटाव.

शोध करीरे मना हरि भजनाविण अवघें वृथा ॥ धृ० ॥

हरीभजनीं ठरला । तो यमाजीकडे न धरला । भवासिंधु त्यालाच वसरला । विठाईचीच मिठाई चाला । हृदयांतरी हरी संचरला । त्याच्या मग तो सेवेंचि तरला । यमदुतापासून विसरला । जो पंढरिनाथापासुन विसरला । उत्तम जन्म जरा न घसरला । यमाजीचा प्रयत्न हरला । ज्यांनीं विष्णु हृदयीं धरिला । तो

नभीई अजका सर्वथा । शोध करीरे मना हरि भजनाविण अवघें वृथा ॥ शो० ॥ १ ॥ शाश्वत नाही करुं आजकाल । हरिभजनाविरहित जें शिकाल । तें कामी सर्वस्वें टिकाल । मोक्षाधिकारी व्हालच मुकाल । जितके हरीभजनाला चुकाल । तितके यमाजीकडे धकाल । ते समयीं मग अवघे थकाल । वळकट काढील यमाजी खाल । मग त्यापुढें तुम्ही काय बकाल । हरीच्या भजनीं मन हें विकाल । अनंत जन्म सुजन्य पिकाल । यापरता कैचा निकाल । तुम्ही जाणा गवाजी हाकाल । सांगितलें नाहीं मग चकाल । मग यमाजी बुकाल । कुंदी करील तेव्हां कसें टिकाल । केलें पातक तितकें वकाल । नामामृत घ्या धनवल छकाल । द्या सोडून या भाकडकथा ॥ शोध० ॥ २ ॥ नामस्मरणीं होई चाटुकार । कर भगवज्जनाचा देकार । या कामास न व्हावें चुकार । परंतु सत्य याचा स्विकार । दुर होतील हे नाम विकाल । या गोष्टीचा नसावा नकार । कांही नलगे चकारपकार । फुकटामध्यें नामामृत स्विकार । सांपडल्यास न कीजे [illegible]कार । हातीं आला येवढा अधिकार । हरी हरी फोडित जा तू बर । भगवान करील अंगीकार । सांगितलें तर याचा अंतर । नाहीं तरी माझें जाईल यकार । सत्कर्माची हुंडी स्विकार । फंदी अनंत कारि हे प्रकार । तुज अर्पण दुर कारि भवव्यथा ॥ शोध० ॥ ३ ॥

## उपदेशपर फटका. ८

देसोडुन तरी फंद वाऊगे—विषयाची तरी काय मजा । हरी नामाची लाव ध्वजा । पंढरीस कार्तिकी आषाढी दुवक्ता—येत जातजा । असार हा संसार त्यजा । तमोगुणाते द्यावी रजा । रजसत्वाची करी पुजा । क्षमाशांती मनीं धरीतजा । भगवीं वस्त्रें क-

रुनि पोटभर भिक्षा मागे घर घर घर । येऊंदे वाचे आष्टौप्रहर कीं हर हर हर ॥ १ ॥ वाहते गंगेंत हात धु आलबेली भली भलाई कर मग मर । ईश्वर भजनीं निमग्न राहावें विषयांतरीं वासना नको । नामामृत महासुरपिको । सहाणेवर मैलागिरी चंदन देह झिजो यम यातना चुको न चुको । भवपाशाशीं मुको न मुको । सांगितलें हे शिको न शिको । भजनाकडे झुको न झुको । धनज्याला मृत्तिका तोची साधु, यम कापे थर थर थर ॥ २ ॥ सोदे शिकस्ती चढी लावितील त्यांच्या नादीं न लागावें । ईश्वरभजनीं जागावें । कामक्रोध मद मत्सर मोहो लोभ या साजणांशीं सांगावें । कीं तुम्ही मार्गीं वागावें । असार तितकें नागावें । सार असेल तें घ्यावें । जाणें मोक्ष पदाशीं झर झर झर ॥ ३ ॥ भाव धरुनि मनीं हरीहर । म्हणशील तरी चुकेल चौऱ्याशींचें चक्कर । ईश्वरपाईं हा नीटकर । नरदेह धुतला पवित्रशेला उडून जाईल जसा सकर । दुसरा धंदा कांहीं नकर । धर बळकट देवाचें शिखर त्यामधें राहील तुझा वक्कर । आनंदफंदी म्हणे घाल विठ्ठलाशीं घिरट्या गर गर गर ॥४॥

## उपदेशपर फटका. ९

नरदेहामधिं येऊन नर हो साधन ऐसें करा जेणें भवसागर तरुनि सुखें व्हावें पैलतिरा ॥ ध्रु० ॥ संसारार्णवीं भिजा गड्यानों संसारार्णवीं भिजा । परंतु परमार्थ साधनातें साधा यांतच मजा । परनारीधन त्यजा गड्यांनो परनारी० । मदमत्सर मीपणा सहित घा तमोगुणाला रजा । भाव न ठेवुनि दुजा । गड्यांनो०॥ अकपट होउनि थोर लहाना समदृष्टीनें पूजा । अन्यायपथें न जा ॥ गड्यांनो० ॥ सदसद्विचार करुनी लोकीं सत्कीर्तीनें सजा । कोणा नच घा इजा ॥ गड्यांनो०॥ परि आश्रय दुःखितांस द्याया

तन मन धनें झिजा । संकटसमयीं धजा ॥ गड्यानो० ॥ सत्यवचन राखण्यास न ढळा कथितों ह्या हितगुजा । व्हा सावध नचि निजा ॥ गड्यांनो० ॥ पळ घटका प्रहर दिवस, यांहीं होतें आयुष्य होतें वजा । जगदिशाला भजा ॥ गड्यांनो० ॥ अनंतफंदी म्हणे तोचि मग तारिल देउनि करा ॥ १ ॥ नरदेहामधि० ॥

## शेवटचे बाजीरावाची कारकीर्द.

### उपदेशपर फटका. १०

### ( चाल ) कटाव.

सत्कर्मांचा तोटा । समय खोटारे खोटा ॥ ध्रु० ॥ ब्राम्हणाशीं विगारी धरतात । अविचार मनस्वी करतात । अशा आधारें कसे तरतात । मुलेंमाणसें घेऊन मरतात । वाणी बक्काल घाबरतात । लोक गाईसारखे हुंबरतात । पंढरीनाथ स्मरतात । महार पोरगे घरांत शिरतात । घरधनीच होऊन बसतात । वस्तभाव अवघी भरतात । माल बापाचा बांधिती मोटारे मोटा । सत्कर्मांचा । सम० ॥ १ ॥ धामधुम चहूंकडे गर्दी । पठाण कंपु आरब गार्दी । ज्याला नमिळे भाकर अर्धी । त्याला बसाया घोडी जर्दी । लागून वारा नका घेऊं होईल सर्दी । त्याची बढेजाव आठचारदी । दिवाण दरबारांत गर्दी । दिवस लागू नये फारदी । जेव्हां तिजवर व्हावी गर्दी । तशामधीं होते वरदी । ते पार पडले मरदा मरदी । आवताराच्या दैवी उपद्रव मोठारे मोठा । सत्कर्मांचा तोटा । समय खोटारे खोटा ॥ २ ॥ जो येतो तो हातीं भाला । म्हणे आपणाला जेऊं घाला । कोणी कोणाचा गुरू ना चेला । भलताच बमकावी भलत्याला । चोरदंड तो कोतवालाला । जसा रावणाचा साला । तो हलकाला एकची झाला । पतिव्रता मुकली प्राणाला । शिंदळ

चढली लौकिकाला । सांगत फिरती ज्याला त्याला । एक जातबाई टोपीवाला । मी नाहीं दमलें पंचविसाला । फंदी आनंदाची कविता सवाई सोटारे सोटा । सत्कर्माचा तोटा ॥ समय० ॥ ३ ॥

## दुष्काळ लावणी. ११

उलटादमान आयाजी आया । सेवक स्वामीचें मानिना ॥ ध्रु०॥

जिकडे तिकडे माजले टोळ । दुनियेचें वाटोळें झालें । मुल्ख कुल उजाड हलकल्होळ । आंगावरती चमक्यांची ओळ । घालतील कुठवर हळदी बोळ । राहिना कोठें मकाला ( ? ) डोळा । कालीं भेंड्या वांगिं पडवळें । जसा माल बापाचा वापाचा । बांधिति मोटारे मोटा । सत्कर्माचा तोटा । समय खोटारे खोटा ॥ उलटा० । १ ॥ कालिमाहात्म्य उफराटें । होउं लागलें खऱ्याचें खोटें । खाटमार ऐकिलात कोठें ? । ज्यांला न भरवतीं आपुलीं पोटें । ते जसे मोंगलाचें बेटे । फिरवुनि ठेवितात पागोटें । महार पोरग्याच्या गळ्यांत गाठ्ये । हुर्डा खाउनि बनले बेटे । फार माजले गांटे गोटे । उलटा दमाना आयाजी आया । सेवक स्वामीचें मानिना ॥ २ ॥ धामधूम चोहोंकडेच गर्दी । पठाण कंपु आरब गारदी । जिकडे तिकडे फांसे पारधि । लोक मिळाले महा बेदर्दी । ज्याला मिळेना भाकर अर्धी । त्याला बसाया घोडी जर्दी । त्यासीं बडेजाव आठ चारदिं । सर्वेचि झाली भाऊ गर्दी । तशामधें जे होते दर्दी पार पडले मर्दामर्दी । दुनियेचा फुटाणा झालारे झाला । सेवक स्वामीचें मानीना ॥ ३ ॥ धर बिगारी भलताच धरावा । ब्राह्मण शूद्र शोध न करावा । जेथिल मुक्काम तेथेंच न्यावा । वस्त्रें घेऊन नागवावा । त्याला माघारा बोडका लावावा । त्याला दुसरा शिपाई भेटावा । त्याणेंच पुढें दामटावा । असा अवघि वेळ

यावा जावा । ज्याचा गहूं हरभरा लुटावा । तोच भिगारी पुढें पिटावा । गांवकऱ्यांचा प्राण अटावा । पाटिलबावा पळोनि जावा । गारिब एखादा हातिं लागावा । त्याचे मतें पाटिल बावा । माराखालीं भोत भरावा । खंडणीचा ठराव ठरवावा । त्याचे जिवाला हा प्रळय झालारे झाला ॥ सेवक स्वा० ॥ ४ ॥ हातांत भाला जवं घाला । कोण कुणाचा गुरू ना चेला । भलताच धमकावी भलत्याला । चोर दंडितो कोतवालाला । हा एक दाखला मिळाला । पतिव्रता मुकली प्राणाला । शिनळ चढली लौकिकाला । सांगत फिरते ज्याला त्याला । एक जात टोपीवाला । मीं नाहिं भ्यालें पन्नासांला । अनंदफंदी सांगे जनाला । उलटा दमाना आयाजी आया । सेवक स्वा० ॥ ५ ॥

## दुष्काळ लावणी - १२

उलटा जमाना आलारे । सेवक स्वामींचें मानीना ॥ ध्रु० ॥ जिकडे तिकडे टोळ माजले । दुनियाचें केलें वाटोळें । मुलुख कूल उजाड हलकल्लोळ । आंगावरते चमक्याचे ओळ । कुठवर घालतील हळदी बोळ । जी सांपडली तिलाच घोळ । घरें दारें जाळुनिया कोळ । गरिबा भोंवते माजलेत पोळ । एकामागें एक जैसे लोळ । ईश्वरें पैदा केले ओढाळ । नराहे खोंड्या मका कडोळ । कारलीं भेंड्या वांगीं पडोळ । किती दिवस राहील पाणी गढूळ । ओस परगणा जालारे । उलटा जमाना आलारे । सेवक स्वामी० ॥ १ ॥ कलीमहातम आलें उफराटें । होऊं लागलें खऱ्याचें खोटें । खाटमार ऐकिलात कोठें ? । ज्याला न भरवे आपलें पोटं । ते जैसे मोंगलाचें बेटे । ठेवितात फिरवून पागोटें । महार पोरग्याचे गळ्यांत गेठे । हुरडा खाऊन बनले लेठे । गव्हार जगली जट लंगोटे । त्यांना

आभाळ दोनची बोटें । दे उगेच भलत्याला सोटे । वाटसरू बागेना चाटे । उगेच माजले गाटेगोटे । दुनयेचा फुटाणा केलारे । उलटा जमाना आलारे । सेवक० ॥ २ ॥ घर बिगारी भलताच धरावा । ब्राम्हण शूद्र न ओळखावा । जेथील मुक्काम तेथची न्यावा । वस्त्रं घेऊन नागवावा । माघारें घोडकाची लावावा । तिकडून शिपाई दुसरा यावा । हा त्याला वाटेस भेटावा । परंतु त्याणें तोच दामटावा । परतुनि न्यावा मागल्या गांवां । असा कितीवेळ यावा जावा । ज्याचा गहूं हरबरा लुटावा । तोच बिगारी पुढें पिटावा । गांवकऱ्यांचा प्राण आटावा । कारभारी तो निघून जावा । गरीब एखादा हातीं लागावा । त्याच्या मतें पाटीलबावा । मारा खालीं भोत भरावा । आंगठे धरवाया लावावा । कळेल येवढा धोंडा द्यावा । कोठें पुरलें ? ठिकाणदावा । खंडणीचा ठैराव ठरवावा । महाप्रळय यांना आलारे । फंदी आनंद सांगे जमाना । उलटा जमाना आलारे । सेवक० ॥ ३ ॥

## बाजीराव कारकीर्द. लावणी. १२

दुनयेला तिळमात्र उपद्रव काडी नसावा । उलटा सुलटा आया जमाना आतां कधींचक बसावा ॥ ध्रु० ॥

दुनयेमध्यें लोक बांडे अनर्थ मोठा करतात । शेत कापुनि त्या कुणब्याचें त्याला बिगारी धरतात । वड पिंपळ तोडुनि मोकळे केवढा धर्म आचरतात । घरांत कडबा असला म्हणजे महार पोरआंत शिरतात । हत्ती घोडे उंट बैल खुप सलिदा कसावा । मालधन्यानें उगाच आपला पाहत तमाशा बसावा । घ्या घर तुमचें दुनयेला तिळमात्र उपद्रव काडीमात्र नसावा । उलटा सुलटा आया जमाना आतां कधीं चक्र बसावा । ॥ नल पिंगल दो

संवत्सर हुमजुसकु दुख पैदा । दोदिन घरमे चुप बैठो हाय हुवा-
जी तुमकु बैदा । आपने दिलकी क्या खबर हये तुम कहते बैदा
बैदा । सचे आदमी भुके मरते झुटा खावत हय मैदा । देऊन
दस्ता खांद्या वरता फिरून सोटा धरावा । देख आगाऊ चलना
यारो घेऊन द्याना विसावा । लई शीण झाला । दुनयेला तिळ-
मात्र० ॥ २ ॥ खेर्डी पार्डी भलताच लुटितो कुणव्याचा जीव उदा-
सला । सुपें टोपलीं विगार वाहातां वाहतां बिट्टा वासला । ज्याच्या
घरावर हल्ला तो कुणबी ओझ्यानें त्रासला । चल तेरे जोरूकु चोदु
देऊं धक्का पाडूं पासला । शरिराची अवघी अवस्था भगवंताला
पुसावी । मारी सोटे घेतो झोले बैल भाड्याचा कसावा । चल पळ
मोहरं ॥ ३ ॥ मागें जाणे जोशी सांगत होते राजीक होईल ।
रक्ताचे पूर वाहतील नवी मुद्रा उभी राहील । कुणी कुणाचें नोहे
अति एकंकार होईल । येतील टोपीवाले अशी कांहीं दिवस झुलुक
वाहील । झाले बाजीराव धणी आतां पृथ्वीला आनंद असावा ।
जुने मुत्सदी घरीं वसविले दोन दिवस घ्या विसावा । लई शिण
झाला दुन० ॥ ४ ॥ शिपाई थेसो फर्जी हो गये आपने आपने जगा
मगन । लाल अखिया कहर कहर उसे रह्या दो बोटं गगन । चल
पाटील थोडा जलदी लाव देऊ धक्का पाडूं सदन । चल तेरे जोरुकु
चोदु खडा रहे व क्या होवे अलग । करो खुदाकी बंदगी यारो
उचे मालसे विकावोंगे । फंदी आनंद कहे उलटी दुनया । •किदरसे
शिकशिकावोंगे । मै चुप बैठ० ॥ ५ ॥

## लावणी १४

जमाना आला आला उफराटा । सुन सासूला लावी बट्टा ॥
ध्रृ० ॥ लेक बापाशीं लावी आवभाषी । शिष्य गांजितो गुरूशीं ।

जावाई सासूला म्हणतो तूं काशी । लवंडून देतो मातेशीं ॥ चाल॥ मेहुणीचा चालवी लाड । बहिणीला ह्मणे तूं रांड । चाल निघ घरांतुन द्वाड । तुझी नाहींग मजला चाड । माझी बायकोच मजला गोड । नाहीं सासऱ्याची ठेवली भीड । बेटा लबाड पाहून बापाला लटका धरी ताठा । जमाना आला आला उफराटा ॥ सून० ॥ १ ॥ धन्यावर चाकर झाले फिरवान । उलटून पडले बेइमान । सावकाराशीं कुळ गेलें बदलून । करीती मुदत लबाडीनें ॥ चाल ॥ अशी कलियुगीची रीत । सोय नाहीं दरबारांत । खऱ्याचें खोटें होत । पाटील हकिमाचें मत । कीं बुडवावी रयत । खासदार झाले राऊत । शिपाई हाकिती आऊत । झाले भवानीचे भूत । जोशी झाले पंडीत । भट करी बटकिशीं मोहोबत । दप्तर पडलें सांदींत । आतां तरी पाहे अक्कल धरी भटा । जमाना आला आला उफराटा ॥ सुन० ॥ २ ॥ मारवाड्यानें दुनया नाडली फार । करिती भलताच व्यापार । साळी कोष्टी शिंपी सोनार । हे तो झाले सरदार ॥ चाल ॥ असा कलीचा वारा । गरती जाती परद्वारां । दोहीं कुळीं पाडिती आंधारा । तेलाचा उगा पावशेरां । तुटपुंज्या करितो तोरा । फुगून बसला पीसारा । ताथावर हाणीतील वारा । तोया काळा मधें बरा । फंदी म्हणे अक्कल धरा । उमज गव्हारा । दे कलगीवर सोटा । जमाना आला ० ॥ ३ ॥

## लावणी १९.

पंडित शाहणा आला मना मधीं उलटा सुलटा आला जमाना । पाऊस म्हणतो कर्मेना । धरत्रीनें पीक टाकिलें अंतपारी दिसेना ॥ ध्रु० ॥ दुनयामधिं बंड मातलें जो बळी तो कानपिळी । सुलतानी अस्मानी राव ऐका एकच धुमाळी । मोमणानें मारा

टाकले शिपाई झाले साळीमाळी । ज्या योनीला जन्म घेतला त्याची उद्धरली नाहीं कुळी । आपलें सांडी देवदंडी त्याला पुर्वेला येईना । आप आपल्यामधीं मर्जी ठेविती मोक्षपदाशीं मिळेना । पंडित० ॥ १ ॥ कळावांतर्णाची झाली राळ वटकी झाल्या शिरोमणी । दे साळू वाण्याची घाण केली या मारवाड्यांनीं । गुरवांचें संधान बुडविलें महार या वाजंत्र्यांनीं । पाटीलपांडे घरीं राहिले पट्टी केली कुणब्यांनीं । पहा पासरी कितीक घ्यावी सवा हात खचली धरणी । पाऊस अंतरीं शाहाणा मग तो जाऊन बैसला कोकणीं । बावन हकांचा महार धनी याला पुरविल्या येईना । भोपळ्यामधीं सत्व राहिलें तो पाण्या मध्यें बुडेना । पंडित० ॥ २ ॥ लेक म्हणे बापाला म्हातारा झाला याची शुद्ध गेली । सुन सासुची मर्जी ठेविना फिरून बोलू ती लागली । शिष्य झाले मस्त गुरूची विद्या गुरूवर फिरली । गोरसाला कोणी पुसेना दारू महाग विकू लागली । पतिव्रता ही उपाशी मरती तिला मिळेना सावली । चंचल नार बांधीत असे नवें घर एक दरसाली । ब्राम्हण जोशी लटके यांचा ठोका येईना । आनंदफंदी म्हणे गड्यांनो ऐकुनि घ्यावे सुज्ञाना ॥ ३ ॥

## लावणी १६.

एका राजाला कन्या झाली तिच्या उरावर तीन थान । ती बाईल आंधळ्याची तिथें लाग लाविला कुबड्यानं ॥ ध्रु० ॥ तिथानाची बाईट झाली कोणी करिना मग तिजला । तिला एका आंधळ्याला देऊन आपल्याच गांवामधिं ठिवला । तिला एका कुबड्यानं फितावलं रोज घरामधिं आणि त्याला । कवाड वाजतां आंधळा म्हणे घरामधिं कोण आला । ती म्हणे कुत्रें आलें घरामधिं बाहेर घालितें पिटून । अशी कुबड्याला रोज

आणिती पुढें ऐका त्यांनें कथन । एका० ॥ १ ॥ एके दिवशीं कुबडा बोले तिथानिशीं ऐकतां । कोण येतो म्हून उगाच आंधळा । सारा वेळ लावितो कथा । हा मरता म्हणजे बरें गडे होत तुझा आपला संग बरा होता । कुबड्यानें एक सर्प मारून बाहेरून आणला ताथा । तिथानीचे केला हवाला घाल याला रांधूनशेन । दे आंधळयाला खाया म्हणजे जवळ आलं यांचें मरण । एका० ॥ २ ॥ तेंव्हां तो सर्प चिरूनशेन तवली ठेविली चुलीवर । आंधळयाला शिजवाया बसविलें कुबडा होई तिजवर स्वार । गतका आला तवलिला तेंव्हां तो पाहे कानाच्या सुमार । जहराचा कडका जो बसला आंधळयाचा नेत्रावर । जहराच्या कडक्यानं डोळयांच्या टिकाच गेल्या उडून । पहा उलट्याचं सुलटें झालें त्याला रक्षिता भगवान । एका० ॥ ३ ॥ डोळे उघडून पाहे आंधळा कुबडा आणि तीनथानी । कुबडा वरती खालीं दोहींच्या आंगाचें पाणी पाणी । जळत लांकूड घेऊन झणी आंधळा उठला तत्क्षणीं । कुबड्याला माराया चालला आंधळा आहे त्याचे मनीं । जळत लांकूड उचलून झणी त्यान घातलं कुडवण । कुबड्याचें नीट कुबड झालें तीनथानीचे दोन थान । एका० ॥ ४ ॥ कुबड्याचे छातीचा दणका तीथानीच्या उरावर । बसलं मधलं थान कौतुक करणार पाहतो हरिहर । विपरीत सुपरीत जरी हो झालें त्याला रक्षिता उमावर । आंधळा कुबडा तिथानीचा तिघाचा तुटला घोर । फंदी मलंगचे गांव पोखरी धनवट देशी ठिकाण । अनंतफंदीचे वरून तडाखे विप्राचे मुखचें कथन । एका० ॥ ५ ॥

## लावणी १७.

अपने मेहेल चुपके खडिथी कही गईन आईजी सबा जानके कब-

स्रकात्ति मेरी भूलपडिथी । ध्रु० । बातनके मिठे दिक झुटे प्यार लगाया । अशराफकि अवलाद मेहुं दिन कुटगाया । पहिले तो चैन अपकिरयत खालि जगाया । बादलकी घटा प्रवन छुटिपानि भगाया । मोहवतकी आस उनके पास जादु जडिथी । कहीं गई न० ॥ १ ॥ अलमकु खबर दोस्त जिगरया रखाहे । बंदगीसे गरज कोई न पुछे दामटकाहै । हिंदुकु तिरथ कासी मुसलमीन मक्का है । बेनाकर हकेपाक कहोकितसे लडिथी । कही गईन आई० ॥ २ ॥ दे छोड जिकर कौरे फिकर जान जलाती । हे दुध धरा कहे कब कदामिश्रि कलाति । अबलेटो अगर बैठो चोपालेकु हलाति । धनभाग करम पानि गटम पिहुकु न्हलाती । फंदी फरजंदकी छंद मजालसमे बाडिथी । है मकान संगमनेरनदी पेहर थडिथी । कही० ॥ ३ ॥

## लावणी १८.

बारा बरसका पठा देखो अंगी नयनपर झुरमुर डारी । नयनोंमे कजरा डारादिया पण घटपरथा शिरपर घगरी ॥ ध्रु० ॥ छातीयनपर दोजोबन थोररहे गये जैसे अभर । भिरभिर नयन झुकावत चाल चलत गोरी गज भार । गल मोतनके हार छोमा छिम बिचवनके झनकार । रुमझुम पाऊल बजावत नयनोंकी लग रही मार । करंज फुल कोनोमे चमकत माथा उपर शाल जरी बारा बरबरसका पठा देखो अंगीं नयनपर झुरमुरडारी । नयनोमे कजरा डारादिया पण घटपरथा शिरपर घगरी ॥ १ ॥ लाल भडक गजणीको लहेंगा चंद्रकला उपर पेणी । अरशीयनेक्या चुडा हातमे जैशी रायबगन बनी । झुक झुकाती मिरगा नयनी चाल चलत जैशी हरणी । लुटपुट घुंगट दोनो भवई जैशी कमान मुलतानी ।

छातीपर चोळी तंग भईतप गुजथनकी बनी गुजरी बारा बरसका पठा देखा अंगी नयनपर झुरमुरडारी । नयनोमे कजरा डारादिया पण घटपरथा शिरपर घगरी ॥ २ ॥ छातीयन पर दो जोबन थोर जैसे हातीयनको हावदा । सुरत देख मुजगिरकी अइ बाल बाल दिल हुवा फिदा । दंत दाने दालिंबको माथे पर लाल कुकु जरदा । टिकली मिकली लगादिई तप मुखचंद्रोकी बडी अदा । नाको मे नथणी जैद सरजेकी बडी मदन दस्तीमास बारा बरसका पठा देखे अंगी नयनपर झुरमुर डारी । नयनोमे कजरा डारादिया पण घटपरथा शिरपर घगरी ॥ ३ ॥ काले भवर तेरे बाल नरम दो गाल हरदम मुखडा । छाल छबिली आजब रंगेली मुखमे चाबे पानविडा । फंदी मलिक को गाम पोखरी सुनोयार हरदम रगडा । आनंदराव ब्राह्मण ठिकाणा संगमनेर वाको लहेरी । साकड मुसक्या शत्रूक्या नागोपंतपर हुई स्वारी । बारा बरसका पठा देखो आंगी नयनपर झुरमुर डारी । नयनोमे कजरा डार दिया पण घटपरथा शिरपर घगरी ॥ ४ ॥

## लावणी. १९

जोरु कसमका कज्या सुनो हाजा लढते फिरतेते ॥ बडा हजांबा खडा एकपर एक धबाधब गिरथेते ॥ ध्रु ॥ खानेपिनेके तंगशाई येतोनाका दिननिकला ॥ माबापनो भलान किया मजपर रुटा हागतारा । साराघर दिनभुला खडू किबन हिकरता मुकाला । मयचरखेकेकमाई काहा लाग तुझे खिलाऊ नगदुला ॥ पुढायतानें धरलिया सोसो येरझार करतिथे ॥ बडा० ॥ १ ॥

तुक्या कमाती फत्तर चुडयेल क्यौ करती हाय हाय ॥ ऐसे

लगकार जुया मारु एक बाल नहिरहने पाया । क्यापशम चरखेके कमाई हाम शिपाई हारगिसना खाया । दरकिव मारे तलवार, लोहखना खन तुटता जाय ।। ये दुःख काल कंकालेमे तेरे मांबाप जगावे मरयेते ।। वडा० ।। २ ।।

सच कहुप्यारे सचकहु तुझे खुदाकी सौंगन कहा नौकरी रोताया । ऐसा उलटा समया आया तिन दीन भुका मरथाता । तुझे तो रोटिका सपना औरतकुक्या खिलताया । मुये तुझेमे चाटु काटु हांड्या धुके पिताया । तेरे सरीखे मेरे बापकु घरमे पानी भरतेथे ।। वडा० ।। ३ ।।

रांडभांड चिछडीतो प्यारे फिर अबरू रहती कैसी । मरद आदमी झुटा होयतो नेक पतिव्रता जैसी । अनंतफंदीके छंद जैसे तलावेमे कमल तिरथेते ।। ४ ।।

## लावणी २०.

हे मुर्खा खूण तर्का पर्का पुरुष आपला नसे । तशा मधीं कोणी विरळा प्रीत चालवितसे । ध्रु० ।। म्या म्हटलें हा चक रुपया दिसतो माल खरा । वाजून जों पाहतें तों आंत तांब्याचा भुरमुरा । म्या म्हटलें हा जुरा शिपाई फाकडा खुप तऱ्हा । झुंजाचें जेव्हां तोंड लागलें पळतसे माघारा । म्या ह्मटलें हा सुरेख उमदा आंगठीवरला हिरा । बसतां घन मस्तकीं भोगितां कस्त झाला चुरा । म्या ह्मटलें कोणी आहे मिजाशी फार नाजुक दिसे । हस्तचरण सणकाड्या क्षयरोगानें जिंकिली असे । हे मुर्खा खुण० ।। १ ।। म्या म्हटलें हें मोती चांगलें जाईल जन्मा जुगां । हातीं घेतां फुगा समजला ह्मणून झाला भुगा । म्यां म्हटलें हे साधु ज्याचे दोष नाहीं आंगा । परंतु थोडे केस मस्तकीं वशाळ इतका बघा ।

म्यां म्हटलें हा शिकारी मारील व्याघ्र टाकितो डगा । परिणामीं समजला कुलंगा ह्मणून बसला दगा । म्या म्हटलें हा मार्ग चांगला काडीं कसपट नसे । चालाया लागलें उकर्डा सामोरा येतसे । हे मुर्खा० ॥ २ ॥ म्या म्हटलें झड मोठी लागली फार पाऊस पडे । तेव्हांच झालें निरभ्र इतकी व्यर्थच गडगडे । म्यां म्हटलें हें झाड शिंदीचें उंच कीं अवघड । जेव्हां लागलें चढूं तेव्हां बाई त्यानें काढले फड । म्या म्हटलें अंजिरासारखे गोड पिंपळ-वड । मुखामधीं घालितां समजलें तुरटसे चोथड । म्या म्हटलें कोणी शहरामिजाशी चांगलीं माणसें । रस्त्यांतून पाहतें तों कळकट मळकटवाणी जसे । हे मुर्खा खूण तर्का० ॥ ३ ॥ म्या म्हटलें हा घोडा झुरा किमतीचा दिसतो । त्याहाळून पुर्तेपणें पाहतें तों गर्दभ दिसतो । म्या म्हटलें हा राघो पिंजऱ्यामाजी डोकावितो । जवळ जाऊन पाहतें तों कावळा अदा दावितो । म्या म्हटलें कोणी चतुर शाहाणा योगी बोलावितो । संबंध घडल्यावरी कळू आला मूर्खसा मजकी तो । म्या म्हटलें कोणी गायक गातो तान झोंकि-तसे । फंदी आनंदचे छंद जिव्हारीं शस्त्र भोंक्तिसे । हे मूर्खा० ॥ ४ ॥

## लावणी २१.

धन्य तुझें लावण्य प्रीतीचे बाण जैसे सणाणी । खरे सांगशील कधीं तृप्त होईल गे आमचे मनानीं ॥ ध्रु० ॥

दोमजला पैठणचें पातळ ळफ्फा धे टाचेची खबर । आधींच निबर जोबन त्यावर पितांबराची चोळी जबर । लालशालु जशी मशाल घरची खुशाल दापैशानें गबर । नाहीं कोणाची प्रभा उत्तमा तेव्हां तर्फडी मात जबर । मांड्या गुडघ्या सरळ पोटऱ्या

पायीं जोडवी खणाणी । जसे घोड्याचे नाल बाजती अवाज कानीं दणाणी । धन्य तुझें लाव० ॥ १ ॥ फार चांगली तूं जर माहीत कळलीस कानोकानाला । तर तुला भलताच उडविल चुना न लागेल पानाला । कैक विलासी अहो रात्रीं टपले देही दानाला । टवकारून तुजकडेच पाहतील कळा लागतील मानाला । स्तनाला कधीं हस्त लाविती आमची विनंती मानी । तूं थोराची लेक तुला आम्ही काय देयाचे दिनानी ॥ धन्य० ॥ २ ॥ वडलान वडली जी काय दौलत लाखो ज्यांनीं कमावली । तितकें तुज अर्पिलें परंतु कांहींच नाहीं जमावली । असें चांगुलपण तुझें धन्य मातेच्या उदरीं समावली । अटोकाट शहाणी युक्ती युक्तीनें पाहून जमावली । अतीरती कुल खप्पी झाले हिंडू लागले वनानी । नयन तुझे पाहतां मृगानींच तोंड खुपसले तनानी ॥ धन्य० ॥ ३ ॥ कोट्यावधी तुज पैसा देऊ तूं खा नारी तुप साकर । जशी चंद्राला दशी वहावी घ्या आमची भाजी भाकर । दोनी हस्तक तिसरें मस्तक जसें तुझ्या घरचें चाकर । इतके मनामधीं समजुन उमजुन घाल आम्हावरती पाखर । आनंदफंदीचे छंद जसे कटिबंध जडन नवी झनानी । लांगे लुंगे कवि ना ठरती जशा भोरड्या मनानी ॥ धन्य० ॥ ४ ॥

## लावणी २२.

बोलगड्याभशीं नरम नको होऊं गरम पोकळ भरम कशाला ? ज्वानी जाईल सरून । भर गेल्यावर पोर होईल मगरंग येईना असा फिरून ॥ ध्रु० ॥

चाल तुझ्या स्वरुपाची तारिफ काय । माराशिल दो नयनांचे घाय । जखम अरपार जिव्हारीं जाय । तुफानी जशि बनलीस वर माय ।

नदीचे कांठीं हिरवी नाय । तसा हा असार देह पहाय ।
घराकडे येऊन तिनदां जाय । शत्रूच्या छातीवरता पाय । बोल-
शिल लौकिक येवढाच राय । दिवस पळ जातो भरवसा काय ।
चाल । नको दाखऊं पाय । लागल नाट । बिसनी थाट । दुर रस्ता
धरून ।। १ ।। बोल गड्याशीं नरम नको होउं गरम पोकळ
भरम कशाला ज्वानी जाइल सरून । भर गेल्याघर पोर होईल
मंग रंग येईना असा फिरून ।। १ ।। कपाळीं टिळा हिं-
गोळी कोर । माथां शिसफुल बिंदी मोर । मुद राखडी चंद्राची
कोर । जशी कोयाळ करती शोर । शाम थोर दिसती पोर ।
आंगामधिं भर नवतीचा जोर । केश चपचपीत काळेभोर । तुला
नेइल वाटेचा चोर । पाहुन देईल अंगठी मोहोर । परंतु तुज
सारखी चकोर । चालुंदे नित्य भेटीचा टकोर । उमज मनीं कर
धडा वृद्धपणीं ज्योबन जातिल जिरून । पंचविशीवर झुकली
म्हणजे बैस माळ हातीं धरून । बोल गड्या मशीं नरम० ।। २ ।।
नेले बिसनीला महालांत । श्रीवर्धनी सुपारी कात । नागवेलिचें
पिकलें पात । करी सुंदरी साहित्य तबकांत । विड दे करून बि-
सनी खात । जेव्हां कंचुकीस लागे हात । तेव्हां पलंगाचे तडतडी
गात । फंदी अनंत नुक्ताच गात । ऐकतां कवी जोडिती हात ।
जणूं आंबेमोहराचा भात । धोंगडा जरी न मिळे आंत । जणुं कांहीं
पतंग गोते खात । इष्कामधीं चूर चालला पूर नदीला भरून ।
लांगेलुंगे इष्के लुच्चे यांचे छातीवरून । बोल गड्या मशीं नरम० ।३।

## लावणी २३.

पति तर केवळ शुद्ध दांडगे धागरगडचे हंस जसे । पाणी वाह-
तां खटी पडल्या खांदी कावड झुलतसे ।। ध्रु० ।। चवला पुरती

करी मजूरी कंबर बांधुनि हजीर जसे । अक्षरशत्रु ' ओनामासी ' हें तव ठाउक स्वप्नि नसे । तंबाखूचा मोंठा चाळा नाहिं मुखावर तेजकळा । दोटक्यांनीं भले दांडगे पाझर येइना खडकाला । परि निवळ फतर । पति तर केवळ० ॥ १ ॥ तूं तर केवळ देवा घरची मुखराणि मध्यें श्रेष्ठपर्णी । नाजुक साजुक कळी प्रफुल्लित पातळ पुतळी टंगणी । राजस गोंडस स्वहस्तकमळीं गौरवर्ण तनु देखणी । विशाळ डोळे बुबुळ कुळकुळित नाहिं कुठे तिळतुल्य उणी । शांत प्रकृती हास्यमुखी सुंदराकृती हो सदा सुखी । रंभा पाहुनि लज्जित होउनि तव गुणश्रवणीं पडति गळां । पति तर केवळ ॥ २ ॥

## लावणी २४.

तुज नाहिंरे माझी काळजी ध्रु० ॥ आपण तरि जीव द्यावा । नाहीं तरि शुद्ध हातामधिं ध्यावा विणा टाळ जी । तुज नाहींरे० ॥ १ ॥ कोण मिळाली ठकणी । माझा रांवा उडविला गगनीं । केली राळ जी । झाली राळ जी । तुज नाहींरे० ॥ २ ॥ कोण मिळाली विवशी । कोणीकडे नेला राजवनशी । पिटी भाळ जी । आपटी भाळजी ! तुज नाहींरे० ॥ ३ ॥ घरास आले फंदी । तेव्हां सुंदर चरणा वंदी । घाली माळ जी । सख्याला माळ जी । तुज नाहींरे० ॥ ४ ॥

## लावणी २५.

चाल ॥ घर नको मला मी फार त्रासलें ॥

हार तुरे तुला धीरा मी गुंफितें । नकोरे होऊं बावरा तूं दिलभरा धिरा धिरा तुझ्यावरी आधीं रंग शिंपितें । ध्रु० ॥ होळीला तुम्ही घरीं असतां कधीं ? ॥ मी आपुल्या स्वहस्तें का निमस्तकीं

गुलाल फेकीन दयानिधी । रंग खेळणें होऊं द्या आधीं । मग हो सारे रात्र घेऊनि बसा मला तुम्ही रंगमहालामधीं । शरीर हें तुला आज वोपितें । नकोरे होऊं घाबरा तूं दिल भरा धिरा० ॥ १ ॥ दध्धराजभरा लई दिसा आला । होऊनि स्थीर धीर धरी, अधीर नका वस्त्र तरी नेसूं द्या मला । क्षणभरी उशीर लागला । ठीक ठाक चाकपाक झाक सावना उद्यां दिदार चांगला । वेणी मोकळी चापचोपिनें । नकोरे होऊं घावरा तूं दिलभरा० ॥ २ ॥ चाहते तुझ्यावर रंग टाकीन । त्या हातें फुलेल तेल रेलचेल करून आंग मर्दीन । भरभरूं मुठी गुलाल फेंकीन । गोकुळीं जसा श्रीकृष्ण फाग खेळतो तसें तुम्हा मी लेखीन । तो हरी जसा त्या प्रीय गोपीतें । नकोरे होऊं घावरा तूं दिलभरा० ॥ ३ ॥ वनून फाकडी राहिली उभी । रंग राग फाग खेळूनि तुफंग मार कारितसे खुबी । खुप देखणी लहानशी छबी । चोळी तंग घे पचंग आंग संग करीं निसंग मग कोणा न भी । तुज मी आपल्या हृदयीं स्थापितें । छंद फंदी आनंदाचे कटिबंध ते प्रबंध यामुखें अलाफितें । नकोर होऊं घाबरा तूं दिलभरा० ॥ ४ ॥

---

## लावणी २६.

नको जाऊ बाहेरी गोऱ्या आंगाशीं लागेल ऊन वारा । त्रिसणीच्या पलटणी उभे पाहावयास जग सारा ॥ ध्रु० ॥ पाई विचवे

पोल्हारे जोडवीं नाद अवघे एकवटले ।। मांड्यांचें गोरेपण पाहून सपेटित मागें हाटले ।। माशुक गोरे गाल घडीग परटाची जरा नाहीं मळकटले ।। इतर स्त्रियांचे मुखडे मज भासती तुझ्या पुढें कळकटले ।। बहुनाजुक पुतळी झराझर चालण्याचा झट कारा ।। जशी तोफेवर बत्ती हत्तीच्या पावसाचा फटकारा ।। नको० ।। १ ।।

हातीं हिऱ्यांच्या मुद्या चमाचम जसें चांदणें फटफटलें ।। ऐसी वस्तु कधीं लाधल मनामधीं कैक विलासी लटपटले ।। लज्जीत मृग जहाले पाहतां मनामध्यें चटपटले ।। इतर स्त्रियांचे मुखडे मज भासती तुझ्यापुढें कळकटले ।। होट पवळीचे वेल बोट चवळीच्या सेंगा बहुतशिरा ।। दंत शुभ्र शोभिवंत काळ्या दातवणांच्या मधीं चिरा ।। नको० ।। २ ।।

मस्तकीं मुदराखडी झोंक वेणीचा थरारी भुजंग जसा ।। वदन चंद्र न्याहाळीं हातीं घेऊन अरसा । बालोबाल ग मोती गुंफुनी रेखून भांग करिती सरसा । अटकर छाती सुंदुक त्यावर कुच कंदुक भरला तरसा ।। सरळ नाक तरततीत नित्य भरजरीत डुब आलबेली तऱ्हा । तुलाच पाहून भुललों नारी कलम करिना धरी चित्रा ।। नको० ।। ३ ।।

चंद्र तुझा पहा मुखचंद्रावर येउनिया बैसला कसा । प्रत्यक्ष मज भासतो फणीवर त्या नागाचा मणी जसा । शब्द तुझा ऐकूनि कोकिळा पांगल्या त्या दाही दिशा । न दाखवी गडे सिंहकाटि पाहून झाला हिंपुष्टा । फंदी मुलाचे छंदबंध कुठवर गेला तर्ख धरा । दिल्लीच्या ह्या पलिकडे बोभाटे झाले हे पोबारा ।। नको जाऊं० ।। ४ ।।

## सवाईफंदी.

### लावणी. २७

क्षीरसागरीचा हरी पाहूं आल्या गोपी । अष्टनायका सोळा सहस्र तितक्या आटोपी । ध्रु० ॥ जशी जिची भावना तसाच त्या रंगा । कोठें वेणी फणी कोठें न्हाणी धुणी नीत उठून हाच दंगा । प्रीतीचा योग जणुं भागिरथी गंगा । कोठें विलास अथवा कोणाघरीं मुनी ब्रह्म चारी नंगा । एकांत लक्ष्मीकांत गेला झोपी । अष्टनायका सोळा सहस्र तितक्या आटोपी ॥ १ ॥ करी थट्टा घटाला धक्का फोडी सुगडें । तरतरा पदर फरफरा फेडी लुगडें । गोपाळ मित्र नको मनांत लाजूं गडे । हें तुझेंच कवतुक वस्त्राआड उघडें । धर सुद दाट दहीं दूध लोणी ओपी । अष्टनायका सोळा सहस्र तितक्या आटोपी ॥ २ ॥ वनीं धेनु चारितां कामळ हातीं काठी । माधवा थवा भोताला पशुदाटी । न्याहारीचा बाहारी मग दहीं काला वाटी । खर्कटीं बोटें अवडीनें देव चाटी । फंदी मूल म्हणे तुझी कळा तुला सोपी । नसे अंत कृतांता क्षणामधें चोपी । अष्टनायका सोळा सहस्र तितक्या आटोपी । क्षीर सागरीचा हरी पाहूं आल्या गोपी ॥ ३ ॥

### लावणी. २८

**चाल** । हार तुरे तुला धीरा मी गुंफितें ।

घर नको मला मी फार त्रासलें । नवती जान पतीची वाण खरें प्रमाण शपत आण मनीं उदासलें ॥ ध्रु० ॥ कोण भेटली मोहून फासले । वर्ष चार चुकुर नार नसे थार लाऊनि तार पाहतो मासले । संगतीमुळें बेताल नासले । समजतात जरी येतात प्यादे

मात कुच उरांत रस रसालले । सुबक ठेंगणी मुसमुसासले । नवती जान पतीची वाण खरें प्रमाण० ॥ १ ॥ भुलनिशा करी जसें द्रव्य हरवतं । टाकितें उसास जातो भास खास नाहीं सुखास विषय करवत । रात्र वैरिणी दिवस पर्वत । ठेवितें शीर बंधु दीर व्हा वजीर पैलतीर न धीर धरवत । साक्षी देतील आस पासले । नवती जान पतीची वाण खरें प्रमाण० ॥ २ ॥ अरुचि अन्न हें लागतें कडूं । हिंपुटींत जीव मुठींत हुटहुटीत कळवटींत पालथी पडूं । कधीं सखा सखी एकांतीं सांपडूं । सपन पडत उलट घडत कड-कडत डाग पडत मळत का पडूं । गत कशी करूं मिळाले असले । नवती जान प० ॥ ३ ॥ निश्चय तिचा हिशोब गरतिचा । पावले दयाळ चंद्रभाळ रुंडमाळ व्याळ वेळ भरतीचा । मेघ वर्षतां उदय धरत्रीचा । धरूनि हात हांसत जात महालांत बेतभात पंचआरतीचा । चित्तवृत्तीनें सावकासले । फंदी मूल करी कटाव नित घटाव सूर्यबिंब. आज प्रकाशलें । नवती जान पतीची० ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ४६०
संदर्भ शाखा
REFBK-0000460
REFBK-0000460

---

परशराम कवीची गंगाथडीत चांगली प्रसिद्धि असून त्याचे पोवाडे व लावण्या तिकडे फार लोकप्रिय आहेत. हा लाभ सर्वांस मिळावा या हेतूनें आम्हीं या कवीच्या निवडक लावण्या पोवाडे छापून काढले आहेत. ह्या पुस्तकाचे एकंदर चार भाग केले आहेत १ देवांच्या लावण्या. २ ऐतिहासिक पोवाडे. ३ समाजस्थितीवर लावण्या. ४ साध्या लावण्या. शिवाय पुस्तकाच्या आरंभीं कवीचें संक्षिप्त चरित्र दिलेलें असून लावण्या व पोवाडे निवडण्याचें व चरित्र लिहिण्याचें काम पोवाड्याचे प्रसिद्ध भक्त रा. शंकर तुकाराम शाळिग्राम ह्यांनीं केलें आहे, ह्यावरून या ग्रंथाचें महत्त्व वाचकांचे ध्यानांत येईल. पुस्तकाचीं पानें रायल सोळापेजी ३३५ आहेत. किं. १ रु. ट. ह. ८१.

# रामजोशीकृत लावण्या.

महाराष्ट्रांत रामजोशीबुवाचें नांव माहीत नाहीं असा मनुष्य विरळा. रामजोशीबुवा दुसरे बाजीरावाचे वेळीं फार प्रसिद्ध कवी होऊन गेले येवढेंच नव्हे तर महाराष्ट्र भाषेंतील कवितेचा परिचय सर्व लोकांस चांगलाच करून दिला.

वरील लावण्या ह्या कवीनें लिहिलेल्या असून त्या निरनिराळ्या विषयांवर लिहिलेल्या आहेत. त्यांत ईशस्तुति, उपदेश, व प्रेम ह्यावरील लावण्या फारच चटकदार असल्यावरून आम्हीं तेवढ्याच वरील पुस्तकांत छापल्या आहेत, एकंदर पुस्तक फारच बहारीचें झालें आहे. किं. ८८. ट. ह. ८१.

मुंबई—चित्रशाळा दुकान, काळबा[illegible]रोड. पुणें—म्यानेजर, चित्रशाळा

---